# सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. २४ एप्रिल २०२६ | वर्ष - ४ थे | अंक ११ | पाने : ८ | किंमत रु. ६/-

dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# मुंबईतील वाहतूककोंडीवर 'जलमेट्रो'चा उपाय!

## पहिल्या टप्प्यात १६ मार्ग व २६ टर्मिनल

**तभा वृत्तसेवा**

**नवी मुंबई :** ठाण्यालाही जोडणारमुंबई:लवकरच शहरातील वाहतुकीची पद्धत बदलणार आहे. सध्या मुंबईत लोकल ट्रेन, बेस्ट बससह मेट्रोने प्रवास करता येता. आता मुंबईकरांसाठी शहरातच जलमार्गे प्रवास करण्याचा मार्ग देखील उपलब्ध होणार आहे. राज्य सरकार लवकरच पाण्यावर धावणारी, जल मेट्रो सुरू करण्याची योजना आखत आहे. यामुळे शहरांतर्गत आणि आजूबाजूच्या परिसरातील प्रवास सोपा होणार आहे. काही महिन्यांपूर्वी कोचीच्या धरतीवर मुंबईतही जलमेट्रो सुरूकरण्याची घोषणा करण्यात आली होती. आता महाराष्ट्र सागरी मंडळाने या प्रकल्पासाठी निविदा काढली आहे. त्यामुळे नियोजन पूर्ण झाले असून, मुंबईकरांचा प्रवास लवकरच सुलभ आणि आधुनिक होणार असल्याचे संकेत मिळत आहेत. या जल मेट्रोमुळे फक्त मुंबईतच नव्हे तर नवी मुंबई, ठाणे, कल्याण, वसई आणि मिरा भाईंदरसारख्या परिसरांशी देखील जोडणी मिळणार आहे.जलमेट्रोची गरज का आहे? मुंबई शहरसमुद्र आणि खाड्यांनी वेढलेले आहे. त्यामुळे शहरांत जलवाहतूक हा एक उत्तम पर्याय ठरू शकतो. तसेच, पर्यावरणपूरक वाहतुकीलाही यानंतर वेग मिळणार आहे. मुंबईतील रस्त्यांवरील वाहतूक कोंडी कमी होऊन नागरिकांचा प्रवासातील वेळ मोठ्या प्रमाणात वाचणार आहे. मुंबईसारख्या झपाट्याने वाढणाऱ्या शहरामध्ये दिवसेंदिवस वाहतुकीची मागणी वाढत चालली आहे. विद्यमान पायाभूत सुविधा नागरिकांना अपुऱ्या पडत आहेत. शहरातील रस्त्यांवर व लोकलमध्ये प्रवाशांची गर्दी वाढत चालली आहे. त्यामुळे वारंवार कोंडी होऊन प्रवाशांची गैरसोय होते. मुंबई उपनगरीय रेल्वेवर क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशांचा भार पडतो. या सर्व समस्यांवर उपाय म्हणून राज्य सरकारने महाराष्ट्रात जल मेट्रो सुरू करण्याचा निर्णय घेतला. सध्या मुंबईतील जल मेट्रोच्या पहिल्या टप्प्याचा आराखडा समोर आला आहे. पहिल्या टप्प्यात एकूण १६ मार्ग आणि २६ टर्मिनलचा विकास होणार आहे. शहरांत सध्या ८ जलमार्ग असून यांचा विकास करून नवे ८ मार्ग तयार केले जाणार आहेत. सध्या या विस्तारासाठी निविदा जारी केल्या आहेत. सल्लागार नेमल्यानंतर प्रत्यक्षात या प्रकल्पाचं बांधकाम सुरू होईल. सल्लागार या प्रकल्पाच्या व्यवस्थापनाची निवड करेल, संपूर्ण डिझाइन आणि खरेदीची काळजी घेईल तसेच, टर्मिनलचा विकास करेल.



## इस्लामाबादमध्ये १० दिवसांपासून लॉकडाऊन

**वृत्तसंस्था**

**इस्लामाबाद :** अमेरिका आणि इस्रायलने २८ फेब्रुवारी २०२६ पासून इराण विरोधात हवाई हल्ले सुरू केले आणि पश्र्चिम आशियात युद्ध भडकले. या युद्धात पाकिस्तान अद्याप थेट सहभागी झालेला नाही. पण युद्धामुळे पाकिस्तानवरच मोठे संकट आले आहे.

महागाई गगनाला भिडली आहे. कामधंदे ठप्प असल्यामुळे बेरोजगारांचे प्रमाण वाढले आहे. पण लोकप्रतिनिधींकडे पाकिस्तानच्या सामान्य नागरिकांशी संवाद साधण्यासाठी किंवा त्यांचे प्रश्र्न सोडवण्यासाठी वेळच नाही.अमेरिका आणि इराणचे प्रतिनिधी शस्त्रसंधीच्या मुद्यावर चर्चेसाठी येणार असल्यामुळे सुरक्षेचा उपाय म्हणून पाकिस्तानने राजधानी इस्लामाबादमध्ये सामान्यांसाठी अनेक मनाई हुकूम जारी केले आहेत. यामुळे इस्लामाबादमध्ये मागील दहा दिवसांपासून लॉकडाऊन सारखीच स्थिती आहे. सामान्य नागरिकांचे हाल होत आहेत. अनेक रस्ते वाहतुकीसाठी बंद केले आहेत.

बाजारपेठा बंद आहेत. कामधंदे ठप्प असल्यामुळे हातावर पोट असलेल्या बेरोजगारांचे प्रमाण वाढले आहे. महागाई गगनाला भिडली आहे. दैनंदिन गरजेच्या वस्तू मिळवणे सामान्य नागरिकांसाठी कठीण झाले आहे.इस्लामाबादमध्ये ठिकठिकाणी जवानांचा पहारा आहे. प्रमुख चौकांमध्ये, अनेक रस्त्यांवर कायम जवानांचा पहारा आणि नाकाबंदी केल्याचेच दिसत आहे. या सुरक्षा व्यवस्थेमुळे सामान्यांसाठी जगणे कठीण झाले आहे.पाकिस्तान शस्त्रसंधी होणार असल्याचे सांगत असला तरी प्रत्यक्षात अमेरिका आणि इराणचे प्रतिनिधी अधूनमधून एकमेकांना धमक्या देणे, इशारे देणे असे प्रकार करत आहेत. वारंवार अमेरिका आणि इराणकडून परस्परविरोधी दावे सुरू आहेत. यामुळे तणाव वाढत आहे. तणाव कमी होत नाही आणि अघोषीत लॉकडाऊन संपत नाही म्हणून पाकिस्तानमधील नागरिकांमध्ये अस्वस्थता वाढत आहे.

## 'शिवशाही' बसला भीषण आग; १५ प्रवासी थोडक्यात बचावले

**तभा वृत्तसेवा**

**ठाणे :** ठाणे रेल्वे स्टेशन परिसरातील सेटीस ब्रिजवर आज म्हणजेच गुरुवार २३ एप्रिल रोजी 'शिवशाही' बसला अचानक भीषण आग लागल्याने एकच खळबळ उडाली. उन्हाच्या तडाख्यात आधीच त्रस्त असलेल्या प्रवाशांमध्ये या घटनेमुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले.मिळालेल्या माहितीनुसार, ठाण्याहून पालघरमार्गे बोईसरकडे निघालेली ही बस स्टेशनजवळ येताच अचानक बंद पडली.



त्यानंतर बसच्या खालच्या भागातून, विशेषतः इंजिन आणि डिझेल टाकीजवळून धूर निघू लागला आणि काही क्षणांतच बसने पेट घेतला. प्राथमिक अंदाजानुसार, शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. घटनेच्या वेळी बसमध्ये सुमारे १५ प्रवासी होते. मात्र आग लागल्याचे लक्षात येताच सर्व प्रवाशांनी तत्काळ बसमधून बाहेर पडत धाव घेतली. त्यामुळे सुदैवाने मोठी जीवितहानी टळली आणि सर्व प्रवासी सुखरूप बचावले.आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या.

जवानांनी पाण्याच्या जोरदार फवाऱ्यांनी आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. स्थानिक नागरिकांनीही मदतीसाठी धाव घेत अग्निशमन दलाला सहकार्य केले.मात्र आग प्रचंड भडकलेली असल्याने बस पूर्णपणे जळून खाक झाली. घटनास्थळी बसचा फक्त सांगाडा उरल्याचे दिसून आले. या घटनेमुळे काही काळ वाहतूक व प्रवाशांची हालचाल विस्कळीत झाली होती.

## बंगाल निवडणुकीला हिंसक वळण

**वृत्तसंस्था**

**कोलकाता :** पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदानादरम्यान राज्यात अनेक ठिकाणी हिंसाचाराच्या घटना घडल्या. १५२ मतदारसंघांमध्ये सुरू असलेल्या मतदानावेळी जाळपोळ, तोडफोड आणि मारहाणीच्या घटनांनी परिस्थिती तणावपूर्ण झाली आहे.

मुर्शिदाबादमध्ये एजेयूपी प्रमुख आणि रेजीनगरचे उमेदवार हुमायून कबीर यांच्या ताफ्यावर दंगलखोरांनी काठ्या आणि विटांनी हल्ला केला. या घटनेनंतर टीएमसी आणि एजेयूपी कार्यकर्त्यांमध्ये तीव्र संघर्ष झाला. कबीर यांनी या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली असून पोलिसांशीही त्यांचा वाद झाला.दक्षिण दिनाजपूरमधील कुमारगंजमध्ये भाजप उमेदवार सुवेंदू सरकार यांच्यावरही हल्ला झाल्याचा आरोप आहे. बूथ जॅमिंगची तक्रार मिळाल्यानंतर घटनास्थळी पोहोचलेल्या सरकार यांना काही जणांनी मारहाण केल्याचे त्यांनी सांगितले. या वेळी पोलिस उपस्थित होते, असा आरोपही त्यांनी केला आहे. कूचबिहारच्या तुफानगंज परिसरात मोठा जमाव जमल्याने तणाव निर्माण झाला होता. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्याची शक्यता लक्षात घेऊन केंद्रीय सुरक्षा दलांनी लाठीचार्ज करत जमाव पांगवला.मालदामध्ये ईव्हीएम बिघाडामुळे संतप्त मतदारांनी निवडणूक अधिकाऱ्याला घेराव घालून ओलीस धरले. तसेच हरिश्र्चंद्रपूरमध्ये टीएमसीच्या दोन गटांमध्ये झालेल्या संघर्षात पक्षाच्या कॅम्प ऑफिसची तोडफोड करण्यात आली.सिलिगुरीमध्ये टीएमसी आणि भाजप कार्यकर्त्यांमध्ये मतदान केंद्राबाहेर हाणामारी झाली. केंद्रीय दलांनी तत्काळ हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणली.दरम्यान, टीएमसीने राज्याबाहेरून गुंड आणल्याचा गंभीर आरोप केला आहे. आसनसोल उत्तरचे उमेदवार मलय घटक यांनी पाच विशेष ट्रेनमधून बाहेरील लोकांना आणल्याचा दावा करत निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.



## केजरीवालांच्या न्यायालयीन कामकाजाचे व्हिडिओ हटवण्याचे आदेश

**वृत्तसंस्था**

**नवी दिल्ली :** दिल्ली उच्च न्यायालयाने एका महत्त्वपूर्ण सुनावणीदरम्यान, मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या न्यायालयीन कामकाजाचे अनधिकृत व्हिडिओ रेकॉर्डिंग सोशल मीडियावरून तातडीने हटवण्याचे आदेश दिले आहेत. हे व्हिडिओ केजरीवाल यांनी न्यायमूर्ती स्वर्णकांता शर्मा यांच्यासमोर स्वतः बाजू मांडली होती तेव्हाचे आहेत.



मद्य धोरण प्रकरणात अटकेत असलेल्या अरविंद केजरीवाल यांना जेव्हा न्यायालयात हजर करण्यात आले होते, तेव्हा त्यांनी स्वतः न्यायाधीशांसमोर युक्तिवाद केला होता. नियमानुसार, न्यायालयीन कामकाजाचे अनधिकृत चित्रीकरण किंवा प्रसारण करण्यास मनाई असते. मात्र, या सुनावणीचे व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाले होते.या प्रकरणी न्यायालयाने केवळ व्हिडिओ हटवण्याचे आदेश दिले नाहीत, तर नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल कठोर भूमिका घेतली आहे.

न्यायमूर्ती स्वर्णकांता शर्मा यांनी स्पष्ट केले की, न्यायालयीन शिष्टाचार आणि नियमांनुसार कोणत्याही कामकाजाचे रेकॉर्डिंग करणे आणि ते परवानगीशिवाय सार्वजनिक करणे हा गंभीर प्रकार आहे. न्यायालयाने केंद्र सरकार आणि संबंधित सोशल मीडिया कंपन्यांना हे सुनिश्र्चित करण्यास सांगितले आहे की, असे कोणतेही व्हिडिओ इंटरनेटवर उपलब्ध राहणार नाहीत.

## आता 'डेटा वॉर' होणार ?

**वृत्तसंस्था**

**तेहरान:** मध्य पूर्वेतील युद्धामुळे जगात खनिज तेलाचा तुटवडा निर्माण झाला आहे. खनिज तेलाचे दर आभाळाला भिडले आहेत. त्यामुळे अनेक देशांच्या अर्थव्यवस्था अडचणीत आल्या आहेत. यानंतर आता जगावर आणखी एक संकट कोसळण्याची चिन्हं आहेत. समुद्राच्या तळाशी असलेल्या इंटरनेट केबल्स पुढील लक्ष्य असू शकतात, असा इशारा इराणशी संबंधित माध्यमांनी आणि सुरक्षा यंत्रणांनी दिला आहे. इराणच्या शेजारी असलेल्या समुद्राच्या तळाशी इंटरनेट केबल्स आहेत. या केबल्सच्या माध्यमातून जगभरात इंटरनेट सेवा पुरवली जाते. इराणनं या केबल्सचं नुकसान केल्यास जगभरातील इंटरनेट सेवा ठप्प होऊ शकते.

## ओडिशात उष्णतेचा कहर; झारसुगुडा ठरले देशातील सर्वाधिक तापमानाचे शहर

**वृत्तसंस्था**

**भुवनेश्वर :** देशात सध्या उष्णतेची तीव्र लाट उसळली असून ओडिशा राज्य या उष्णतेच्या तडाख्यात सापडले आहे. किनारपट्टीपासून ते पश्र्चिमेकडील जिल्ह्यांपर्यंत तापमानाने विक्रमी पातळी गाठली आहे. बुधवारी (२२ एप्रिल) झारसुगुडामध्ये ४४.६ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले, जे देशातील सर्वाधिक होते. तर राजधानी भुवनेश्र्वरमध्येही पारा ४१.२ अंशांवर पोहोचला. हवामान विभागाने पुढील पाच दिवस हीच परिस्थिती कायम राहण्याचा इशारा दिला आहे.गुरुवारी झारसुगुडा, संबलपूर आणि बोलांगीर जिल्ह्यांसाठी हीटवेव्हचा इशारा देण्यात आला आहे. याशिवाय १७ जिल्ह्यांना 'यलो वॉर्निंग' देण्यात आली आहे. यामध्ये गंजाम, गजपती, नयागड, खुर्दा, कटक, पुरी, केंद्रपाडा, जगतसिंहपूर, जाजपूर, भद्रक, बालासोर, अनगुल, बौध, सोनपूर, सुंदरगड यांचा समावेश आहे.



टॉप ३ सर्वाधिक तापमान असलेली शहरे:झारसुगुडा - ४४.६ओउ (देशात सर्वाधिक) ढेंकनाल - ४३.२ओउ भुवनेश्र्वर - ४१.२ओउउष्णतेच्या तीव्रतेमुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. अनेक ठिकाणी सकाळी ८ वाजल्यानंतर घराबाहेर पडणेही कठीण होत आहे. नागरिक आपापल्या कामाच्या वेळा बदलत असून, उन्हापासून बचावासाठी विविध उपाययोजना करत आहेत. दुपारच्या वेळी रस्त्यांवर शुकशुकाट दिसत असून फक्त अत्यावश्यक कामासाठीच लोक बाहेर पडत आहेत. विशेषतः मजूर, कारखान्यातील कामगार आणि मोकळ्या जागेत काम करणाऱ्यांना उष्णतेचा सर्वाधिक फटका बसत आहे. वारंवार विश्रांती घेणे, पाणी पिणे आणि सावलीत थांबणे हीच त्यांची गरज बनली आहे.

# आर्थिक नाकेबंदीच्या नावाखाली ट्रम्प यांनी उगारलं 'आर्थिक अस्त्र'

**वृत्तसंस्था वॉशिंग्टन :** अमेरिका आणि इराण यांच्यातील शस्त्रसंधीला पुन्हा एकदा मुदतवाढ दिली गेली आहे, पण ट्रम्प यांनी नौदल नाकेबंदीतून माघार घेतलेली नाही. यामागे अमेरिकेने मोठी खेळी खेळली असूनअमेरिकेचे 'ऑपरेशन एपिक फ्युरी'आता 'इकॉनॉमिक फ्युरी'मध्ये बदलले आहे. यासह इराणची जीवनरेखा असलेल्या तेल महसुलाला पूर्णपणे नष्ट करण्याचे अमेरिकेचे उद्दिष्ट आहे.

अमेरिकेचे ऑपरेशन एपिक फ्युरी आता इकॉनॉमिक फ्युरीमध्ये रूपांतरित होताना दिसत आहे. जगातील सर्वात मोठ्या अर्थसत्तेचे राष्ट्राध्यक्ष, डोनाल्ड ट्रम्प, यांनी इराणसोबत शस्त्रसंधी वाढवणे पश्र्चिम आशियातील तणाव कमी करण्याचे एक पाऊल म्हणून पाहिले जात असले तरी, त्यानंतर लगेचच अमेरिकेचे ट्रेझरी सेक्रेटरी स्कॉट बेसेन्ट यांनी एका पोस्टद्वारे या निर्णयामागील खरं कारण स्पष्ट केले.इराणच्या बंदरांची नाकेबंदी सुरू ठेवून ट्रम्प इराणला



खार्ग बेटावरील तेल उत्पादन बंद करण्यास भाग पाडायच्या प्रयत्नात आहेत, जो तेहरानच्या उत्पन्नाच्या मुख्य स्रोत आहे. असं झाल्यास इराणच मोठं आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असून यावरून इराणवर दबाव आणण्याची ट्रम्प यांची रणनीती बदलली आहे आणि केवळ 'टाको' (T-CO - TRUMP -LWAYS CHICKENS OUT) यापुरतं प्रकरण राहिलेलं नाही. अमेरिकेला महिनाभर बॉम्बहल्ला आणि धमक्या देऊनही इराणला रोखण्यात अपयश आले, परिणामी मोठ्या प्रमाणात बॉम्बहल्ल्यांचा इशारा देऊनही त्यांनी शस्त्रसंधी वाढवली, पण नाकेबंदी उठवली नाही. इराणमधील शस्त्रसंधीला मुदतवाढ देण्यामागची अमेरिकेची रणनीती स्पष्ट आहे : होर्मुझ सामुद्रधुनीची नाकेबंदी कायम ठेवणे आणि इराणची तेलाची निर्यात शून्यावर आणणे. इराणने जगाला तेलाची निर्यात केली नाही तर, स्टोरेज टाक्या काही दिवसांतच भरून जातील. अशा परिस्थितीत, इराणला आपल्या तेल विहिरी बंद करण्यास भाग पडेल, जे अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत धोकादायक ठरेल.

## छत्रपती संभाजीनगर

### स्टेडिअम बांधकाम सुरुवात

**लॉसएंजेलिस :** आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने लॉस एंजेलिस२०२८ ऑलिम्पिकसाठी क्रिकेट स्टेडियमच्या बांधकामाच्या सुरुवातीचे स्वागत केले असून, याला खेळासाठी एक ऐतिहासिक क्षण म्हटले आहे.

कॅलिफोर्नियातील लॉस एंजेलिस काउंटीमधील पोमोना येथील फेअरप्लेक्स स्टेडियममध्ये भूमिपूजन सोहळा पार पडला. हे पाऊल १२८ वर्षांनंतर क्रिकेटच्या ऑलिम्पिकमधील पुनरागमनाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. आयसीसीचे अध्यक्ष जय शाह यांनी एका अधिकृत निवेदनात म्हटले आहे की, क्रिकेट आणि जगभरातील त्याच्या लाखो चाहत्यांसाठी हा एक अत्यंत रोमांचक क्षण आहे. ते पुढे म्हणाले की, क्रिकेट एक जागतिक खेळ म्हणून आपला दर्जा सातत्याने मजबूत करत आहे आणि ऑलिम्पिकचा भाग असणे ही अभिमानाची बाब आहे.

### खरातचा जमीन खरेदीत घोळ

**रायगड :**अशोक खरात केसमध्ये हे प्रकरण किती खोल आहे याचा अंदाज महाराष्ट्राला येत जात आहे, अशोक खरातचे काळे धंदे करत संपण्याचे नाव घेत नाही आहे. जमीन खरेदी विक्रीचे अनेक घोटाळे बाहेर येत असून खरातची कोठडी आणखी वाढण्याची शक्यता आहे. भोंदू बाबा अशोक खरात याने उरणमधेही जमीन खरेदी केली असल्याचे उघडकीस आले आहे. शासकीय दराने खरेदी केली असली तरी यात अडीच ते तीन कोटींचा व्यवहार झाला असावा. असा संशय व्यक्त करण्यात येत आहे. शिवाय या २० गुंठे जमिनीची केवळ ५८ लाख ५० हजार रुपयांमध्ये खरेदी केली आहे

### ऑनलाईन गेमिंग कायदा

**नवी दिल्ली :** देशातील वेगाने वाढणाऱ्या ऑनलाइन गेमिंग क्षेत्राला नियमनात आणण्यासाठी केंद्र सरकारने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. 'प्रमोशन अँड रेग्युलेशन ऑफ ऑनलाइन गेमिंग क्ट २०२५' हा नवीन कायदा आगामी १ मे पासून संपूर्ण देशभर लागू होणार आहे. या कायद्याचा उद्देश ऑनलाइन गेमिंग उद्योगाला ठोस चौकटीत आणणे आणि त्याचे संचालन अधिक पारदर्शक व सुरक्षित करणे हा आहे. यासाठी केंद्र सरकारने 'ऑनलाइन गेमिंग अथॉरिटी ऑफ इंडिया' (ओजीएआय) नावाची नवी नियामक संस्था स्थापन केली आहे. या संस्थेचे नेतृत्व इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या अपर सचिवांकडे सोपविण्यात आले आहे. त्यांच्या अध्यक्षतेखाली ही संस्था देशातील गेमिंग कंपन्यांच्या कामकाजावर देखरेख ठेवणार असून नियमांचे काटेकोर पालन सुनिश्चित करणार आहे.

### द्रुतगती मार्गावर वाहतूक बंद

**पुणे :** पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर गुरुवारी ठरलेल्या वेळेपेक्षा एक तास आधीच वाहतूक बंद करण्यात आली आहे. मूळ नियोजनानुसार दुपारी १२ ते ३ या वेळेत ब्लॉक घेण्यात येणार होता. मात्र, प्रत्यक्षात सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत पुण्याहून मुंबईच्या दिशेने जाणारी वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात आली आहे, अशी माहिती वाहतूक विभागाचे उपायुक्त (डीसीपी) विवेक पाटील यांनी दिली.

### मुंबई तापणार

**मुंबई :** राज्यभरात उष्ण आणि दमट वातावरणाचा प्रभाव कमी होऊन अवकाळीची हजेरी लागलेली असताना महामुंबई परिसरात पुन्हा एकदा उष्ण आणि दमट वातावरणाचा इशारा देण्यात आला आहे. गुरुवार, शुक्रवार आणि शनिवार असे तीन दिवस मुंबईतील वातावरण तापलेले असू शकेल. मुंबईमध्ये गुरुवारपासून कमाल तापमानाचा पारा पुन्हा एकदा वर चढण्याची शक्यता आहे.

## मराठी झी 5 वर 'डिटेकटीव्ह धनंजय – रहस्यजाल'

मुंबई : मराठी झी 5 प्रेक्षकांसाठी नवी थरारक मालिका 'डिटेकटीव्ह धनंजय – रहस्यजाल' घेऊन येत आहे. आदिनाथ कोठारे आणि पुष्कराज चिरपुटकर यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या मालिकेचा प्रीमियर 1 मे 2026 रोजी होणार आहे. शिरगाव या काल्पनिक आणि रहस्यमय शहराच्या पार्श्वभूमीवर आधारित ही मालिका एका गुंतागुंतीच्या खुनाच्या तपासाभोवती फिरते. खासगी गुप्तहेर धनंजय एका चुकीने आरोपी ठरलेल्या व्यक्तीची निर्दोषता सिद्ध करण्यासाठी प्रयत्न करताना अनेक रहस्ये, फसवणूक आणि छुपे हेतू उलगडतो. दिग्दर्शक श्रीरंग गोडबोले आणि लेखक गिरीश जयंत जोशी यांनी साकारलेली ही कथा प्रसिद्ध लेखक बाबुराव अर्नाळकर यांच्या गाजलेल्या साहित्यावर आधारित आहे.

## फिजिक्सवाला टॉपर्सच्या यशाचा जल्लोष

अहिल्यानगर : जेईई मेन २०२६ सेशन २ परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. यामध्ये फिजिक्सवाला विद्यापीठ केंद्रांच्या टॉपर विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या घवघवीत यशानंतर देशभरातील त्यांच्या केंद्रांवर मंगळवारी मोठ्या उत्साहात जल्लोष करण्यात आला.या परीक्षेत मुंबईतील भाईंदरचा विद्यार्थी साहिल प्रधान याने चमकदार कामगिरी करत ९४ वा ऑल इंडिया रँक (एआयआर) मिळवला. साहिल प्रधान व्यतिरिक्त, गुरुशिष सिंग चड्ढा (एआयआर ११२ - उत्तराखंड राज्यातील टॉपर) आणि हरियाणाच्या नमन वर्मा याच्या यशाचेही कौतुक करण्यात आले. नमन हा एका शेतकऱ्याचा मुलगा आहे. त्याने अवघ्या काही महिन्यांपूर्वीच ऑनलाइन ड्रॉपर बॅचमधून तयारी सुरू केली होती आणि आज त्याने एआयआर २४३ रँक मिळवून सर्वांना अचंबित केले आहे.तसेच, अनेक विद्यार्थ्यांनी आपापल्या राज्यात प्रथम येण्याचा मान मिळवला. यामध्ये हेमाक्षी कुमार (अंदमान व निकोबार), विष्णू भारद्वाज उपाध्याय (मेघालय) आणि रोहित शर्मा (हिमाचल प्रदेश) यांचा समावेश आहे.

## आसुस ने एक्सपर्टबुक अल्ट्रा सादर केले आहे

दिल्ली : आसुस ने आज, खऱ्या अर्थाने चिंतामुक्त व्यावसायिक अनुभवासाठी, उद्योगातील सर्वोत्कृष्ट फ्लॅगशिप असलेल्या एक्सपर्टबुक अल्ट्रा च्या लॉन्चची घोषणा केली, तसेच बहुपयोगी एक्सपर्टबुक पी सिरीज पोर्टफोलिओमध्ये लक्षणीय विस्तार केला आहे. आसुस एक्सपर्टबुक अल्ट्रा हा एक कोपायलट+ पीसी आहे, जो सीएक्सओ आणि व्यावसायिक नेत्यांना अल्ट्रा -लाइट डिझाइन, उत्कृष्ट अत्याधुनिक एआई -शक्तीवर चालणारी कामगिरी, आकर्षक डिस्प्ले, इमर्सिव्ह ऑडिओ, दिवसभर टिकणारी बॅटरी, सर्वोत्तम टायपिंग अनुभव, सेगमेंटमधील अग्रगण्य मिलिटरी-ग्रेड स्थायित्व एंटरप्राइझ-ग्रेड सुरक्षा, सुपर प्रीमियम एंटरप्राइझ-ग्रेड सर्व्हिस सपोर्ट आणि अखंड विस्तारक्षमतेद्वारे खरे लक्ष केंद्रित करण्यास आणि उत्कृष्ट मानसिकता प्राप्त करण्यास सक्षम करण्यासाठी डिझाइन केलेला आहे, जिथे उत्कृष्टतेचा जन्म होतो.

## 'युवाशक्ती जागर मोर्चा'या राज्यव्यापी दौऱ्याचा शुभारंभ

छत्रपती संभाजीनगर - भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने आयोजित 'युवाशक्ती जागर मोर्चा'या राज्यव्यापी दौऱ्याचा मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबईतून दणक्यात शुभारंभ झाला. यामुळे राज्यातील युवकांना राष्ट्रनिर्मितीच्या ध्येयाशी जोडण्याची आणि त्यांच्या उर्जेला सकारात्मक दिशा देण्याची व्यापक मोहीम सुरू झाल्याचे उद्गार भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी काढले.या प्रसंगी भाजपा युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी, भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण हे व्यासपीठावरील सर्वात युवा मनाचे आणि ऊर्जावान नेतृत्व असल्याचे नमूद केले. आपल्या मनोगतात प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी यात्रेचा उद्देश स्पष्ट करताना सांगितले की, "भाजप युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने राबवण्यात येणारा हा अशा प्रकारचा पहिलाच उपक्रम आहे.

## ब्रिटानिया टायगर क्रंचने 'टायगर हिरो हंट' उपक्रम सुरू

मुंबई: जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने ब्रिटानिया टायगर क्रंचने 'टायगर हिरो हंट' हे जनजागृतीवर आधारित ग्राहक अभियान सुरू केले आहे. या उपक्रमाची निर्मिती ही संवादात्मक व सखोल कथन अनुभवाच्या माध्यमातून मुलांना बुलिंगच्या परिस्थिती ओळखण्यास मदत करण्यासाठी करण्यात आली आहे. व्हीएमएलद्वारे संकल्पित हे अभियान सोप्या ऑन-पॅक सक्रियतेच्या माध्यमातून राबविण्यात येते. ब्रिटानिया टायगर क्रंचच्या पॅकवरील क्यूआर कोड स्कॅन करून ग्राहक सखोल व सुज्ज अश्या व्हॉट्सअॅप-आधारित अनुभवात प्रवेश करू शकतात. या अनुभवात त्यांच्या समोर बुलिंगच्या विविध परिस्थिती मांडल्या जातात व त्यावर कसे प्रतिसाद द्यायचे हे ग्राहक ठरवतात. हे प्रारूप अशा वर्तनांची ओळख करून देण्यासाठी तयार करण्यात आला आहे.

## गुरू द्रोणाचार्य यांच्या भूमिकेत दिसणार जितेन लालवानी

सोनी सब प्रेक्षकांना मोहून टाकण्यासाठी सज्ज आहे हस्तिनापुर के वीर या पौराणिक मालिकेसह, जी महाभारतातील सर्वात प्रतिष्ठित पात्रे पांडव आणि कौरव यांच्या बालपणातील प्रवासावर प्रकाश टाकते. शाश्वत मूल्ये आणि कालातीत शिकवणींवर आधारित ही कथा या दंतकथांच्या घडणीमागचा प्रवास जिवंत करते. या कथेला अधिक बळकटी देत आहे अनुभवी अभिनेता जितेन लालवानी, जो मालिकेत द्रोणाचार्याची भूमिका साकारत आहे — तो आदरणीय गुरु ज्यांच्या ज्ञानाने आणि मार्गदर्शनाने पांडव आणि कौरव घडले.

## अर्जुन पुंज यांचे छोट्या पडद्यावर पुनरागमन

सोनी सबवरील यादें जी आपल्या भावनिक कथानकामुळे प्रेक्षकांच्या मनात घर करून बसली आहे, आता एका नव्या रंगतदार वळणासह सज्ज होत आहे. अभिनेता अर्जुन पुंज याच्या पुनरागमनामुळे मालिकेत एक वेगळीच उर्जा आणि नॉस्टॅल्जियाची लहर येणार आहे. तब्बल दहा वर्षांहून अधिक काळानंतर अर्जुन पुंज छोट्या पडद्यावर परतत असून, त्याच्या पुनरागमनाने चाहत्यांमध्ये उत्सुकता आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# सोयगावात संतांच्या समर्थनार्थ भव्य मोर्चा; आक्षेपार्ह वक्तव्याविरोधात संत समाज आक्रमक




तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.२३ एप्रिल

सनातन हिंदू धर्मातील पूजनीय संतांविषयी करण्यात आलेल्या कथीत आक्षेपार्ह वक्तव्याच्या निषेधार्थ संत समाज,वारकरी संप्रदाय आणि सकल हिंदू समाज मोठ्या संख्येने एकवटला.विकास लवांडे यांच्या विरोधात संतप्त जनसमुदायाने दि.२३ गुरुवार रोजी सकाळी ११ वाजता सोयगाव तहसील कार्यालयावर भव्य मोर्चा काढत प्रशासनाला निवेदन सादर केले. या मोर्चादरम्यान संतांविषयी केलेल्या वक्तव्यामुळे धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप करत आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी केली.आंदोलन शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले असले,तरी संबंधितांवर तात्काळ कठोर कारवाई करण्यात यावी,अशी ठाम मागणी करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ह.भ.प.सुधन्वाजी महाराज केनेकर यांनी केले.

यावेळी ह.भ.प.निवृत्ती महाराज मोहने, ह.भ.प.जितेंद्र महाराज पंडित,ह.भ.प.गोपाल महाराज पवार,ह.भ.प.कुमारी जान्हवी दीदी सोनवणे तसेच ह.भ.प. पारस महाराज जैन यांनी आपल्या मनोगतातून संत परंपरेचे महत्त्व अधोरेखित करत संतांचा सन्मान राखणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे सांगितले. मोर्चात परिसरातील वारकरी बांधव व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.ह.भ.प.निलेश महाराज राजपूत, ह.भ.प.शरद महाराज पवार,ह.भ.प.किरण महाराज यांच्यासह अखिल हिंदू समाजातील विविध घटकांनी एकजूट दाखवत निषेधात सक्रिय सहभाग नोंदवला.सोयगाव तहसील कार्यालयात निवेदन सादर करत संबंधित व्यक्तीवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.या घटनेमुळे सोयगाव परिसरात मोठी खळबळ उडाली असून सामाजिक व धार्मिक स्तरावर याचे तीव्र पडसाद उमटत आहेत.

## समाजसेवक सुमित पंडित व पुजा सुमित पंडित यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्काराने सन्मानित

तभा.वृत्तसेवा

**सोयगाव,दि.२३ एप्रिल** | भारत रत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त क्रांती संघटनेच्या वतीने समाजसेवक सुमित पंडित व समाजसेविका पूजा पंडित यांचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले व भव्य नागरी सत्कार सोहळा टीव्ही सेंटर येथे मोठ्या उत्साहात पार पडला.या कार्यक्रमाचे आयोजन क्रांती संघटनेचे संस्थापक राहुल साळवे यांनी केले होते. समाजकार्याच्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय



योगदान दिल्याबद्दल सुमित पंडित व पूजा पंडित यांचा मान्यवरांच्या हस्ते शाल व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.त्यांच्या कार्याची दखल घेत उपस्थितांनी त्यांचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.या प्रसंगी मंचावर अनेक मान्यवर,सामाजिक कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जागर करून सामाजिक बांधिलकी जपण्याचे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमाचे वातावरण उत्साहपूर्ण व प्रेरणादायी होते. उपस्थितांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा गौरव करत समाजात समानता,बंधुता व न्याय यांचे मूल्य रुजवण्याचा संकल्प व्यक्त केला.

## छत्रपती संभाजीनगर-जळगाव महामार्गावर अजिंठा घाटात पुन्हा ट्राफिक जाम

तभा.वृत्तसेवा

**सोयगाव, फर्दापूर ,दि.२३ एप्रिल** | छत्रपती संभाजीनगर-जळगाव महामार्गावर अजिंठा घाटात पुन्हा ट्राफिक जाम बुधवारी सकाळी साडे सहा वाजेपासून ते संध्याकाळी पाच वाजेपर्यंत ट्राफिक जाम यामध्ये जळगाव कडे जाणारा ट्रक एम.एच.१८ बीजे ६८६२ समोरच्या गाडी ला वाचविण्यासाठी सरळ डोंगराच्या कड्यावर आदळला तसेच जळगाव हुन छत्रपती संभाजीनगर कडे जाणारा ट्रक एम.एच.१३ सी.टी.००७७ हा ट्रक अरूंद रस्त्यावर बंद पडल्याने घाटात जाम तर तिसरा ट्रक एम.एच.२६.३४९९ हा जळगाव दिशेने जाताना यांच्या हि इंजिन मध्ये बिघाड झाल्याने रस्त्यावर उभा राहिला असल्याने घाटात मोठ्या प्रमाणात ट्राफीक जाम झाली असल्याने यात शालेय विद्यार्थी




यांचे परिक्षा पेपर सुरू असल्याने मोठी तारांबळ उडाली तसेच लेणी पाहण्यासाठी येणारे देशी विदेशी पर्यटक, प्रवाशी, लग्नासाठी जाणारे नवरदेव तसेच वऱ्हाड , रुग्ण वाहिका यामध्ये अडकले होते तसेच पाच वाजता पुन्हा एक विटांचा ट्रक मध्ये खराब असल्याने पुन्हा जाम झाला होता परंतु त्यांनी ताबडतोब गाडी दुरुस्त करून पुढे निघून गेले फर्दापूर पोलीस स्टेशनचे कर्मचारी आकाश गवळे, फिरोज तडवी, मदतनीस केदार पवार यांनी फर्दापूर परिसरातील वाहने मेकॅनिक आणून गाड्या दुरुस्त करून वाहतूक सुरळीत करण्यात आली.पर्यायी मार्गाने प्रवाशी सोयगाव-हळदा मार्ग तर काही तोंडापूर -धावडा मार्ग छोटे गाड्या निघून गेले विशेष...या घाटात नियमाचे पालन करून गाड्या चालविल्या तर घाटात ट्राफीक जाम होणार नाही परंतु छोट्या चारचाकी वाहने व महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस हे जास्त घाई करून गाड्या पुढे घेतात यामुळे समोरून एकतर्फी वाहने येत असताना मोठा अडथळा निर्माण होतो अशा प्रकारे अजिंठा घाटात ट्राफीक जाम होत आहे वाहने व्यवस्थित एका लाईन ने असल्याने घाटात ट्राफीक जाम जास्त होणार नाही तरी आता शासन प्रशासन किती दिवस अजिंठा घाटाची ट्रॅफिक जाम ची व्यवस्था लावतील याकडे वाहन चालक, पर्यटक, प्रवाशी यांची वाट पाहत आहे.

## जि.प.शिक्षकाने शरीरसौष्ठव स्पर्धेत पटकावले महाराष्ट्र श्रीमान किताब; ब्लु स्टार हेल्थ क्लबने केला सन्मान

तभा वृत्तसेवा

कन्नड - दि. २३ एप्रिल - शिक्षक म्हणजे केवळ ज्ञान देणारा नाही, तर जीवन कसे घडवायचे याचा आदर्श असतो आणि हाच आदर्श आपल्या कर्तृत्वाने सिद्ध केला आहे जि.प. भटाना शाळेतील चाळीस वर्षीय शिक्षक विशाल म्हात्रे यांनी कल्याण येथे दि. ११ एप्रिल रोजी पार पडलेल्या प्रतिष्ठित "महाराष्ट्र श्री" शरीरसौष्ठव स्पर्धेत त्यांनी "महाराष्ट्र श्रीमान (मास्टर) 2025-26" हा मानाचा किताब पटकावला आहे त्यांच्या या यशस्वी



कामगिरीबद्दल शहरातील ब्लु स्टार हेल्थ क्लब तर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात युवकांना मार्गदर्शन करताना त्यांनी एक महत्वाचा संदेश दिला "जगात सर्वात मौल्यवान गोष्ट एकच आहे ती म्हणजे आपले शरीर!"

आजची तरुणाई व्यसनांच्या आहारी जात असून, आरोग्याकडे दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे कमी वयातच हृदयविकार, अर्धांगवायू यांसारख्या गंभीर आजारांना सामोरे जावे लागत आहे. विशाल म्हात्रे पुढे म्हणाले "शरीरयष्टी कोणत्याही वयात घडवता येते. त्यासाठी वयाचे बंधन नसते... गरज असते ती फक्त जिद्द आणि चिकाटीची!"

त्यांच्या या प्रेरणादायी प्रवासाने एक गोष्ट स्पष्ट केली जर इच्छाशक्ती प्रबळ असेल, तर कोणतेही स्वप्न अशक्य नाही! कार्यक्रमाला ब्लु स्टार हेल्थ क्लबचे संचालक धीरज नगराळे, संजय सोनवणे, अमोल साळवे, विशाल मोरे, निलेश गायकवाड, कृष्णा खरे, दयासेन नगराळे, धीरज भोरे, दिनेश आव्हाळे, अमन गुप्ता, कामरान शेख आदी उपस्थित होते.

# ई-केवायसीसाठी शिक्षकांची धावपळ; सोशल मीडियाच्या संदेशाने संभ्रम




तभा वृत्तसेवा

कन्नड, दि. २३ एप्रिल - राज्यातील शासकीय, निमशासकीय, अनुदानित व विनाअनुदानित संस्थांमधील कर्मचाऱ्यांसाठी ई-केवायसी प्रक्रिया बंधनकारक करण्यात आली आहे. संबंधित परिपत्रक सर्व विभागांना देण्यात आले असले तरी सोशल मीडियावर फिरत असलेल्या संदेशांमुळे शिक्षकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

एप्रिल महिन्याचे वेतन ई-केवायसी केल्याशिवाय मिळणार नाही, असा संदेश व्हायरल झाल्याने अनेक शिक्षकांनी घाईघाईने बँकांकडे धाव घेतली. परिणामी, स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कन्नड शाखेत मोठी गर्दी झाली. एकाच वेळी मोठ्या संख्येने कर्मचारी आल्याने काही काळ सर्व्हरही ठप्प झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.


दरम्यान, ई-केवायसी प्रक्रिया विविध माध्यमांतून पूर्ण करता येते. आधार केंद्र, स्मार्टफोन, लॅपटॉप, संगणक तसेच नेट कॅफेच्या माध्यमातूनही ही प्रक्रिया सहज करता येत असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

ई-केवायसी करण्याची अंतिम मुदत ३० ऑगस्टपर्यंत असून ही प्रक्रिया ८ व्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने आवश्यक असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीकडे लक्ष द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

याबाबत मुकुंद कुमार (शाखा व्यवस्थापक) यांनी सांगितले की, "ई-केवायसी करण्यासाठी नागरिकांनी बँकेत गर्दी न करता उपलब्ध पर्यायी सुविधांचा वापर करावा."

## डेल टेक्नॉलॉजीज ने भारतात एआय आधारित ' डेल १५ ' केला लाँच

छत्रपती संभाजीनगर, २१ एप्रिल २०२६ : डेल टेक्नॉलॉजीजने ज्यांना दिवसभरात अधिक गोष्टी साध्य करायच्या असतात, अशा ग्राहकांसाठी डिझाइन केलेला डेल १५ आज भारतात लाँच केला आहे.



इंटेल कोअर अल्ट्रा २ सिरिज एच प्रोसेसरवर आधारित असलेल्या या डिव्हाईसमध्ये ॲरो लेक आर्किटेक्चर आणि एडवांस्ड ऑन-डिव्हाइस एआयसाठी स्वतंत्र एनपीयू उपलब्ध आहे. डेल १५ वापरकर्त्यांना अभ्यास, काम किंवा कुटुंब आणि मित्रांशी संपर्क साधताना अधिक स्मार्ट आणि सीमलेस मल्टीटास्किंगचा आनंद घेण्यास सक्षम करतो. यातील विंडोज ११ मध्ये इंटेलिजंट असिस्टंससाठी समर्पित कोपायलट की,शांत आणि सुरळीत कामगिरीसाठी ॲडॉप्टिव्ह थर्मल टेक्नॉलॉजी आणि जलद चार्जिंगसाठी एक्सप्रेसचार्ज सारख्या वैशिष्ट्यांसह वापरकर्ते आपली कामे सहजपणे पूर्ण करू शकतात आणि दीर्घकाळ कनेक्टेड राहू शकतात. डेल १५ हा एकाच डिव्हाईसमध्ये विश्वासार्हता, नवनिर्मिती आणि शाश्वततेला एकत्र आणतो, ज्यामुळे लोकांना सर्वात महत्त्वाच्या गोष्टी प्राधान्याने पूर्ण करण्यास मदत होते.

## शाही थाटात पार पडला साखरपुड्याचा भव्य सोहळा !



छत्रपती संभाजीनगर, २२ एप्रिल २०२६ : मसालाकिंग धनंजय दातार आणि त्यांच्या पत्नी वंदना दातार यांनी आपल्या सुपुत्र रोहित दातार आणि सानिया नरवाडे यांच्या साखरपुड्याचा भव्य सोहळा मुंबईतील प्रतिष्ठित ताज लँड्स एंड येथे मोठ्या थाटामाटात आयोजित केला. या देखण्या संध्याकाळी कुटुंबीय, मित्रमंडळी आणि शुभेच्छुक मोठ्या संख्येने उपस्थित राहून नव्या आयुष्याच्या प्रवासाला सुरुवात करणाऱ्या या जोडप्यावर आशीर्वादांचा वर्षाव केला.

या सोहळ्यात एक अप्रतिम संगीतमय कार्यक्रम रंगला, ज्यामध्ये प्रसिद्ध गायक सुदेश भोसले आणि वैशाली सामंत यांच्या सादरीकरणांनी वातावरणात उत्साह आणि ऊर्जा भरली. या संगीतसंध्येला आणखी रंगत आणली ती सिद्धांत भोसले यांच्या मधुर आवाजाने, ज्यांनी आपल्या गायनाने उपस्थितांची मनं जिंकली. या खास प्रसंगी वराची आई वंदना दातार यांनी तालावर नृत्य करत आपल्या आनंदाची आणि उत्साहाची सुंदर अभिव्यक्ती केली, हा क्षण सर्वांसाठी खास ठरला.

## कार्बन-न्यूट्रल भविष्यासाठी पुढाकार

बेंगळुरू : अर्थ डे 2026 निमित्त टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने 'अवर पॉवर,अवर प्लॅनेट' या थीमअंतर्गत शाश्वत गतिशीलता आणि पर्यावरण संवर्धनासाठी आपली वचनबद्धता पुन्हा अधोरेखित केली आहे. सातत्यपूर्ण प्रगतीच्या बळावर, कंपनी आपल्या उत्पादनांमध्ये, उत्पादन प्रक्रियेत आणि व्यापक मोबिलिटी इकोसिस्टममध्ये शाश्वततेचा समावेश करून कार्बन-न्यूट्रल भविष्याच्या दिशेने प्रयत्न अधिक मजबूत करत आहे. टोयोटाच्या जागतिक एन्व्हायर्नमेंटल चॅलेंज 2050 शी सुसंगत राहून, टीकेएम स्वच्छ गतिशीलता, हरित पुरवठा साखळी, नवीकरणीय ऊर्जा व ऊर्जा कार्यक्षम तंत्रज्ञानाचा अवलंब, जल व्यवस्थापन, परिपत्र अर्थव्यवस्था पद्धती आणि जैवविविधता संवर्धन या सहा महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये सर्वसमावेशक दृष्टिकोन स्वीकारत आहे. कंपनी 2035 पर्यंत कार्बन-न्यूट्रल उत्पादन प्रक्रिया साध्य करण्याच्या दिशेने आपला प्रवास अधिक वेगाने पुढे नेत आहे.

जा.क्र./जे-३/1692/२०२६
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर,
दि. 08 APR 2026

### चौकशीची जाहीर नोटीस

**सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.**

चौकशी अर्ज क्रमांक जे-३/५१/२०२६ कलम :- १९

न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक: PARWATI FOUNDATION, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR, At.Post. Gut No.४५६ Plot No.१८ Tq. Dist. Chhatrapati Sambhajinagar...

अर्जदार :- Dhanraj Buwaji Hajare

सर्व संबंधित लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, सहाय्यक धर्मादाय आयुक्त छत्रपती संभाजीनगर विभाग छत्रपती संभाजीनगर हे वर नमुद केलेल्या अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वत व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुददयावर चौकशी करणार आहेत.

१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?

२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत न्यासाच्या मालकीची आहे काय?

अ) जंगम मालमत्ता (वर्णन) - १४,०००/-

ब) स्थावर मिळकत (वर्णन) काही नाही.

सदर चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असल्यास अगर पुरावा देणेचा असल्यास त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन तीस दिवसांचे आत या कार्यालयात वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजुन चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचे शिक्यानिशी आज दिनांक ०८/०४/२०२६ रोजी दिली असे.

न्यायशाखा (अधिक्षक)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय छत्रपती संभाजीनगर

### जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. 2025/मशाका/जमाबंदी-१/जन्म-मृत्यु नोंद/सिआर-481

दिनांक 23-02-2026

अर्जदार ०:- प्रकाश सुदाम राठोड रा. पळसवाडी तांडा ता. खुलताबाद जि.छ. संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार ०:- ग्रामपंचायत कार्यालय पळसवाडी ता. खुलताबाद/ता. कन्नड जि. छ.संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ/ ॲड. व्ही के राठोड मार्फत / स्वतः अर्ज सादर करून अर्जदार यांच्या स्वतःचे जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा स्वतः प्रकाश सुदाम राठोड चा जन्म दिनांक 09-12-2000 रोजी पळसवाडी ता. खुलताबाद येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या स्वतः चा जन्म दिनांक 09-12-2000 रोजी पळसवाडी ता. खुलताबाद / ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म/मृत्यू प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांचा स्वतः प्रकाश सुदाम राठोड यांचा जन्म दिनांक 09-12-2000 रोजी पळसवाडी ता. खुलताबाद येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हणजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक 30-04-2026 रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक 09-12-2000 रोजी पळसवाडी ता. खुलताबाद येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही.

करिता दिनांक ...../02/2026 रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

### जाहीर प्रगटण / नोटीस

**मा. विदयमान दिवाणी न्यायाधिश (क स्तर) न्यायालय गंगापुर जि. औरंगाबाद**

दि.कि. अर्ज नं. २५८ /२०२६.

अर्जदार : १) अन्नपुर्णाबाई गोरखनाथ शिंदे वय ७१ वर्षे धंदा घरकाम २) विध्या बाबासाहेब शिंदे वय ४७ वर्षे धंदा-घरकाम, ३) श्रवण बाबासाहेब शिंदे वय १८ वर्षे धंदा मजुरी, ४) रूपाली बाबासाहेब शिंदे वय २६ वर्षे धंदा-मजुरी, ५) रविंद्र गोरखनाथ शिंदे वय ३७ वर्षे धंदा मजुरी, ६) राजेंद्र गोरखनाथ शिंदे वय ३६ वर्षे धंदा मजुरी, सर्व रा. शहापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ७) आशाबाई रंगनाथ गुडदे वय ४५ वर्षे धंदा घरकाम रा. वक्ती ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर ८) उषा रामेश्वर निकम वय ३७ वर्षे धंदा घरकाम रा. उक्कडगांव ता. कोपरगांव जि. अहिल्यानगर विरुध्द

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण :-कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टनुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी अर्जदार यांनी मा. न्यायालयात कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टनुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज श्री.ए.एस. करडे गंगापुर विधीज्ञ यांच्यामार्फत अर्ज सादर केला असुन अर्जदार हे वरील ठिकाणाचे कायमचे रहीवाशी असुन अर्जदार नं. १ यांचे पती, अर्जदार नं. २ यांचे सासरे व अर्जदार नं. ३ व ४ यांचे आजोबा आणि अर्जदार नं. ५ ते ८ यांचे वडील नामे गोरखनाथ किरान शिंदे हे दिनांक २७/०५/२०२५ रोजी मौजे शहापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झाले असुन मयत गोरखनाथ किसन शिंदे यांचे आई वडील यापुर्वीच मयत झाले आहे व तसेच अर्जदार नं. १ यांचा मुलगा, अर्जदार नं. २ यांचे पती व अर्जदार नं. ३ व ४ यांचे वडील नामे बाबासाहेब गोरखनाथ शिंदे हे दिनांक १३/०५/२०२१ रोजी मौजे शहापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झाले आहे. मयत गोरखनाथ किसन शिंदे यांना अर्जदार हे एकमेव कायदेशिर वारसदार असुन मयत बाबासाहेब गोरखनाथ शिंदे यांना अर्जदार नं. १ ते ४ हे एकमेव कायदेशिर वारसदार आहे अर्जदार यांना मयत गोरखनाथ किसन शिंदे व मयत बाबासाहेब गोरखनाथ शिंदे यांच्या वारस कार्यवाही कामी मयत गोरखनाथ किसन शिंदे व मयत बाबासाहेब गोरखनाथ शिंदे यांचे वारराप्रमाणपत्र हे कार्यालयीन व शासकीय कामासाठी आवश्यकता आहे. सदरील वारसप्रमाणपत्र देण्यास अर्जदारांच्या नावाने देण्यात यावे.

त्याअर्थी याबाबत आपला काही आक्षेप अथवा उजर असल्यास तीस दिवसाच्या आत स्वःता अथवा त्यांच्या विधीज्ञामार्फत या न्यायालयात सादर करावा नसता मुद्दतीनंतर वरील अर्जदाराच्या अर्जावर आपला कोणताही आक्षेप नाही असे गृहीत धरून पुढील कार्यवाही केली जाईल. करिता आज दिनांक २२/०४/२०२६ रोजी सही व शिक्कानिशी देत आहे

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक | साहाय्यक अधिक्षक
दिवाणी क स्तर न्यायालय गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

जा.क्र./जे-३/1693/२०२६
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर.
दि.08 APR 2026

### चौकशीची जाहीर नोटीस

**सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.**

चौकशी अर्ज क्रमांक: जे-३/५०/२०२६ कलम :- १९

न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक: JEEVAN JYOT PRATISHTHAN, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR, At. Post. House No.५३८. Avishkar Colony, N-६, CIDCO, Tq. Dist. Chhatrapati Sambhajinagar....

अर्जदार :- Dhurpat Deuba Bhujang

सर्व संबंधित लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, सहाय्यक धर्मादाय आयुक्त छत्रपती संभाजीनगर विभाग छत्रपती संभाजीनगर हे वर नमुद केलेल्या अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वत व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुददयावर चौकशी करणार आहेत.

१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?

२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत न्यासाच्या मालकीची आहे काय?

अ) जंगम मालमत्ता (वर्णन) - १०,०००/-

ब) स्थावर मिळकत (वर्णन) काही नाही.

सदर चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असल्यास अगर पुरावा देणेचा असल्यास त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन तीस दिवसांचे आत या कार्यालयात वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजुन चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचे शिक्यानिशी आज दिनांक ०८/०४/२०२६ रोजी दिली असे.

न्यायशीखा (अधिक्षक)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
छत्रपती संभाजीनगर

### जाहीर प्रगटन

**मा. श्री व्हि. डी. पाटील दिवाणी न्यायाधीश साहेब, कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि. की. अर्ज क्र 160/2026
पुढील तारिख २३/०६/२०२६
अर्जदारः-कै. रामराव रुंजाबा काळे (मयत)

i) श्रीमती मुक्ताबाई भ्र रामराव काळे वय ८५ वर्षे, धंदा-घरकाम, रा. ताडपिंपळगाव ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर, (औरंगाबाद.) ii ) श्री शिवनाथ रामराव काळे वय ६५ वर्षे धंदा शेती, रा. ताडपिंपळगाव ता. कन्नड, जि.छ. संभाजीनगर, (औरंगाबाद.) iii) सौ. मच्छिंद्र रामराव काळे वय ६२ वर्षे धंदा शेती, रा. ताडपिंपळगाव ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर, (औरंगाबाद.) iv) ज्ञानेश्वर रामराव काळे वय ६० वर्षे, धंदा-शेती, रा. ताडपिंपळगाव ता. कन्नड, जि.छ. संभाजीनगर, (औरंगाबाद.)

विरुद्ध

गैरअर्जदारः-निरंक

अर्जः-वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड. अनिल जी. राठोड यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार वरील ठिकाणचे कायमचे रहिवासी आहे. अर्जदार क्रं ।) ही मयत अर्जदार रामराव रुंजाबा काळे यांची पत्नी आसुन मयत रुंजाबा सखाराम काळे यांची सुन आहे व अर्जदार क्रमांक ii) ते iv) हे मयत अर्जदार रामराव रुंजाबा काळे यांचे मुल असुन मयत रुंजाबा सखाराम काळे यांचे नातु आहे. मयत नामे रुंजाबा सखाराम काळे हे अर्जदार रामराव रुंजाबा काळे चे वडिल होते. ते दिनांक. ०९/०९/१९७५ रोजी वृद्धाप काळाने ताडपिंपळगाव येथे मयत झाले आहे. त्यांच्या पश्चात त्यांचा एकुलता एक मुलगा रामराव रुंजाबा काळे व पत्नी मकुबाई रुंजाबा काळे हे होते. ते दोघेही सध्या मयत आसुन दोंघाचा मृत्यु प्रमाणपत्र सोबत दिले आहे. तसेच रुंजाबा सखाराम काळे यांच्या नावे ताडपिंपळगाव येथे नगर भूमापन क्रमांक १६७, क्षेत्र २०९.०५ चौ. मी. अशी मालमत्ता आहे. रुंजाबा सखाराम काळे यांची आई देखील मयत झालेली आहे. ३) हे की, रुंजाबा सखाराम काळे यांची वंसावळ खालील प्रमाणे देत आहे.

रुंजाबा सखाराम काळे (मयत)
पत्नी — मुलगा — आई
१) मकुबाई रूंजाबा काळे (death) २) रामराव रुंजाबा काळे । (death) ३) बाळाआई सखाराम काळे (death)
१) मुक्ताबाई रामराव काळे (पत्नी)
२) शिवनाथ रामराव काळे (मुलगा)
३) मच्छींद्र रामराव काळे (मुलगा)
४) ज्ञानेश्वर रामराव काळे (मुलगा)

वरील नमूद व्यक्ती ह्या सदर मयत रुंजाबा सखाराम काळे यांचे कायदेशीर वारसदार आहेत. सदर मालमत्तेबाबत पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदार यांना शासकीय तसेच निमशासकीय कार्यालयात वारसाची नोंद करण्यासाठी, तसेच विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी, तसेच महसूल दप्तरी वारसाचे मिळकतीत नोंद करण्यासाठी सदरील वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. वरील अधिकाऱ्यांनी न्यायालयातून वारस प्रमाणपत्र घेऊन या असे सांगितल्यावरून सदरील प्रकरण वारस प्रमाणपत्र मिळावे म्हणून अर्ज दाखल करीत आहे. अर्जदार क्रं. । ते iv हे मयताचे वारस असून अर्जदाराशिवाय मयतास इतर कोणीही वारस नाही. अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी इतर कोणत्याही न्यायालयात अर्ज केलेला नाही. तसेच वारस प्रमाणपत्र घेतलेले नाही. अर्जदार हे मे. न्यायालयाच्या कार्यक्षेत्रेत राहत असल्याने सदरील वारस प्रमाणपत्र देण्याचा हक्क व अधिकार मे न्यायालयास आहे. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास कुठल्याही स्वरूपाचा उजर अक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रकटन प्रसिद्ध झाल्यापासून तिस (३०) दिवसांच्या आत आपला उजर आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजेर अक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल त्यानंतर आलेला उजर अक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक. २२/०४/२०२६

आदेशावरून
व्ही.एम.पाखरे
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड.

CMKK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ग्रंथालय व व्यवस्थापन पुस्तकाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२३ एप्रिल -**

जागतिक पुस्तक दिनानिमित्त हरी महामुनी लिखित ग्रंथालय व व्यवस्थापन या पुस्तकाचे प्रकाशन उत्साहात संपन्न झाले.

कार्यक्रमाला विद्या विकास मंडळाचे सहसचिव तथा शंकरराव पाटील कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष शिंदे आणि वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अनुराधा जगदाळे प्रमुख उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी पुस्तकाचे महत्व अधोरेखित करत ग्रंथालय व्यवस्थापन क्षेत्रात या पुस्तकाचे योगदान मोलाचे ठरणार असल्याचे मत व्यक्त केले.

हरी महामुनी यांच्या कार्याचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.





## ▸▸ संक्षिप्त वृत्त...



### डोकेवाडीत पशु रोगनिदान शिबीर संपन्न

**भूम, दि.२३ एप्रिल -**

पशु चिकित्सालय गिरवली यांच्या मार्फत दि.२२ रोजी भूम तालुक्यातील डोकेवाडी येथे जिल्हा परिषद कामधेनू दत्तक योजनेअंतर्गत पशु रोगनिदान शिबीर आयोजित करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन पंचायत समिती सदस्य बाळासाहेब खरवडे यांच्या हस्ते झाले. यावेळी तालुका पशुधन विकास अधिकारी डॉ. एस.बी. चिकबिरे, पशुधन विकास विस्तार अधिकारी डॉ.एस.ए. दुगम, पशुधन विकास अधिकारी डॉ.के. सी. रेड्डी, पशुधन पर्यवेक्षक एम.एस. पटेल तसेच पशुसखी जान्हवी चव्हाण व सविता आहेर उपस्थित होते. शिबिरात गावातील अनेक पशुधनाची तपासणी करून औषधांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी सुरेश खैरे, विजयकांत शेजाळ, शिवाजी कोळेकर, पांडुरंग चव्हाण यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.



### अहवाल न सादर केल्याने शेतकऱ्यांचे आक्रोश आंदोलन

**नळदुर्ग, दि.२३ एप्रिल -**

विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांनी स्मरणपत्र देऊनही जिल्हाधिकाऱ्यांकडून पोलीस बंदोबस्तासंदर्भातील सतोष राऊत, उपविभाग अधिकारी (धाराशिव) यांच्याबाबतचा सद्यस्थिती अहवाल सादर न केल्याचा आरोप करत शेतकरी संघर्ष समिती व राष्ट्रीय महामार्ग बाधित शेतकऱ्यांच्या वतीने नळदुर्ग येथील अप्पर तहसील कार्यालयासमोर आक्रोश आंदोलन करण्यात आले.
या आंदोलनात दिलीप जोशी, सरदारसिंग ठाकूर, म हादेव बिराजदार, महेश घोडके, बालाजी ठाकूर, प्रताप ठाकूर, दिलीप पाटील, गुलाब शिदे, पंडित पाटील, काशिनाथ काळे, बंडू मोरे, तोलू पटेल, आजमोद्दीन शेख, पिरपाशा इनामदार, श्रीकांत पोतदार यांच्यासह अनेक बाधित शेतकरी उपस्थित होते.

### बाळासाहेब मांगले यांची बी.एल.ए.पदी निवड

**भूम, दि.२३ एप्रिल -**

युवा सेना जिल्हाप्रमुख बाळासाहेब मांगले यांची २४३ परंडा-वाशी विधानसभा मतदारसंघासाठी



शिवसेना परंडा विधानसभा बी.एल.ए.पदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या पक्षनिष्ठा, कौशल्य व जनसंपर्काच्या कामाची दखल घेऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व आ.डॉ. तानाजीराव सावंत यांच्या आदेशानुसार ही नियुक्ती करण्यात आली. नियुक्तीपत्र शिवसेना पक्षाचे सचिव संजय मोरे यांच्या हस्ते देण्यात आले. बुथनिहाय प्रमुखांची नियुक्ती व नोंदणीचे काम करून गाव तिथे शिवसेना आणि घर तिथे शिवसैनिक हे अभियान प्रभावीपणे राबविण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. यावेळी दत्ता साळुंखे, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक संचालक केशव सावंत, सावंत प्रतिष्ठानचे रामचंद्र घोगरे तसेच शिवसेना, युवा सेना व महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले.



### रूपामाता उद्योग समूहास अजित लाकाळ यांची सदिच्छा भेट

**धाराशिव, दि.२३ एप्रिल -**

शिवसेनेचे धाराशिव तालुका प्रमुख तथा नूतन जि.प. सदस्य अजित लाकाळ यांनी रूपामाता उद्योग समूहाच्या प्रधान कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. यावेळी रूपामाता उद्योग समूहाचे कार्यकारी संचालक ॲड. अजित गुंड पाटील यांच्या हस्ते लाकाळ यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. या भेटीदरम्यान राजकीय, सामाजिक तसेच युवकांसाठी उद्योग व रोजगार निर्मिती या महत्त्वाच्या विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मितीला चालना देण्यासाठी विविध उपक्रम राबविण्याबाबत सकारात्मक विचारविनिमय झाला. या प्रसंगी ॲड. शरद गुंड पाटील, अमोल गुंड पाटील, थळकरी, कैलास गोरे, प्रेमनाथ पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

# जिल्ह्यात 'लोटा बहाद्दर' वाढले : स्वच्छ भारत मिशनची गती मंदावली!

**▸▸ जिल्हा कागदोपत्री ओडीएफ, प्रत्यक्षात स्वच्छतेचे प्रश्न गंभीर; शासकीय कार्यालयातही स्वच्छता गृहांची दुरावस्था... ▸▸ नागरिक पुन्हा जुन्या सवयींकडे...**




**अनिल आगलावे**
**धाराशिव, दि.२३ एप्रिल -**

जिल्ह्यात स्वच्छतेबाबत कागदोपत्री प्रगतीचे दावे होत असताना प्रत्यक्षात मात्र परिस्थिती चिंताजनक असल्याचे चित्र समोर येत आहे. ग्रामीण भागातच नव्हे तर अनेक सार्वजनिक ठिकाणी उघड्यावर शौचास जाणाऱ्यांची स्थानिक भाषेत 'लोटा बहाद्दर' संख्या पुन्हा वाढताना दिसत आहे. यामुळे स्वच्छ भारत मिशन अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

जिल्हा प्रशासनाच्या अहवालांम ध्ये धाराशिव जिल्हा स्वच्छतेच्या बाबतीत राज्यात अग्रेसर असल्याचा दावा केला जातो. मात्र गावोगावी प्रत्यक्ष पाहणी केली असता अनेक ठिकाणी शौचालयांची कमतरता, अपूर्ण बांधकाम, तसेच वापरात नसलेली शौचालये असे वास्तव समोर येते. काही गावांमध्ये शौचालये उभारली असली, तरी पाणीपुरवठ्याअभावी ती निष्प्रभ ठरत आहेत.

जिल्हा 'ओडीएफ' (उघड्यावर शौचमुक्त) घोषित असला, तरी अनेक ठिकाणी महिलांसाठी वापरयोग्य शौचालये उपलब्ध नाहीत. काही ठिकाणी स्वच्छता गृहे अपूर्ण आहेत, तर काही ठिकाणी पाणी, देखभालीअभावी ती बंद पडली आहेत. त्यामुळे महिलांना पहाटे किंवा रात्री उघड्यावर जाण्याची वेळ येत असून त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही निर्माण झाला आहे. स्वच्छतेच्या बाबतीत केवळ ग्रामीण भागच नव्हे, तर शासकीय कार्यालये, तहसील कार्यालये, शासकीय रुग्णालये, पंचायत समि त्या आणि सार्वजनिक ठिकाणांचीही अवस्था समाधानकारक नाही. अनेक ठिकाणी स्वच्छतागृहांची दयनीय अवस्था असून नियमित साफसफाई होत नसल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जात आहेत. परिणामी नागरिकांना पर्याय नसल्याने उघड्यावर जाण्याची वेळ येत आहे. ग्रामीण भागात घरोघरी शौचालये आहेत, पण पाणी नाही, साफसफाई नाही, त्यामुळे वापरणे कठीण जाते, अशी प्रतिक्रिया अनेक गावांमधील नागरिकांनी दिली. काही ठिकाणी शौचालये अपूर्ण अवस्थेतच सोडण्यात आली आहेत. उघड्यावर शौचास जाण्यामुळे परिसर अस्वच्छ राहतो आणि संसर्गजन्य आजारांचा धोका वाढतो.

स्थिती सुधारण्यासाठी केवळ शौचालये उभारणे पुरेसे नसून त्यांचा नियमित वापर आणि देखभाल यावर भर देणे आवश्यक आहे. ग्रामपंचायतींनी स्वच्छता समित्या सक्रिय करणे, महिला सहभाग वाढवणे, तसेच जनजागृती मोहिमा प्रभावीपणे राबवणे गरजेचे आहे.

जिल्हा प्रशासनाने या समस्येची दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्याचे सांगितले जात असले, तरी प्रत्यक्षात बदल कधी होणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. स्वच्छतेच्या बाबतीत कागदोपत्री यश आणि प्रत्यक्ष वास्तव यामधील दरी भरून काढणे हीच आता प्रशासनासमोरील खरी कसोटी ठरणार आहे.

### महिला कारभारी, पण महिलांचीच कुचंबना...

धाराशिव जिल्ह्यात ग्रामपंचायत व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील जिल्हा परिषद असो किंवा पंचायत समितीत पन्नास टक्के पेक्षा अधिक महिला कारभाऱ्यांचे प्रमाण वाढले असले, जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्षा, पंचायत समिती सभापती, उपसभापती विशेष समितीवर आशा अनेक पदावर आज महिलांना संधी मिळाली आहे तरी म हिलांच्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसते. महिलांसाठी स्वतंत्र, सुरक्षित आणि स्वच्छ स्वच्छतागृहांचा अभाव ही गंभीर समस्या बनली आहे.

### ग्रामीण भागात समस्या अधिक तीव्र...

ग्रामीण भागात उघड्यावर शौचास जाण्याचे प्रमाण वाढत असल्याचे विशेषतः जाणवते. शौचालये असूनही पाणीटंचाई, स्वच्छतेचा अभाव आणि देखभालीची कमतरता यामुळे नागरिक पुन्हा जुन्या सवयींकडे वळत आहेत.स्वच्छ भारत अभियान हे फक्त अभियान म्हणून यशस्वी झाल्याचे चित्र असून वास्तव मात्र काहीच बदल होताना दिसून येत नाही. गावोगावी लोटा बहाद्दरांची संख्या वाढलेली आहे.

# उमरग्यात सरकारी कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप तीव्र

**▸▸ तहसील कार्यालय ठप्प, नागरिकांची गैरसोय वाढली**



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२३ एप्रिल -**

राज्यातील सरकारी व निमसरकारी कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी २१ एप्रिलपासून पुकारलेल्या बेमुदत संपाचा परिणाम उमरगा तालुक्यातही तीव्र स्वरूपात जाणवत आहे. उमरगा तहसील कार्यालयातील कर्मचारी संपाच्या दुसऱ्या दिवशीही कामबंद आंदोलनात सहभागी झाल्याने संपूर्ण कार्यालयीन कामकाज ठप्प झाले आहे.

राज्यातील सुमारे १७ लाख कर्मचारी व शिक्षक विविध प्रलंबित म ागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी संपावर गेले आहेत.

यामध्ये जुनी पेन्शन योजना लागू करणे, निवृत्तीचे वय ६० वर्षे करणे, रिक्त पदे तात्काळ भरणे, कंत्राटी कर्मचाऱ्यांचे नियमितीकरण तसेच कॅशलेस आरोग्य विमा योजना लागू करणे या प्रमुख मागण्यांचा समावेश आहे.

उमरगा तहसील कार्यालयात दाखले, प्रमाणपत्रे आणि महसूल संबंधित कामे पूर्णपणे ठप्प झाली आहेत. कामासाठी आलेल्या नागरिकांना ताटकळत राहावे लागून अनेकांना परत जावे लागत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे की, गेल्या दीड वर्षांपासून शासनाकडून फक्त आश्वासने दिली जात आहेत, मात्र ठोस निर्णय घेतला जात नसल्याने अखेर आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागला आहे. मागण्या मान्य होईपर्यंत संप सुरूच राहणार असल्याचा इशाराही कर्मचाऱ्यांनी दिला आहे.

या संपात भागवत गायकवाड (तालुकाध्यक्ष, राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना उमरगा), नेताजी गायकवाड, गजानन नरवडे, मकबूल शेख, दत्तात्रय सूर्यवंशी, श्रीमती मनीषा कदम, सहाय्यक महसूल अधिकारी संदीप पानमाच्यांना, दीपक चव्हाण, मनोज यमुलवाड, शिवराज खुर्दे, महेश कानडे, कैलास ठमके, संजय कोकाटे, कु. निकिता सांगवे, ग्रामसेवक अधिकारी गुणाजी ढोणे, शिवशंकर मंडले, प्रकाश शिंदे, गौरी कांबळे, बालाजी पांचाळ, मधुकर पाटील आदी कर्मचारी सहभागी झाले आहेत.

# भोसा गावासाठी एस.टी. बसची मागणी; विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी प्रवासाचा प्रश्न ऐरणीवर

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२३ एप्रिल -**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट) कळंब तालुक्याच्या वतीने भोसा गावातील विद्यार्थ्यांसाठी एस.टी. बस सेवा सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, कळंब आगार प्रमुखांना निवेदन देण्यात आले.



निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, भोसा हे गाव स्थापनेपासूनच एस.टी. सेवेतून वंचित राहिले आहे. पूर्वी नदीवर पूल नसल्यामुळे बस सेवा सुरू करणे शक्य नव्हते. मात्र आता पुलाचे बांधकाम पूर्ण झाल्याने परिस्थिती बदलली असूनही गावात अद्याप बस सेवा सुरू करण्यात आलेली नाही.

भोसा येथून दररोज सुमारे ५० विद्यार्थी-विद्यार्थिनी शिक्षणासाठी बाहेरगावी जातात. काही विद्यार्थी कळंब व धाराशिव येथे उच्च व महाविद्यालयीन शिक्षण घेत आहेत. बस सेवा उपलब्ध नसल्यामुळे त्यांना पायी किंवा खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागत आहे. विशेषतः उन्हाळा व पावसाळ्यात ही समस्या अधिक तीव्र होत असून विद्यार्थ्यांना म ोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. परिणामी अनेक विद्यार्थिनी शिक्षणापासून वंचित राहण्याची भीती व्यक्त केली जात आहे. यामुळे कळंब-गौर-ढोकी तसेच कळंब-गौर-धाराशिव या मार्गावरील एस.टी. बस भोसा येथे वळवून नियमित सेवा सुरू करावी व कायमस्वरूपी बस सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने या मागणीवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी विनंतीही करण्यात आली आहे.

या निवेदनावर त्रिंबक पाटील, प्रशांत कांबळे, वासुदेव पाटील, शिवाजी लोखंडे, चेतन वाघमारे, तुषार वाघमारे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## फौजिया सादेकची महाराष्ट्र पोलीसात निवड

**▸▸ अपंग वडिलांची जिद्द ठरली यशाची गुरुकिल्ली**

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२३ एप्रिल -**

तालुक्यातील डिकसळ ग्रामपंचायत हद्दीतील इस्लामपुरा येथील अपंग शेख सादेक यांची मुलगी शेख फौजिया सादेक हिने जिद्द, चिकाटी आणि परिश्रमाच्या जोरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तिची निवड महाराष्ट्र पोलीस पुणे पदावर झाल्याने परिसरात आनंदाचे वातावरण असून सर्वत्र तिचे कौतुक होत आहे.

शेख सादेक हे दोन्ही पायांनी अपंग असूनही त्यांनी आपल्या अपंगत्वावर मात करत कुटुंबाचा संसार समर्थपणे सांभाळला. स्वतःच्या अडचणींकडे दुर्लक्ष करून त्यांनी आपल्या म ुलीच्या उज्ज्वल भविष्यासाठी शिक्षण, संस्कार आणि योग्य मार्गदर्शन दिले. त्यांच्या अथक प्रयत्नांचे फळ म्हणून फौजियाने वडिलांचे स्वप्न साकार केले.



फौजिया हिने कठोर मेहनतीच्या जोरावर पोलीस सेवेत स्थान मिळवून केवळ आपल्या कुटुंबाचेच नव्हे तर संपूर्ण गावाचे नाव उंचावले आहे. तिच्या यशामुळे अनेक तरुणांना प्रेरणा मिळत आहे.

शेख सादेक हे प्रहार संघटनेचे मार्गदर्शक म्हणूनही कार्यरत असून त्यांनी सम ाजकार्यात सक्रिय सहभाग घेतला आहे. आपल्या जबाबदाऱ्या पार पाडत असताना त्यांनी मुलीला योग्य दिशा दिली आणि एक आदर्श घडविला.

फौजियाच्या या यशाबद्दल प्रहार संघटनेचे तालुकाध्यक्ष गणेशजी शिंदे यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला. यावेळी तिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला.

# धाराशिव-अहिल्यानगरला जोडणाऱ्या रस्ते मार्गाची दुरावस्था

**खड्डेमय रस्ता, वाहून गेलेला पूल आणि प्रशासनाची उदासीनता**

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२३ एप्रिल -**

धाराशिव व अहिल्यानगर जिल्ह्यांना जोडणाऱ्या ईट-पखरूड-जोतिबाचीवाडी-नळीवडगाव या महत्त्वाच्या मार्गाची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे.

मागील तीन वर्षांपासून रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून, २२ सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या अतिवृष्टीत या मार्गावरील पूल वाहून गेला होता. मात्र आजतागायत त्याची दुरुस्ती करण्यात आलेली नाही.



याशिवाय, धोकादायक ठिकाणी कोणतेही सुरक्षा फलक किंवा इशारे लावण्यात आलेले नसल्याने प्रवाशांच्या जीविताला गंभीर धोका निर्माण झाला आहे.

धार्मिक, शैक्षणिक आणि आर्थिक दृष्ट्या हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा असून पखरूड येथील बेलेश्वर मंदिर व भैरवनाथ मंदिर तसेच जोतिबाचीवाडी येथील जागृत देवस्थान जोतिबा येथे दररोज शेकडो भाविक दर्शनासाठी येतात.

मात्र खराब रस्त्यामुळे त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, प्रशासनाने या गंभीर समस्येकडे पूर्णतः दुर्लक्ष केले आहे.

अनेक वेळा तक्रारी करूनही कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही.

झोपलेल्यांना जागे करता येते, पण झोपेचे सोंग घेणाऱ्याला कसे जागे करावे? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. दररोज प्रवास करताना मोठ्या खड्ड्यांमुळे प्रचंड हालअपेष्टा सहन कराव्या लागतात. सततच्या धक्क्यांमुळे शरीर अक्षरशः खिळखिळे होते असून अनेकांना मणक्याचे त्रास होत आहेत. संबंधित विभागाने तातडीने दखल घेऊन रस्त्याची दुरुस्ती करावी, असे हनुमान हुंबे (संभाजी ब्रिगेड तालुकाध्यक्ष, भूम) यांनी सांगितले.

दरम्यान, रस्त्याच्या दुरुस्तीचे काम तात्काळ हाती घ्यावे, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्राम स्थांनी दिला आहे.

प्रशासनाने तातडीने दखल घेऊन आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

### निष्काळजी दुचाकी चालविल्याने तरुणाचा मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ एप्रिल -**

पुणे-हैदराबाद मार्गावर जकेकुर गावाजवळ दुचाकी अपघातात एका तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे.

दि.१४ एप्रिल रोजी सकाळी विशाल अरुण सोनकांबळे (वय २२) यांनी दुचाकी निष्काळजीपणे चालविल्याने मागे बसलेले तानाजी भिमराव सोनकांबळे (वय २२) हे खाली पडून गंभीर जखमी झाले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी नेताजी विठ्ठल कांबळे (रा. जकेकुर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून उमरगा पोलीस ठाण्यात आरोपी विशाल सोनकांबळे याच्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# खुर्च्या उबवणाऱ्यांचे ‘प्रदूषण’

भारतीय संविधानानुसार प्रत्येक भारतीय नागरिकाला जगण्याचा मूलभूत अधिकार आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचे संरक्षण देण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाने विविध खटल्यांत दिलेल्या निर्णयानुसार, जगण्याच्या अधिकारात केवळ श्वास घेणे अभिप्रेत नसून, आरोग्यदायी वातावरणात जगण्याचा अधिकारदेखील या तरतुदीचा अविभाज्य भाग मानला गेला आहे. संविधानाच्या कलम ४८-अ मध्ये सरकारला पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्याची जबाबदारी दिलेली आहे. भारतातील सध्याचे प्रदूषण आणि त्यातून निर्माण होणारे प्रश्न पाहिले तर संविधानातील तरतुदींची आपल्याला खरोखर काही कदर आहे काय, असा प्रश्न निर्माण होतो. देशभरात प्रदूषणाच्या नियंत्रणासाठी यंत्रणा आहेत. त्यांच्यावर सरकार खर्च करते. अर्थातच नागरिकांकडून कराच्या स्वरूपात संकलित केलेल्या पैशांतून. नागरिक हा खर्च करतातच. शिवाय, ते प्रदूषण झेलतात, आजारीही पडतात आणि आणखी खर्च करतात. आपण महाराष्ट्रापुरते पाहिले तरी प्रगतीच्या नावाखाली पर्यावरण नासविण्याचा अफाट पराक्रम सुरू असल्याचे दिसते. पर्यावरण रक्षण व त्यासंबंधीच्या कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी राज्य सरकारने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (एमपीसीबी) स्थापन केले आहे. हे मंडळ खरोखर आपले कर्तव्य यथायोग्य पार पाडत आहे का, असा प्रश्न उपस्थित व्हावा एवढी भयाण अवस्था राज्यातल्या दहा सर्वाधिक प्रदूषित शहरांमध्ये दिसते. उद्योगांना होणारा नफा हा निष्पाप जनतेच्या जिवावर कमावलेला नसावा, याचे साधे भान एमपीसीबीला असू नये, याचे नवल वाटते. ताज्या अहवालानुसार, राज्यात मालेगाव, परभणी, चंद्रपूर, कोल्हापूर, बोईसर, बेलापूर (नवी मुंबई), नांदेड, औरंगाबाद, नाशिक, भिवंडी, ठाणे, पुणे, नागपूर आदी अनेक शहरांमध्ये हवेची गुणवत्ता अतिशय वाईट आहे. या बहुतेक शहरांमध्ये कोळसा जाळणारे लहान मोठे उद्योग, औष्णिक वीज केंद्रे, त्यातून निर्माण झालेली फ्लाय ॲश, कोळसा खाणी, अवैध कोळसा डेपो, कोल वॉशरीज, रिफायनरी हे सारे आहे. वाहनांमुळे होणारे प्रदूषण, बांधकामांची धूळ, औद्योगिक सांडपाणी हेही कमालीच्या पातळीवर आहे. तेथील हवेची गुणवत्ता अनेकदा, विशेषतः हिवाळ्यात धोकादायक श्रेणीत नोंदली जाते. चंद्रपुरात तर या नववर्षाच्या स्वागतालाच ३१ पैकी तब्बल ३० दिवस कमाल प्रदूषण होते. एमपीसीबीचे अधिकारी पाण्यात असूनही कोरडे असल्याचा आव आणत असतात. विदर्भाच्या एका टोकावर असलेले चंद्रपूर हे महानगर आणि आसपासचा परिसर सातत्याने प्रदूषणाच्या विळख्यात आहे. अर्थ मंत्री राहिलेले भाजपाचे ज्येष्ठ आमदार सुधीर मुनगंटीवार यांना हा विषय विधानसभेत रेटावा लागला. पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांना चंद्रपूरच्या महाऔष्णिक वीज केंद्र व बेलसणी येथील कोल वॉशरीज आणि कोल डेपोचे प्रदूषण पाहण्यासाठी दौरा आखावा लागला. असे म्हणतात की, तेथे गेल्यानंतर मुंडे यांची पांढरी शुभ्र कार कोळशाच्या धुळीने अगदी काळीकुट्ट झाली होती! यापेक्षा आणखी कोणता दुसरा पुरावा एमपीसीबीला आणि प्रशासनाला हवा आहे?

एमपीसीबीच्या चंद्रपूरच्या प्रादेशिक अधिकाऱ्यांविरुद्ध फौजदारी गुन्हा नोंदवण्यासाठी सोमवारी आमदार सुधीर मुनगंटीवार यांना चक्क पोलिस ठाण्यात जावे लागले. त्यांनी हा ‘एफआयआर’ दाखल करून यंत्रणेला जो हिसका दिला आहे, तो राज्यातील जनतेच्या संतापाचे प्रतिनिधित्व करणारा मानला पाहिजे. आ. मुनगंटीवार यांची तक्रार केवळ प्रशासकीय निष्काळजीपणाची नाही. ती कायद्याने सोपवलेल्या कर्तव्याचे जाणीवपूर्वक उल्लंघन करून, नागरिकांच्या मूलभूत अधिकारांवर थेट परिणाम करणारी कृती केल्याबद्दलची आहे. ‘एमपीसीबी’च्या प्रादेशिक अधिकाऱ्याने वेळीच प्रदूषण रोखण्यासाठी पावले न उचलल्याने परिसरातील शेतकऱ्यांचा कापूस काळवंडला. त्यांचे मोठे नुकसान झाले. गावातून बाहेर पडताच त्यांच्या नाकातोंडात कोळशाची राख जात असते, ते वेगळेच. चंद्रपूर तालुक्यातील एका कोल वॉशरीचा विषय तर धक्कादायक आहे. या कोल वॉशरीच्या प्रदूषणामुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. अनेक जनावरे मृत्युमुखी पडली. शासन नियुक्त समितीने परिस्थितीचा पंचनामा करून ६८ लाख रुपयांची नुकसानभरपाई निश्चित केली. मात्र, ती अद्याप या कंपनीकडून वसूल करण्यात आलेली नाही. नुकसानभरपाई वसूल करण्याची जबाबदारी प्रादेशिक अधिकाऱ्यांची होती. त्यांनी आपले कर्तव्य पार पाडले नाही आणि म्हणून शेतकऱ्यांचा संताप आ. मुनगंटीवारांच्या तक्रारीतून व्यक्त झाला. एमपीसीबीच्या अधिकाऱ्यांची ही अकार्यक्षमता साधी नाही. ते जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, वायू (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम आणि पर्यावरण संरक्षण अधिनियमातील तरतुदीनुसार नागरिकांच्या अधिकारांचे थेट उल्लंघन आहे. अशा प्रकरणात सत्ताधारी पक्षातील लोकप्रतिनिधीलाच पोलिस ठाण्याची पायरी चढावी लागते, तेव्हा कायदा पाळण्याची जबाबदारी सरकारी यंत्रणेवर आहे की नाही, असा प्रश्न पडणे स्वाभाविक असते.

एकेकाळी चंद्रपूर आणि परिसरात कोळसा साठा असल्याचे निष्पन्न झाले आणि या भागात मोठ्या संख्येत वेकोलिच्या कोळसा खाणी आल्या. मग महाऔष्णिक वीज केंद्र उभे राहिले. लहान मोठे कॅप्टिव्ह कारखानेही तयार झाले. या परिसराचा विकास होण्यासाठी ही पर्वणी मानली गेली. पण हळूहळू अतिरेक झाला. कोळशाची धूळ वातावरण दूषित करू लागली. शेतीवर, नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम झाला. जास्त नफा कमवण्यासाठी चंद्रपूर-घुग्घूस मार्गावर अवैध कोल डेपो उभे राहिले. आज रोजी या रस्त्याच्या कडेला दहाहून अधिक कोल डेपो आहेत. पण एमपीसीबीच्या प्रादेशिक अधिकाऱ्यांच्याच वक्तव्यानुसार, त्यातील केवळ दोघा-तिघांकडेच परवाना आहे, आता बोला! केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने (सीपीसीबी) ने २००९-१० मध्ये केलेल्या सर्वसमावेशक पर्यावरण प्रदूषण निर्देशांक (सीईपीआय) मानांकनानुसार, चंद्रपूर ८३.८८ गुणांसह चौथ्या क्रमांकावर होते. त्यानंतर २०१७-१८ मध्ये ‘सीपीसीबी’ने पुन्हा एकदा पाहणी केली असता, चंद्रपूरच्या पाणी आणि जमिनीच्या ‘सीईपीआय’ गुणांमध्ये तर घट झाली; मात्र, हवेच्या प्रदूषणाशी संबंधित गुणांमध्ये मोठी वाढ झाल्याचे समोर आले. शासन निर्णयानुसार, ३१ डिसेंबर २०१८ रोजी पर्यावरण विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय देखरेख समिती स्थापन झाली. एमपीसीबीच्या सदस्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली, कृती आराखड्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व संबंधित घटकांसोबत विविध बैठका घेतल्या गेल्या. भेटींसाठी संबंधित प्रादेशिक अधिकाऱ्यांचे देखरेख पथक गठित केले गेले. तसेच, प्रगतीचा आढावा घेण्यासाठी महाराष्ट्र शासनाचे प्रधान सचिव (पर्यावरण विभाग) आणि मुख्य सचिव यांनी वेळोवेळी बैठका घेतल्या, पाहणी केली. आराखड्यांवर आराखडे तयार झालेत. पण प्रत्यक्षात ठोस पावले उचललीच गेली नाही. त्या काळी प्रदूषणात चौथ्या क्रमांकावर असलेले चंद्रपूर आता २०२६ मध्ये तिसऱ्या क्रमांकावर आहे! जवळपास अशीच स्थिती अख्ख्या महाराष्ट्रातील अनेक मोठ्या शहरांची आहे.

राज्यात उद्योग यायला हवेत, गुंतवणूक वाढायला हवी, यात वाद नाही. पण त्यासाठी जनतेच्या जिवाचा आणि शेतकऱ्यांच्या पिकांचा बळी दिला जाऊ शकत नाही. कारखान्यांमधील धुळीचे कण, फ्लाय ॲश हवेत मिसळू नयेत म्हणून चिमणीतून बाहेर पडण्याआधी ‘ईएसपी’ नावाचे यंत्र लावले जाते. ‘इलेक्टोस्टॅटिक चार्ज’ दिल्याने धुरातील धूलिकण या यंत्राच्या प्लेट्सना चिकटतात आणि हवेचे प्रदूषण रोखण्यास मदत होते. या यंत्राचा वीज खर्च जास्त येत असल्याने बहुतांश उद्योजक हे यंत्र बंदच ठेवतात. ते तपासण्याची जबाबदारी मंडळाच्या अधिकाऱ्यांची असते. ते आपले कर्तव्य यथायोग्य पार पाडत आहेत असे गृहीत धरले, तर मग जेथे-जेथे कारखाने आहेत, तेथील हवा प्रदूषित कशी आणि प्रदूषित शहरांचा निर्देशांक सातत्याने का वाढत आहे? एमपीसीबी असो वा अन्य ठिकाणची नोकरशाही; प्रदूषणाचा प्रश्न गंभीर होण्यास खुर्ची उबविणारे नोकरशहा जबाबदार आहेत. सरकारने विकास करावाच. पण, तो जनतेच्या जिवावर उठणारा असू नये, याची काळजी घ्यावी. त्या काळजीचा भाग म्हणून या खुर्चीधारी प्रदूषकांना तत्काळ हटविले पाहिजे आणि त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली पाहिजे.

## तंत्रवेध

# नावीन्यपूर्णतेच्या युगाचा करा स्वीकार

डॉ. दीपक शिकारपूर

आजच्या काळात जग झपाट्याने बदलत आहे. तंत्रज्ञान, शिक्षण, करीअरच्या संधी आणि जीवनशैली या सर्व गोष्टींमध्ये मोठे परिवर्तन होत आहे. जग अशा एका टप्प्यावर उभे आहे, जिथे तंत्रज्ञान अभूतपूर्व वेगाने बदलत आहे. जागतिक माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलून गेला आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये ओरॅकल, ॲमेझॉन आणि मायक्रोसॉफ्ट यासारख्या मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये झालेल्या कर्मचारी कपातीच्या (ले-ऑफ) बातम्यांनी जगभरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र, या घडामोडींकडे केवळ उद्योगाची घसरण म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. उलट, हे बदल आयटी उद्योगातील एका मोठ्या संक्रमणाचे आणि परिवर्तनाचे संकेत आहेत. एखादी मोठी कंपनी कर्मचारी कपात करते, तेव्हा सामान्यतः मंदीची भीती व्यक्त केली जाते. पण सध्याचे ले-ऑफ हे मंदीपेक्षा ‘बदलत्या प्राधान्यक्रमामुळे’ अधिक आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), ऑटोमेशन (स्वयंचलन) आणि क्लाऊड कॉम्प्युटिंग यासारख्या तंत्रज्ञानांमुळे कामाचे स्वरूप बदलत आहे. पूर्वी दहा लोकांची गरज असणारी कामे आता प्रगत सॉफ्टवेअर्सच्या मदतीने कमी वेळेत आणि अचूकपणे होऊ लागली आहेत. याचा अर्थ असा की, पारंपरिक कौशल्ये असलेल्या कर्मचाऱ्यांची गरज कमी होत असून नवीन तंत्रज्ञान अवगत असलेल्या लोकांची मागणी वाढत आहे.

भारतीय आयटी क्षेत्र हे जगाचे पॉवरहाऊस म्हणून ओळखले जाते. या क्षेत्रात अनुभवायला मिळत असलेल्या ताज्या बदलांमुळे भारतीय आयटी उद्योग आकुंचन पावेल, अशी अनेकांना भीती वाटते. परंतु वास्तव याच्या उलट आहे. भारतीय आयटी क्षेत्र कमी होत नाहीये, तर संक्रमित होत आहे. सायबर सिक्युरिटी, डेटा ॲनालिटिक्स, मशीन लर्निंग आणि रोबोटिक्स यांसारख्या क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होत आहेत. या क्षेत्रांसाठी केवळ पदवी पुरेशी नसून विशिष्ट कौशल्ये, विश्लेषणात्मक विचार आणि सतत शिकण्याची तयारी असणे आवश्यक आहे. स्वतःला या बदलांनुसार जुळवून घेणाऱ्या व्यावसायिकांसाठी भविष्यात संधींचे आकाश खुले आहे. त्यानुसार त्यांना परिस्थितीची जाणीव व्हायला हवी. भारतातील पुणे, बंगळुरू आणि हैदराबादसारखी शहरे आता जागतिक स्तरावर ‘इनोव्हेशन हब’ म्हणून नावारूपाला येत आहेत. विशेषतः पुण्यात ‘ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर्स’ (जीसीसी) मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. पूर्वी ही केंद्रे केवळ बॅक-ऑफिस कामांसाठी वापरली जात होती, पण आता ती जागतिक कंपन्यांची धोरणात्मक संशोधन आणि विकास केंद्रे बनली आहेत. याचा अर्थ असा की, भारतीय प्रतिभा आता मायदेशात राहूनच जगातील सर्वांत प्रगत तंत्रज्ञानावर काम करत आहेत. ही केंद्रे केवळ सेवा देणारी नसून जागतिक स्तरावर नावीन्यपूर्ण शोध लावणारी केंद्रे बनली आहेत. या बदलाच्या काळात आयटी विद्यार्थी आणि व्यावसायिकांसाठी असलेला एक महत्त्वाचा संदेश म्हणजे अनुकूलता हीच यशाची गुरुकिल्ली आहे. पूर्वी एकदा पदवी घेतली की आयुष्यभर त्या जोरावर नोकरी करता येत असे, पण आता ती परिस्थिती राहिलेली नाही. तंत्रज्ञान इतक्या वेगाने बदलत आहे की, दर दोन-तीन वर्षांनी तुम्हाला नवीन काही तरी शिकावेच लागेल. सतत शिकणे, नवीन कौशल्ये आत्मसात करणे आणि तांत्रिक प्रगतीशी अपडेट राहणे, हे आता करीअरमधील यशाचे मूलभूत मंत्र बनले आहेत. ऑनलाईन लर्निंग प्लॅटफॉर्म्स, इंडस्ट्री सर्टिफिकेशन आणि प्रत्यक्ष प्रकल्पांवरील कामाचा अनुभव आता नोकरीच्या बाजारपेठेत तुमची किंमत ठरवत आहेत. ती ओळखून आपल्या कौशल्यांमध्ये बदल करत राहणे गरजेचे आहे, हे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातल्या नव्या पिढीला कळणे आवश्यक आहे.

यापुढील काळात फक्त विद्यार्थ्यांनीच बदलून चालणार नाही, तर आपल्या शैक्षणिक संस्थांनाही काळानुसार बदलावे लागेल. उद्योगक्षेत्रातील तज्ज्ञ आणि धोरणकर्ते यांनी एकत्र येऊन ‘कौशल्य दरी’ भरून काढण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना भविष्यातील आव्हानांसाठी सज्ज करणारे अभ्यासक्रम तयार केले पाहिजेत. कल्पकता वाढवणे, उद्योजकता जोपासणे आणि डिजिटल साक्षरतेमध्ये गुंतवणूक करणे यामुळेच भारताची जागतिक स्पर्धात्मकता टिकून राहील. प्रत्येक क्षेत्रात वेगाने वाढत असलेली कृत्रिम बुद्धिमत्ता नोकऱ्या हिरावून घेईल, अशी भीती अनेकांना वाटते. पण इतिहास साक्षी आहे की, जेव्हा जेव्हा नवीन तंत्रज्ञान आले, तेव्हा सुरुवातीला काही नोकऱ्या गेल्या; पण त्यापेक्षा अनेक पटींनी नवीन नोकऱ्या निर्माण झाल्या. संगणक आले तेव्हाही अशीच भीती होती, पण संगणकामुळे आज आयटी क्षेत्रात लाखो लोकांना रोजगार मिळाला आहे. एआय हे मानवाचे रिप्लेसमेंट नसून मानवाची क्षमता वाढवणारे एक साधन आहे. एआयचा प्रभावी वापर करायला शिकतील तेच भविष्यातील कामाच्या ठिकाणी सर्वांत मौल्यवान असतील. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्तेचे महत्त्व आणखी वाढणार, हे निश्चित आहे. महाराष्ट्रात या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होत आहे. नवी संशोधन केंद्रे, नवउद्योग आणि शैक्षणिक संस्था या विषयावर भर देत आहेत. त्यांना अपेक्षित मनुष्यबळ आणि अस्तित्वात असणाऱ्या कार्यपद्धतीतील बदल लक्षात घेऊन आपल्या कामात बदल करणारे काळाची कसोटी पार करतील, तसेच बदलणाऱ्या अपेक्षांची पूर्तताही करतील. त्यामुळे येणाऱ्या काळात महाराष्ट्र या क्षेत्रात आघाडीवर राहील, अशी अपेक्षा आहे.

नव्या युगात टिकून राहण्यासाठी आणि प्रगती करण्यासाठी काही गोष्टींवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. यातील सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे जिज्ञासू वृत्ती. नेहमी प्रश्न विचारा आणि नवीन गोष्टी शिकण्यासाठी उत्सुक राहा. या युगात तांत्रिक कौशल्ये आवश्यक आहेतच, पण त्याचबरोबर ‘सॉफ्ट स्किल्स’ही तेवढीच महत्त्वाची आहेत. संवादकौशल्य, नेतृत्व आणि सांघिक कार्य या बाबी मशीन करू शकत नाहीत. त्यामुळे या कौशल्यांचे महत्त्व कधीच कमी होणार नाही. नवनवीन तंत्रज्ञान आणि कौशल्ये आत्मसात करताना प्रत्येकाने बदलांचा धैर्याने स्वीकार करायला हवा. ले-ऑफ किंवा बदलांना न घाबरता संधी म्हणून पाहायला हवे. थोडक्यात सांगायचे तर, आयटी क्षेत्राचा हा काळ नवनिर्माणाचा आहे. जुन्या पद्धती नष्ट होत आहेत आणि नव्या अधिक कार्यक्षम पद्धती जन्म घेत आहेत. बदल स्वीकारतील, स्वतःची कौशल्ये अद्ययावत करतील आणि तंत्रज्ञानाच्या प्रवाहाविरुद्ध न जाता त्या प्रवाहाचा भाग बनतील, अशा लोकांचे भविष्य उज्ज्वल आहे. भारत केवळ या बदलाचा साक्षीदार नसेल, तर या जागतिक डिजिटल क्रांतीचे नेतृत्व करेल. आपल्याला केवळ पदवीधर व्हायचे नाही, तर ‘कौशल्यवान’ आणि ‘डिजिटल साक्षर’ व्हायचे आहे. ले-ऑफच्या या वावटळीत ज्ञानाचा आणि कल्पकतेचा पाया मजबूत असलेल्यांची नौका नक्कीच सुरक्षित किनाऱ्याला लागेल. शेवटी, हे लक्षात ठेवले पाहिजे की तंत्रज्ञान माणसाला पर्याय ठरू शकत नाही, तर ते माणसाला अधिक सक्षम करते. ले-ऑफची भीती बाळगण्यापेक्षा आपण आपल्या ज्ञानाची ‘बॅटरी’ सतत चार्ज ठेवली पाहिजे. ही वेळ थांबण्याची नाही, तर अधिक वेगाने धावण्याची आहे. बदल स्वीकारण्याचे धाडस आणि सतत शिकण्याची तहान असलेल्यांसाठी हे ‘एआय’ आणि ‘क्लाऊड’चे युग सुवर्णकाळ ठरेल. केवळ कपात नाही, तर बदलपरिवर्तन हाच निसर्गाचा नियम आहे आणि या परिवर्तनाशी जुळवून घेणाराच उद्याचा विजेता असेल. त्यामुळे नव्या युगाचे स्वागत करून तंत्रज्ञानाच्या अथांग महासागरात यशाची नवी नौका वल्हवू या.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

नंदकिशोर काथवटे

# तहानलेल्या भविष्याला वाचवा

उन्हाळा सुरू झाला की पाण्याची टंचाई हा शब्द केवळ बातम्यांपुरता राहत नाही, तर तो प्रत्येक घराच्या दारात उभा ठाकतो. विहिरी कोरड्या पडतात, बोअरवेलचा तळ दिसू लागतो आणि पाण्याच्या टँकरसाठी होणारी धावपळ ही रोजचीच गोष्ट बनते. मात्र, हा प्रश्न अचानक निर्माण होत नाही. त्याची बीजे आपणच पावसाळ्यात पेरलेली असतात, हे वास्तव स्वीकारण्याची वेळ आता आली आहे. पावसाळ्यात निसर्ग आपल्यावर अक्षरशः कृपावृष्टी करतो. छतांवरून, रस्त्यांवरून, गल्लीबोळांतून वाहणारे लाखो लिटर पाणी आपण नाल्यांतून, नद्यांतून वाहून जाऊ देतो. त्या पाण्याचा साठा करण्यासाठी, जमिनीत मुरवण्यासाठी आपण फारसे प्रयत्न करत नाही आणि उन्हाळा आला की पाण्यासाठी आक्रोश करतो. ही मानसिकता बदलण्याची खरी गरज आहे.

भंडाऱ्यातील ‘व्यंकटेश रेसिडेन्सी’ने या संदर्भात एक आदर्श निर्माण केला आहे. या सोसायटीने ‘रेन वॉटर हार्वेस्टिंग’चा प्रभावी वापर करून पावसाळ्यात सुमारे १० लाख लिटर पाणी जमिनीत मुरवण्याची व्यवस्था केली आहे. त्याचा परिणाम असा झाला की, उन्हाळ्यातही येथे पाण्याची टंचाई जाणवत नाही. ४८ कुटुंबांना २४ तास पाणी उपलब्ध होते. हा केवळ एक प्रयोग नाही, तर भविष्यासाठीचा दिशादर्शक मार्ग आहे. आज शहरांमध्ये सिमेंटचे जंगल उभे राहत आहे. मोकळी माती, अंगणे, झाडे यांची जागा काँक्रीटने घेतली आहे. परिणामी, पावसाचे पाणी जमिनीत मुरण्याऐवजी सरळ वाहून जाते. रस्ते, इमारती, पार्किंग या सर्व ठिकाणी पाण्याचा निचरा होण्याची नैसर्गिक व्यवस्था नष्ट झाली आहे. त्यामुळे भूजल पातळी झपाट्याने खाली जात आहे. विदर्भासारख्या भागात, जिथे उष्णतेचा तीव्र परिणाम जाणवतो, तिथे ही समस्या अधिक गंभीर होत चालली आहे.

हवामान खात्याने यंदा गुजरात आणि महाराष्ट्रात उष्णतेची लाट तीव्र राहणार असल्याचा इशारा दिला आहे. अशा परिस्थितीत पाण्याचा प्रश्न आणखी बिकट होणार हे निश्चित आहे. पण या संकटावर उपायही आपल्या हातातच आहे. जल पुनर्भरण ही केवळ शासकीय योजना नसून प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, ही जाणीव होणे अत्यंत आवश्यक आहे. आज अनेक ठिकाणी वॉटर हार्वेस्टिंगची चर्चा होते, नियम बनवले जातात, पण त्याची अंमलबजावणी मात्र अत्यल्प आहे. केवळ कागदोपत्री योजना राबवून हा प्रश्न सुटणार नाही. प्रत्येक घर, प्रत्येक सोसायटी आणि प्रत्येक शासकीय कार्यालयाने यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे. जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी कार्यालय, पोलिस अधीक्षक कार्यालय यासारख्या मोठ्या इमारतींमध्ये लाखो लिटर पाणी वाया जाते. तिथेही जल पुनर्भरण प्रकल्प राबवले गेले, तर त्याचा मोठा सकारात्मक परिणाम दिसून येईल. यासोबतच, स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची आहे. नगर परिषद किंवा महानगरपालिकांनी बांधकाम परवानगी देताना रेन वॉटर हार्वेस्टिंगची सक्ती करणे आवश्यक आहे. घराच्या छतावर पडणारे पाणी जमिनीत मुरवण्याची व्यवस्था केल्याशिवाय परवानगी दिली जाऊ नये. हा नियम काटेकोरपणे पाळला गेला, तर भविष्यातील पाणीटंचाई मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. आज गरज आहे ती जनजागृतीसोबतच कृतीची. शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था यांनी पाणी संवर्धनाचे महत्त्व पटवून देणारे उपक्रम राबवले पाहिजेत. प्रत्येक नागरिकाने आपल्या घरापासून सुरुवात केली, तर मोठा बदल घडू शकतो. पाण्याचा प्रत्येक थेंब जपण्याची सवय लागली, तरच येणाऱ्या पिढ्यांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागणार नाही. शेवटी, पाणी ही केवळ गरज नाही, तर ती जीवनाची मूलभूत अट आहे. निसर्गाने दिलेल्या या अमूल्य संपत्तीचे जतन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. ‘व्यंकटेश रेसिडेन्सी’सारखे प्रयोग हे दाखवून देतात की, योग्य नियोजन आणि इच्छाशक्ती असेल, तर पाण्याचा प्रश्न सुटू शकतो. आता गरज आहे ती प्रत्येकाने एक पाऊल पुढे टाकण्याची. कारण, आज वाचवलेला प्रत्येक थेंब उद्याच्या पिढीसाठी जीवनदायी ठरणार आहे. पाणीटंचाई ही केवळ नैसर्गिक आपत्ती नसून ती आपल्या नियोजनातील त्रुटींचा परिणाम आहे, हे आपण समजून घेतले पाहिजे. गावागावांत, शहराशहरांत पाण्याचे स्रोत वाढवण्याऐवजी आपण उपलब्ध स्रोतांवरच अधिक ताण देत आहोत. विहिरी खोल करणे, बोअरवेल वाढवणे हे तात्पुरते उपाय आहेत; मात्र दीर्घकालीन उपाय म्हणजे जमिनीत पाणी साठवणे. पावसाचे पाणी योग्य पद्धतीने अडवले, साठवले आणि मुरवले, तरच भूजल पातळी टिकून राहू शकते. अन्यथा येणाऱ्या काळात पाणी ही केवळ गरज न राहता संघर्षाचे कारण बनण्याची भीती नाकारता येत नाही. आजच्या पिढीने जर पाण्याचे महत्त्व ओळखून योग्य सवयी आत्मसात केल्या, तर भविष्यातील संकट टाळता येईल. घरातील छोट्या-छोट्या गोष्टींमधूनही मोठा बदल घडू शकतो. हे प्रयत्न किरकोळ वाटले तरी त्यांचा एकत्रित परिणाम मोठा असतो. पाण्याबाबतची जबाबदारी ही फक्त सरकारची नाही, तर प्रत्येक नागरिकाची आहे, ही भावना मनात रुजली, तरच ‘जलसंपन्न भारत’ हे स्वप्न प्रत्यक्षात उतरू शकते.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

# मल्लिकार्जुन खडगे तुम्ही सुद्धा...


श्यामकांत जहागीरदार

तामिळनाडू आणि पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीच्या मतदानाला ४८ तास उरले असताना काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा उल्लेख ‘दहशतवादी’ असा करत आपल्या पक्षाच्या आणि सोबत आपला मित्रपक्ष असलेल्या द्रमुकच्या पायावर धोंडा पाडून घेतला आहे. चेन्नई येथे काँग्रेस पक्षातर्फे आयोजित एका पत्रपरिषदेत खडगे यांनी हे तारे तोडले आणि काँग्रेस पक्षाच्या डोळ्यासमोर दिवसाउजेडी तारे चमकू लागले.

मोदींसाठी दहशतवादी असा शब्द वापरून आपण चूक केली, हे लक्षात आल्यावर खडगे यांनी सावरासावर करण्याचा प्रयत्न केला, पण तो विफल ठरला. मला असे म्हणायचे नव्हते, दहशतवादी म्हणजे समोरच्याला घाबरवणारा असे म्हणायचे होते, अशा पश्चातबुद्धीचा आणि कोणाला न पटणारा खुलासा खडगे यांनी केला, पण तोपर्यंत उशीर झाला होता. मोदींना मी दहशतवादी कधी म्हटले नाही, ते लोकांना आणि राजकीय पक्षांना घाबरवत आहेत, कारण ईडी, आयटी आणि सीबीआय त्याच्या हातात आहे, असे मला म्हणायचे होते, असे खडगे म्हणाले.

दहशतवादी म्हणजे दहशतवादी असा त्याचा थेट अर्थ आहे, पण खडगेंच्या शब्दकोशात दहशतवादी म्हणजे सज्जन व्यक्ती असा अर्थ असेल तर माहीत नाही. तोंडातून निघालेला शब्द आणि भात्यातून निघालेला बाण परत घेता येत नाही, तो घाव करण्याचे आपले काम करूनच जातो. बाणामुळे झालेली जखम लवकर भरून निघते, पण वाक्‌बाणामुळे झालेली जखम कधीच भरून येत नाही.

खडगे काँग्रेस पक्षातील सर्वांत ज्येष्ठ, संयमी आणि अनुभवी नेते आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून अधिक जबाबदारीच्या वर्तनाची आणि विधानाची अपेक्षा असते. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी वा काँग्रेस पक्षातील अन्य नेत्यांकडून आपण जबाबदारीच्या वागणुकीची आणि विधानाची अपेक्षा करू शकत नाही. आपण काय चीज आहे, हे राहुल गांधी यांनी वारंवार सिद्ध केले आहे. पण काँग्रेस पक्षरूपी वासरात आपणही लंगडी गाय असल्याचे खडगे वारंवार दाखवून देत आहेत. अन्यथा देशातील सर्वाधिक लोकप्रिय अशा पंतप्रधान मोदींबद्दल त्यांनी असे आक्षेपार्ह विधान केलेच नसते. काँग्रेस पक्षात वाचाळ नेत्यांची कमी नाही, अशा नेत्यांची परंपरा काँग्रेस पक्षाला लाभली आहे.



त्यात आता खडगे यांची भर पडली, याचे आश्चर्य आणि वाईटही वाटते. दुर्दैवाने वादग्रस्त विधान करण्याची खडगे यांची ही पहिली वेळ नाही. २०२३ मध्ये कर्नाटक विधानसभा निवडणुकीच्या वेळी खडगे यांनी मोदी यांचा उल्लेख विषारी साप असा केला होता. २०२२ मध्ये गुजरातमधील विधानसभा निवडणुकीच्या वेळी खडगे यांनी मोदी यांना रावण म्हटले होते, आपल्यालाही रावणाप्रमाणे शंभर तोंडे आहेत का, अशी विचारणा खडगे यांनी केली होती. खरं म्हणजे रावणाला शंभर तोंडे कधीच नव्हती, तर दहा तोंडे होती, पण टीका करताना खडगे यांचे गणितही चुकते. यानिमित्ताने खडगे यांची फक्त जीभ घसरलीच नाही, तर त्यांचा पायही पूर्णपणे घसरला आहे. विरोधी पक्षनेते म्हणून राहुल गांधी असो की मल्लिकार्जुन खडगे यांना पंतप्रधान मोदी यांच्यावर टीका करण्याचा अधिकार आहे, पण ही टीका संयमी आणि संसदीय भाषेत असली पाहिजे. रस्त्यावर उतरून आपण समोरच्याला शिवीगाळ करतो, तशा भाषेत आणि आविर्भावात नसावी. देशाच्या पंतप्रधानाला तुम्ही दहशतवादी कसे म्हणू शकता? त्यामुळे खडगे तुम्ही सुद्धा, असे म्हणावे लागते. राहुल गांधींच्या बेताल विधानांनी देश आधीच त्रस्त झाला असताना त्यात आता खडगे यांचीही भर पडावी, हे दुर्दैवी आहे. वय झाल्यामुळे सामान्यपणे म्हातारपणी माणसाचा पाय घसरत असतो, पण येथे तर वय झाल्यामुळे खडगे यांची जीभ घसरल्याचे दिसते. खडगे यांना म्हातारचळ तर लागला नाही, अशी शंका कोणी घेतली तर त्याला दोष कसा द्यायचा. खडगे यांच्याकडून अशा वागण्याची आणि विधानाची अपेक्षा नव्हती. कारण त्यांच्याबद्दल देशातील जनतेच्या मनात आतापर्यंत आदराची भावना होती.

अण्णाद्रमुक रालोआत आहे, भाजपाच्या जवळ आहे, त्यामुळे खडगे यांचा तिळपापड झाला. अण्णाद्रमुक हा भाजपाचा गुलाम आहे, असा आरोप करताना खडगे यांनी त्या पक्षाने आपली ओळख गमावली, तो तामिळनाडूच्या हिताचे रक्षण करू शकत नाही, कारण तो मोदी यांचा गुलाम झाला आहे, असे आरोप खडगे यांनी केले. हे म्हणजे एका गुलामाने दुसऱ्याला गुलाम म्हणण्यासारखे झाले. खडगे हे स्वत:च गांधी घराण्याचे गुलाम आहेत, असे म्हटले तर ते त्यांना चालेल का? मग अण्णाद्रमुकला ते मोदींचे गुलाम कसे म्हणू शकतात.

राष्ट्रवादी विचारधारा आणि मोदी यांचे नेतृत्व पटल्यामुळे अण्णाद्रमुक जर भाजपाजवळ येत असेल वा आला असेल तर खडगे यांच्या पोटात दुखण्याचे कारण काय? कोणत्या नेत्याने कोणत्या पक्षात जावे, वा कोणत्या पक्षाने कोणत्या पक्षाशी युती वा आघाडी करावी, हा त्या नेत्याचा आणि पक्षाचा प्रश्न आहे. काँग्रेस पक्षाने जशी द्रमुकशी युती करणे गैर नाही, तसेच अण्णाद्रमकनेही भाजपाशी युती करणे चुकीचे नाही. बरं अण्णाद्रमुक आणि भाजप यांची युती ही आजची नाही, तर फार जुनी आहे. जयललिता असल्यापासूनची आहे. मुळात तामिळनाडूत काँग्रेस पक्षाला द्रमुकच्या कुबड्या घेऊन चालावे लागते. राज्यात काँग्रेसचे अस्तित्व नाममात्र म्हणायला पाहिजे. द्रमुकने टाकलेल्या तुकड्यांवर म्हणजे दिलेल्या मतदारसंघावर काँग्रेसला निवडणूक लढवावी टाकते. ती काँग्रेस दुसऱ्या पक्षावर असंसदीय भाषेत टीका करते, ही बाब पटण्यासारखी नाही.

तामिळनाडूत काँग्रेसने आपला पराभव निवडणुकीआधीच मान्य केला, असा याचा अर्थ काढला तर तो चूक कसा म्हणायचा? भाजपाला तर यामुळे आयती संधी काँग्रेसने दिली आहे. काँग्रेस हा शहरी नक्षल्यांचा पक्ष असल्याचा आरोप भाजपाने केला आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे मोदी वा भाजपावर टीका केल्याने मोदी वा भाजप यांचे एका पैशाचेही नुकसान होत नाही, उलट त्यांना याचा फायदाच होतो. कारण मोदींवर केलेल्या टीकेचा मोदींना जेवढा राग येत नसेल तर त्याच्यापेक्षा कितीतरी जास्त राग त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या देशातील जनतेला येत असतो. मोदी स्वत: आपल्यावर होणाऱ्या टीकेवर कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त करत नाही, पण देशातील जनतेच्या संतापाचा मात्र भडका उडतो. ते खाऊ की गिळू नजरेने अशी विधाने करणाऱ्या नेत्याकडे आणि पक्षाकडे पाहात असतात, ईव्हीएममधून त्यांना धडा शिकवत असतात. तरीसुद्धा काँग्रेस आणि काँग्रेसच्या नेत्यांना शहाणपण येत नाही, याचे आश्चर्य वाटते.

मुळात शहाणपण यायलाही शहाणपण असावे लागते, आडातच नाही तर पोहऱ्यात कुठून येणार? त्यामुळे काँग्रेस पक्षाने मोदी यांच्यावर जेवढी करता येईल, तेवढ्या अश्लाघ्य आणि आक्षेपार्ह भाषेत टीका करावी. मोदींवर केलेल्या टीकेमुळे मोदींचा राजकीय फायदा होतो, तर काँग्रेसचे राजकीय नुकसान. त्यामुळे राहुल गांधी असो की खडगे हे भाजपाचे शत्रू नाहीत, तर खऱ्या अर्थाने त्यांना भाजपाचे हितचिंतक म्हटले पाहिजे. भाजपाचे नेते आणि कार्यकर्ते भाजपाचा जेवढा फायदा करून देत नाही, तेवढा वा त्यापेक्षा जास्त फायदा राहुल गांधी आणि खडगे करून देतात, त्यामुळे भाजपा मित्रभूषण पुरस्कार देऊन त्यांचा सत्कार करायला हरकत नाही.

९८८१७१७८१७

### चमकोताई आणि चमकोबाबा!

महिला आरक्षण विधेयकाला विरोध करून नारीशक्तीचा आणि लोकशाहीचा अपमान करणाऱ्या विरोधकांचा निषेध करण्यासाठी भाजप - रालोआच्या नेतृत्वाखाली ठिकठिकाणी मोर्चे काढण्यात आले आहेत व येत आहेत. त्यापैकी २१ एप्रिलच्या मुंबईतील मोर्च्याच्या ठिकाणी एका फुरोगामी महिलेने मोर्च्यामुळे वाहतूककोंडी होते असे कारण दाखवून मंत्री गिरीश महाजन यांच्यासमोर बराच थयथयाट केला. त्या महिलेने, वृत्तवाहिन्यांच्या उथळ प्रतिनिधींच्या शब्दांत, महाजन यांना तोंडावर सुनावले! (वास्तविक मोर्चे काढण्याचे स्वातंत्र्य सर्वांनाच आहे, त्यामुळे महिला पोलिसांनी त्या महिलेची उचलबांगडी करून तिला ताब्यात घेणे आवश्यक होते.) एका गोष्टीचे आश्चर्य वाटते की, मनोज जरांगे यांच्या समर्थकांनी झाल्याची तक्रार अशा फुरोगाम्यांनी कधी केली नाही. चायबिस्कुटवाले पत्रकार आणि विशेषतः वृत्तवाहिन्यांचे उथळ व पक्षपाती प्रतिनिधी यांनी फुगविलेले बरेच बेडूक (आणि बेंडकुळ्या) महाराष्ट्रात आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात बऱ्याच चमकोताई आणि चमकोबाबा निर्माण झाले आहेत. त्यांचे प्रायोजक कोण, हे जनतेला माहीत आहेच. सत्तेतून बाहेर फेकले गेलेले वैफल्यग्रस्त विरोधक असे उद्योग करणारच. त्यांच्याबाबत शासनाने कठोर कारवाई करणे आवश्यक आहे.

**अविनाश वाघ**/पुणे

## वाचक पत्रे

### रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीची पुणे शाखा सुरू व्हावी

पहिल्यांदा आमदार झाले ते पुण्यातील मावळमधून. पुढे ठाण्यातून खासदारकी. पण त्यांनी ठाण्याबरोबरच पुणे, कोल्हापूर, संभाजी नगर, नागपूर व दिल्ली येथे संसदीय कार्यालये सूरू केली होती व त्या ठिकाणी ते नियमितपणे भेट देऊन त्या भागातील नागरिकांचे प्रश्न सोडवत असत. अशा या महान नेत्याच्या नावाने असलेल्या रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीची पुणे शाखा भव्य प्रशस्त अशा वास्तूत सुरू व्हावी व या ठिकाणी पुणे व जवळपासच्या सर्व जिल्ह्यातील युवकांसाठी व नागरिकांसाठी, नेतृत्व प्रशिक्षण, शिबिरे, कार्यशाळा आयोजित करण्यात याव्यात. यासाठी प्रशस्त अशी

### जागतिक पुस्तक दिनानिमित्त...

पुस्तक हे ज्ञानाचे, संस्कारांचे आणि विचारांचे अमूल्य भांडार आहे. मानवाच्या प्रगतीमध्ये पुस्तकांचा मोठा वाटा आहे. दरवर्षी २३ एप्रिल हा दिवस ‘जागतिक पुस्तक दिन’ म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश वाचनाची आवड वाढवणे आणि पुस्तकांचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवणे हा आहे. आजच्या आधुनिक युगात तंत्रज्ञान झपाट्याने विकसित होत आहे. मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियामुळे लोकांचा वाचनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत चालला आहे. तरीसुद्धा पुस्तकांचे स्थान अजूनही अद्वितीय आहे. लहानपणापासूनच मुलांमध्ये वाचनाची सवय लावली तर त्यांच्या विचारशक्तीचा आणि कल्पनाशक्तीचा विकास होतो. पुस्तके माणसाचे खरे मित्र असतात. ती आपल्याला योग्य मार्गदर्शन करतात, नवीन कल्पना

आयोजित केले जातात.

वाचन स्पर्धा, पुस्तक प्रदर्शन यामुळे विद्यार्थ्यांमध्ये पुस्तकांविषयीची आवड वाढते. आज ई-पुस्तके आणि ऑडिओबुक्सचा वापरही वाढला आहे, ज्यामुळे वाचन अधिक सुलभ झाले आहे. तरीही छापील पुस्तकांचा सुगंध आणि अनुभव वेगळाच असतो. जागतिक पुस्तक दिन हा केवळ एक दिवस नसून वाचन संस्कृती जपण्याचा आणि वाढवण्याचा एक महत्त्वाचा प्रयत्न आहे. पुस्तकांमुळे व्यक्तिमत्त्व विकास होतो, ज्ञान वाढते आणि जीवन अधिक समृद्ध होते. आपण सर्वांनी दररोज थोडा वेळ वाचनासाठी द्यावा आणि इतरांनाही वाचनाची प्रेरणा द्यावी. ‘वाचाल तर वाचाल’ ही म्हण आपल्या आयुष्यात खऱ्या अर्थाने उतरवणे आवश्यक आहे. आपण सर्व जण वाचनाची सवय लावूया आणि ज्ञानसमृद्ध समाज घडवूया.

**श्रीकांत संभाजी मगर**/

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८

RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## निवासी शाळांमधील कर्मचारी यांची कार्यशाळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. २३ एप्रिल :** महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागांतर्गत लातूर जिल्ह्यातील सहा निवासी शाळांमधील मुख्याध्यापक, शिक्षक, अधीक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठीची एकदिवसीय कार्यशाळा २३ एप्रिल २०२६ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे झाली. या कार्यशाळेचे उद्घाटन समाज कल्याण प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार यांच्या हस्ते महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आले.

एकविसाव्या शतकामध्ये सामाजिक न्याय विभागातील निवासी शाळेचे विद्यार्थी, विद्यार्थिनी टिकून राहिले पाहिजे. यासाठी विद्यार्थ्यांची वर्गवारी करून चार श्रेणीनुसार अध्यापन करावे. प्रत्येक श्रेणीमध्ये दरमहा प्रगती होणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेच्या सर्व कर्मचारी यांनी कठीण परिश्रम घेतले पाहिजेत, हा बदल केवळ कागदावर न दिसता प्रत्यक्षात दिसून आला पाहिजे, असे समाज कल्याण सहायक आयुक्त गायकवाड म्हणाले.

उद्घाटक श्री. देवसटवार यांनी आपल्या मनोगतातून शिक्षकांनी विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण शोधून त्यांना योग्य पैलू पाडावेत व देशाचा सुजाण नागरिक बनवणे हे आपले कर्तव्य मानून कार्य करावे, असे मत व्यक्त केले.



## विविध वृत्त...

### स्मार्ट कार्ड नसले तरी एसटी प्रवासाची सवलत पूर्वीप्रमाणेच सुरू

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. २३ एप्रिल :** लातूर विभाग नियंत्रकांचे अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहनतभा वृत्तसेवालातूर, दि. २१ :राज्य परिवहन महामंडळाच्या एनसीएमसीस्मार्ट कार्ड प्रवास योजनेअंतर्गत ज्या पात्र लाभार्थ्यांनी अद्याप नोंदणी केलेली नाही,अशा सर्व प्रवाशांना सवलतीचा प्रवास पूर्वीप्रमाणेच सुरू राहणार असल्याचे स्पष्टीकरण लातूर विभागाचे विभाग नियंत्रक विलास राठोड यांनी दिले आहे.महामंडळामार्फत ६५ ते ७५ वर्षांपर्यंतचे ज्येष्ठ नागरिक,७५ वर्षांवरील अमृत ज्येष्ठ नागरिक,दिव्यांग आणि महिला प्रवाशांसह इतर विविध घटकांना सवलती दिल्या जातात आणि मोठ्या प्रमाणात प्रवासी या योजनांचा लाभ घेत आहेत. मात्र,स्मार्ट कार्ड उपलब्ध नसल्यास सवलत मिळणार नाही अशी चुकीची अफवा काही ठिकाणी पसरली आहे. या पार्श्र्वभूमीवर,ज्यांच्याकडे सध्या स्मार्ट कार्ड नाही अशा पात्र लाभार्थ्यांना नियमानुसार सवलतीचा लाभ दिला जात असून तो यापुढेही सुरूच राहील,असे विभागाने स्पष्ट केले आहे. स्मार्ट कार्ड नोंदणीची कार्यप्रणाली सध्या राबविली जात असून पात्र प्रवाशांनी अधिकृत संस्थेद्वारे लवकरात लवकर आपले कार्ड काढून घ्यावे आणि कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये,असे आवाहनही राठोड यांनी केले आहे.

### अल्पसंख्यांक कल्याण समितीची पुनर्रचना ३० एप्रिलपर्यंत प्रस्ताव सादर करा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. २३ एप्रिल :** अल्पसंख्यांकांच्या कल्याणासाठी माननीय पंतप्रधानांच्या नवीन १५ कलमी कार्यक्रमाची अधिक प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हास्तरीय अल्पसंख्यांक कल्याण समितीची पुनर्रचना करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या समितीसाठी जिल्ह्यातील ३ नामवंत अशासकीय संस्थांच्या प्रतिनिधींकडून सदस्यत्वासाठी ३० एप्रिल २०२६ पर्यंत प्रस्ताव मागवण्यात आले आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागाच्या १९ जानेवारी २०२६ च्या शासन निर्णयानुसार या जिल्हास्तरीय अल्पसंख्यांक कल्याण समितीची पुनर्रचना करण्यात आली आहे, आता ही समिती निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत राहणार आहे. या समितीमध्ये सदस्य म्हणून काम करण्यास इच्छुक असलेल्या आणि अल्पसंख्याकांसाठी सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबविणाऱ्या जिल्ह्यातील नामवंत अशासकीय स्वयंसेवी संस्थांनी आपले परिपूर्ण प्रस्ताव सर्व पुराव्यांसह सादर करणे आवश्यक आहे. हे प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती, नवीन जिल्हाधिकारी कार्यालय, बार्शी रोड, लातूर या कार्यालयात दिनांक ३० एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत सादर करायचे असून, मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही, असे जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी सोमनाथ रेड्डी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळवले आहे

### बस स्थानकावर गर्दीचा फायदा घेत बोरमाळ पळवली

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. २३ एप्रिल :** शहरातील जुन्या रेल्वेस्थानक लगत असलेल्या बसस्थानक परिसरात बसमध्ये चढत असताना महिलेच्या गळ्यातील सोन्याची बोरमाळ चोरट्याने लंपास केल्याची घटना सोमवारी दुपारी घडली. याबाबत गांधी चौक पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी सुरेखा पंडित दतनूरे (वय ५५, रा. जवळगा, ता. रेणापूर) या सोमवार, २० एप्रिल रोजी दुपारी १:२० वाजण्याच्या सुमारास लातूर ते राठोडा जाणाऱ्या बसमध्ये चढत होत्या. यावेळी त्यांच्या गळ्यातील १० ग्रॅम वजनाची सोन्याची बोरमाळ शिताफीने चोरून नेली. याप्रकरणी पोलिसांनी चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

### उन्हामुळे बुलेटनी घेतला पेट

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ एप्रिल :** मागील आठ दिवसांपासून सूर्य आग ओकत आहे. वैशाख वणवा पेटल्याची प्रचिती येत असतानाच बुधवारी (दि.२२) दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास शहराच्या उस्मानपुरा भागात रस्त्यावर लावलेल्या एका बुलेट दुचाकीने जागेवरच पेट घेतला.

टाकी गरम होऊन टाकीचाही मोठा स्फोट झाल्याने आगीच्या ज्वाळा दूरपर्यंत पोहोचल्या होत्या. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. बुलेट मात्र जागेवरच जळून खाक झाल्याने तिचे मोठे नुकसान झाले आहे. सदर बुलेटच्या टाकीचा स्फोट होऊन उंच गेलेल्या ज्वाळांमुळे शेजारच्या दुकानाच्या पाटीला आग लागली होती. या संपूर्ण घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

# कधी होणार लातूर पोलीस दल 'अपडेट' ?

## लातुरात ऑनलाईन लुटीचे प्रमाण वाढले-सायबर सेलचा संपर्क क्रमांकही भलताच

**तभा वृत्तसेवा श्रीधर स्वामी**




**लातूर दि. २३ एप्रिल :** मागच्या काही कालावधीपासून लातुरात अनेक नागरिकांच्या बँक खात्यातून अचानक रकमा गायब होण्याचे प्रमाण वाढले आहे. यासंदर्भात कोणीहीधाडसाने पोलिसांच्या सायबर सेलला भेट देऊन थेट तक्रार करताना दिसत नाही. त्यातच इंटरनेटवर लातूर सायबर सेलचाजोसंपर्क क्रमांक देण्यात आलेला आहे, त्या क्रमांकावर कॉल केल्यास तो पोलीस दलात सेवानिवृत्त झालेल्या व्यक्तीला जातो. त्यामुळे लातूरच्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी पोलीस दलाला तात्काळ 'अपडेट' करण्यासाठीहीपाऊले उचलणे गरजेचे असल्याचे दिसत आहे.

सध्यस्थितीत समाज माध्यम अत्यंत प्रभावी बनले असल्याचे सर्वज्ञात आहे. जास्तीत जास्त नागरीकसमाज माध्यमाचावापर अधिक संख्येने करताना आढळतात. या समाज माध्यम आणि अद्यावत तंत्रज्ञानाचेजसेफायदे आहेत तसेच तोटेही आहेत. आज जगभर इंटरनेटचे जाळे मोठ्या प्रमाणात विखूरले गेले आहे. इंटरनेटनेसंपूर्ण जगाला आपल्या कवेत घेतले आहे,असे म्हटल्यास ते चुकीचे ठरणार नाही. बँक व्यवहारासहदैनंदिन कामेहीइंटरनेटच्या वापराशिवाय अशक्य झाल्याचे पाहायला मिळते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही भारतीय नागरिकांना रोखीने व्यवहार करण्याऐवजी युपीआय चा अवलंब करून व्यवहार करण्याचे आवाहनकेलेहोते. पंतप्रधानांच्या या आवाहनाला सामान्य लोकांकडून भरघोस प्रतिसाद मिळाला. आज लोक अगदी पाच - दहा रुपयांपासून ते काही लाखांपर्यंतचे व्यवहार युपीआयच्या माध्यमातून करताना दिसतात.तंत्रज्ञानाचा वापर अधिकाधिक वाढल्याचे या माध्यमातून दिसत असले तरी त्याचा गैरफायदा घेणारी मंडळीहीतेवढ्याचसक्षमपणे सक्रिय झाल्याचे दिसून येते. पोलिसांच्या भाषेत त्यांना सायबर गुन्हेगार असे संबोधले जाते. सायबर गुन्हेगारांवरअंकुश ठेवण्यासाठी पोलीस दलात स्वतंत्र सायबर सेलही कार्यान्वित करण्यात आला आहे. भविष्यात लातूरच्या सायबर सेलकडे लुबाडणूक झालेल्या अनेक नागरिकांची गर्दी होण्याची शक्यता वाढीस लागली आहे. कारण , मागच्या काही महिन्यात लातूर शहरातील अनेक नागरिकांच्या बँक खात्यातील रकमा कमी अधिक प्रमाणात आपोआप कमी झाल्याचे प्रकार वाढले आहेत.सुरुवातीला खात्यातून पंचवीस - पन्नास रुपये काढून घेणे, ती चोरी उघड होणार नाही,असे निदर्शनास आले की, पुन्हा मोठ्या रकमा ठराविक अंतराने काढून लंपास करणे असेही प्रकार घडल्याचे अनेक उदाहरणे आहेत. सामान्य व्यक्ती सहजासहजी पोलिसांकडे जाण्यास, तक्रार करण्यास टाळते. याची अनेक कारणेही असू शकतात.त्यातच काहींनी लातूरच्या सायबर सेल विभागालाइंटरनेटवर दिलेल्या क्रमांकावर कॉल केला असता, तो क्रमांक पोलीस दलातून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याचा असल्याचे समजल्याचे सांगण्यातआले. लातूर पोलीस दल एवढे 'कार्यतत्पर' असताना सेवानिवृत्त कर्मचाऱ्याचा मोबाईल क्रमांक नेटवरूनहटवूनत्या ठिकाणी सध्या कार्यरत असलेल्या पोलीस अधिकारी - कर्मचाऱ्याचा मोबाईल क्रमांक देण्याससंबंधित अधिकारी वर्गांना काय हरकत आहे ? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

सामान्य नागरिकांच्या समस्यांची सोडवणूक करण्यास पोलीस प्रशासन कायम प्राधान्य देण्याचे काम करते. त्याबरोबरच अशा साध्या साध्या गोष्टींकडेहीपोलीस प्रशासनातील वरिष्ठानीवेळीच लक्ष देण्याची गरज आहे. नागरिकांच्या बँक खात्यातून अचानक पैसे कमी हिऱ्यांचे प्रमाण मागच्या काळात बऱ्यापैकी वाढले आहे. याबाबत लातूरच्या पोलीस अधीक्षकांनी स्वतः जातीने लक्ष घालून केवळ लातूर शहरातच नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यात अशा किती घटना घडल्या आहेत, त्याचा शोध घेण्यासाठी यंत्रणा गतिमान करणे आवश्यक आहे. नागरिकांना त्यांची लुबाडणूक झाली असल्यास न घाबरता पोलिसांकडे येऊन तक्रार देण्याचे आवाहन करणे गरजेचे आहे.

## नूतन जिल्हाधिकाऱ्यांची धिरज देशमुख यांनी घेतली सदिच्छा भेट

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ एप्रिल :** जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष धिरज देशमुख यांनी आपल्या सहकाऱ्यांसह लातूरचे नूतन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी जिल्ह्यातील विकासाच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या चर्चेत जिल्ह्यातील बराजेसचे जुने झालेले गेट दुरुस्ती करणे, शेतकऱ्यांना पिकविमा तत्परतेने मिळणे, पिण्याच्या पाण्याची वितरण व्यवस्था अधिक सक्षम करणे तसेच तुती लागवडी संदर्भातील योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे आदी विषयांवर सकारात्मक संवाद झाला.

विशेषतःशेतकरी हिताच्या विविध योजनांचा लाभ अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रभावी अंमलबजावणी कशी करता बेईल, यावरही सखोल चर्चा करण्यात आली.

डॉ. भारत बास्टेवाड हे अनुभवी व कर्तव्यदक्ष अधिकारी असून, त्यांच्या नेतृत्वाखाली लातूर जिल्ह्याच्या विकासाला नवी दिशा



मिळेल, असा विश्वास देशमुख यांनी व्यक्त केला.

## शाहू महाविद्यालयाचे जेईई-ॲडव्हान्स परीक्षेसाठी २०५ विद्यार्थी पात्र



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ एप्रिल :** नॅशनल टेस्टींग एजन्सी (एनटीए) द्वारे घेण्यात आलेल्या जेईई-मेन-२०२६ परीक्षेचा निकाल जाहीर झाला. या परीक्षेत राजर्षी शा-हू ज्युनिअर सायन्स कॉलेज मधील विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश संपादन केले आहे. महाविद्यालयातील एकूण ४१२ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. त्यापैकी २०५ विद्यार्थी जेईई ॲडव्हान्स परीक्षेसाठी ठरले आहेत.

महाविद्यालयातील श्रवण दीपक बुलबुले हा विद्यार्थी (९९.८२२१९९) पर्सेंटाईल घेऊन महाविद्यालयातून सर्वप्रथम आला आहे. अंतरिक्ष बाळू जाधव (९९.७८०६९१) पर्सेंटाईल मिळवून महाविद्यालयातून सर्वद्वितीय, प्रणव परमेश्र्वर करडिले (९९.६७५८४८) सर्वतृतीय आणि सिद्धांत दत्तराव सुर्यवंशी (९९. ६५५३३७०) पर्सेंटाईल मिळवून महाविद्यालयात ई.डब्ल्यु. एस. गटातून प्रथम क्रमांकावर आहे. तनिष्का उमेश इंगळे (९९.५९८५७४४) मुलीत महाविद्यालयातून व अनुसूचित जाती संवर्गातून प्रथम आली आहे. श्रीराम देविदास फुलसुरे (८७.३३७००१) अनुसूचित जमाती संवर्गातून प्रथम तर हर्ष दिगांबर टाचले (८३.७५८७-४६) पर्सेंटाईलसह दिव्यांग गटातून महाविद्यायातून प्रथम आला आहे. भौतिकशास्त्र विषयात आर्यन ज्ञानोबा बोंडगे, उत्कर्ष गजानन कोठावळे, सूरज बिभीषण शेळके, हे तीनही विद्यार्थी १०० पर्सेंटाईल मिळवून देशात प्रथम आलेले आहेत.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. अजय जाधव, सचिव बी. बी. ठोंबरे, सहसचिव डॉ. शिवाजीराव सुर्यवंशी, सहसचिव उद्धव पाटील, डॉ. पी. आर. देशमुख, प्राचार्य अनिरूद्ध जाधव, व इतर सर्व संचालक, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, इतर सर्व

## डॉ.अभिलाषा दयानंद ठाकूर यांचा एमबीबीएस पदवीदान सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**



**लातूर, दि. २३ एप्रिल :** येथील एलआयसी कॉलनी, इंद्रायणी नगर मधील दयानंद ठाकूर व सौ. बबिता ठाकूर या विद्यार्थीप्रिय शिक्षक दांपत्याची ज्येष्ठ कन्या डॉ. अभिलाषा दयानंद ठाकूर हिने नुकतेच एमबीबीएस चे शिक्षण पूर्ण केले असून तिचा पदवीदान सोहळा नुकताच मुंबईत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

डॉ.अभिलाषा ही शालेय जीवनापासूनच अभ्यासप्रिय विद्यार्थिनी म्हणून ओळखली जायची. नियमित अभ्यास आणि सातत्याच्या बळावर आपले शालेय देशिकेंद्र विद्यालयातून तर व महाविद्यालयीन शिक्षण राजर्षी शाहू महाविद्यालयातून घेतले आहे. त्यानंतर तिने लोकमान्य टिळक म्युनिसिपल मेडिकल कॉलेज सायन, मुंबई येथून एमबीबीएसचे शिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले आहे. डॉ. अभिलाषाचे आजोबा शिरूर अनंतपाळ तालुक्यातील अजनी ( बु.) येथील प्रगतशील शेतकरी आहेत. आपल्या तिन्ही मुलांना त्यांनी अत्यंत कर्तृत्ववान बनवले असून आता पुढील पिढीत त्यांची नात एक यशस्वी डॉक्टर म्हणून रुग्णसेवा समाजसेवा करण्यास सज्ज झाली आहे.

हा पदवीदान सोहळा चेंबूरमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. याप्रसंगी दयानंद ठाकूर, सौ. बबिता ठाकूर, श्रीमती सुनंदा कदम, सोपान यादवराव ठाकूर, आशुतोष ठाकूर, अभिषेक ठाकूर, राजनंदनी सोपान ठाकूर यांची उपस्थिती होती. डॉ.अभिलाषा हिच्या यशाबद्दल कुटुंबियांसह समाजातील सर्वच स्तरातून तिचे अभिनंदन व कौतुक केले जात आहे.

## जेईई परीक्षेत राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे यश

**तभा वृत्तसेवा**



**लातूर, दि. २३ एप्रिल :** नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) द्वारे घेण्यात आलेल्या जेईई मेन्स परीक्षेच्या दुसर्या सत्राचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. या परीक्षेत लातूरच्या राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करून यशाची परंपरा कायम राखली आहे.

या परीक्षेत सोनाली शरद पंचगल्ले हिने ९८.३४ पर्सेंटाईल गुण मिळवत संकुलात प्रथम, प्रथमेश कैलास नागरगोजे ९१.०७ पर्सेंटाईल गुण मिळवत द्वितीय तर सृष्टी अनिल बाहेती ८२.१७ पर्सेंटाईल गुण मिळवत तृतीय आली आहे. तसेच सार्थक चंद्रकांत वाडकर याने ८०.५७ पर्सेंटाईल, कृष्णा विजयकुमार किसवे ८०, पूजा सचिन किसवे ७२.०८, ओमकार संजय मोहिते ७२, मानसी संतोष मद्दे ७०, अथर्व विश्वनाथ जाधव ६६.८७, प्रणव देवराव निंबुरगे ६२, आरुष भागवत वायकर ५८, तर अदिती गुंडेराव पांढरे हिने ५७ पर्सेंटाईल गुण मिळवत यश संपादन केले आहे. या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक वैशाली केंद्रे, समन्वयक राजीव मुंढे, प्राचार्य जी. आर. मुंडे, राजेंद्र जायेभाये, प्रा. खटके, प्रा. ए. एस. खोत, प्रा. क्षीरसागर, प्रा. डी. ए. फंड, प्रा. वैशाली पाटील, गित्ते यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

## २७ एप्रिलपासून रोजगार सहाय्यकांचे बेमुदत धरणे आंदोलन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. २३ एप्रिल :** ग्रामरोजगार सेवक संघ, जिल्हा लातूरच्या वतीने प्रलंबित मागण्यांसाठी आंदोलनाची तीव्रता वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. २७एप्रिलपासून बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करण्यात आले आहे. शासनाच्या३ ऑक्टोबर २०२४ च्या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी, तसेच इतर प्रलंबित व न्याय्य मागण्यांसाठी जिल्ह्यातील सर्व रोजगार सहाय्यकांनी १ एप्रिल २०२६ पासून काम बंद आंदोलन सुरू केले आहे. मात्र, अनेक वेळा प्रशासनाशी पत्रव्यवहार करूनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. या पार्श्र्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व रोजगार सहाय्यक, जिल्हा पदाधिकारी व तालुका पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. बैठकीत एकमुखाने निर्णय घेऊन, मागण्या पूर्णपणे मान्य झाल्याशिवाय काम बंद आंदोलन मागे घेतले जाणार नाही, अशी ठाम भूमिका घेण्यात आली.

यावेळी जिल्हाध्यक्ष चांदभाई शेख, जिल्हा सचिव अमोल घायाळ, अवधूत खाडप, शिंदे, यांच्यासह अनेक रोजगार सहाय्यक उपस्थित होते.

## कुष्ठरोग निवारण केंद्राच्या वतीने क्षय रुग्णांना पोषण आहाराचे वाटप

**तभा वृत्तसेवा**



**लातूर दि. २३ एप्रिल :** लातूर जिल्हा कुष्ठरोग निवारण केंद्राच्या वतीने क्षयरुग्णांना फुड बास्केटचे वाटप करण्यात आले. लातूर येथील जिल्हा आरोग्य प्रशिक्षण केंद्रात झालेल्या या कार्यक्रमास सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग) डॉ. वैशीली मोहिते पाटील, लातूर आयएमएचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत, सचिव डॉ. विश्रांत भारती, व्हीडीजीएमसीचे सहाय्यक प्रोफेसर प्रा. डॉ. अभिजीत यादव, जिल्हा आरोग्य प्रशिक्षण केंद्राचे डॉ.

बाळासाहेब जाधव, डॉ. श्रीनिवास कदम ,डॉ. धनंजय सावंत आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी डॉ. मोहीते पाटील यांनी क्षणरुग्णांसाठी पोषक आहेर किती उपयुक्त असतो याबाबत सांगून क्षयरुग्णांना पोषण आहार उपलब्ध करून देण्यासाठी विविध उपक्रम राबवण्याची इच्छा व्यक्त केली. डॉ.

विश्रांत भारती यांनी टीबीच्या उपचाराबाबत माहिती सांगितली. डॉ. अभिजीत यादव यांनी क्षयरुग्णांना पोषण आहार कसा उपयुक्त आहे याबाबत सांगितले. प्रास्ताविक डॉ. हर्षवर्धन राऊत यांनी केले. यावेळी जिल्हा क्षयरोग केंद्र व जिल्हा कुष्ठरोग निवारण केंद्र येथील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## उमरगा बसस्थानकासमोर रिक्षा उभ्या करून वाहतुकीला अडथळा

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२३ एप्रिल -**

एनएच ६५ मार्गावरील बसस्थानकासमोर सार्वजनिक रस्त्यावर रिक्षा धोकादायकरीत्या उभ्या करून वाहतुकीस अडथळा निर्माण केल्याप्रकरणी उमरगा पोलिसांनी दोन जणांविरुद्ध स्वतंत्र गुन्हे नोंदवले आहेत.

याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, यशवंत विनायक मोरे (वय ३७, रा. आरोग्य नगरी, उमरगा) व गोविंद हणमंत घोडके (वय ४५, रा. बालाजी नगर, उमरगा) यांनी दि.२२ एप्रिल रोजी सायं. ६.१० ते ६.४५ वाजण्याच्या दरम्यान आपापल्या ताब्यातील टो रिक्षा (क्र. एमएच २५ ए.के. २२५७ व एमएच २५ एन १३०६) एनएच ६५ रोडवर बसस्थानकासमोर मेन रोडवरील डिवायडरच्या दक्षिण बाजूस उभ्या




केल्या होत्या.

या वाहनांमुळे वाहतुकीस धोका निर्माण होत असल्याचे आढळून आल्याने उमरगा पोलिसांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहिता कलम २८५ अन्वये दोघांविरुद्ध स्वतंत्र गुन्हे दाखल केले आहेत. पुढील तपास पोलीस करत आहेत.



### संक्षिप्त वृत्त...



## पोलीस अधीक्षक रितू खोकार यांचा सत्कार

**उमरगा, दि.२३ एप्रिल -**

तालुक्यातील जवळगा बेट ग्रामपंचायतीच्या वतीने धाराशिव येथे जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक रितू खोकार यांचा नागरी सत्कार करण्यात आला. त्यांच्या कर्तव्यदक्ष, धाडसी आणि प्रभावी कार्यशैलीबद्दल हा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. श्रीकांत गायकवाड, सरपंच लक्ष्मी झाकडे, उपसरपंच सचिन वाडीकर, माजी सरपंच प्रभाकर बिराजदार, सुरेश झाकडे आदी मान्यवर उपस्थित होते. पोलीस प्रशासन अधिक पारदर्शक, जबाबदार व जनतेसाठी कार्यक्षम बनविण्यात त्यांचे मोलाचे योगदान असल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल आणि समाजाप्रती असलेल्या समर्पणाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

## डोकेवाडीत हरिनाम सप्ताहानिमित्त आज महाआरोग्य शिबिर

**भूम, दि.२३ एप्रिल -**

तालुक्यातील डोकेवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यानिमित्त दि.२४ एप्रिल रोजी भव्य महाआरोग्य व सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. पंचायत समिती सदस्य बाळासाहेब खरवडे यांच्या पुढाकाराने आयोजित या शिबिराचे उद्घाटन माजी जिल्हा परिषद



सदस्य मधुकर मोटे यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी बाळासाहेब खरवडे राहणार आहेत. गटविकास अधिकारी एल. आर. वाझे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. डॉ. अमोल शिनगारे यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत तपासणी व औषध वाटप करण्यात येणार आहे. डॉ. सुबोध माने, डॉ. सुप्रिया शिंदे, डॉ. नंदकिशोर भडके, डॉ. विशाल नाईकवाडे, डॉ. गणेश नागरगोजे व डॉ. अश्विनी पन्हाळे हे तज्ज्ञ रुग्णांची तपासणी करणार आहेत.



## पाथरूड येथे मोफत थंडगार पाणपोईची सुविधा सुरू

**भूम, दि.२३ एप्रिल -**

ग्रामपंचायत कार्यालय पाथरूड यांच्या सौजन्याने बस स्थानकावर प्रवासी व ग्रामस्थांसाठी आरओचे शुद्ध थंडगार पाणी मोफत पाणपोईच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आले. या उपक्रमाचे उद्घाटन गावातील प्रतिष्ठित नागरिकांच्या हस्ते करण्यात आले. पाथरूड हे लांब पल्ल्याच्या बसचे जंक्शन असल्याने येथे प्रवाशांची मोठी वर्दळ असते. वाढत्या उन्हाच्या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतीने २००० लिटर क्षमतेच्या आरओ यंत्राद्वारे थंड पाण्याची सुविधा सुरू केली आहे. उद्घाटन प्रसंगी डॉ. चेतन बोराडे, भाऊसाहेब बोराडे, गजेंद्र खुणे, कांतीलाल तिकटे, जयराम तिकटे, युवराज तिकटे, महादेव गिरी, दत्तात्रेय पवार आदींसह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

# संघर्ष केला तरच अन्याय दूर होईल : मनोज जरांगे पाटील

## बहुजन योद्धा व डीएस ग्रुपतर्फे धाराशिवमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त भव्य मिरवणूक...

- भीम जयघोषाने धाराशिव नगरी दणाणली...
- हभप, भन्तेजी, मौलानांसह अठरापगड जाती-धर्मातील नागरिकांचा मिरवणुकीत सहभाग...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ एप्रिल -**

छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व जातीधर्मांचा आदर केला. त्यांच्याच विचाराचा वारसा घेऊन मी समाजासाठी मैदानात उतरलो आहे समाजातील सर्व घटकांमी आपल्यावरील अन्यायाची जाणीव झाली पाहिजे. त्यासाठी संघर्ष केला तर अन्याय दूर होईल. आपल्यावर झालेल्या अन्यायाला दूर करायचे असेल तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या लढ्याची जाणीव आपण करून घ्यावी, असे मत मराठा योद्धा मनोज जरांगे-पाटील यांनी या भव्य सोहळ्यात व्यक्त केले.

विश्वभूषण, बोधिसत्व, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त बहुजन योद्धा सामाजिक संघटना व डीएस ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि.२२) सायंकाळी पारंपारिक वाद्यांच्या गजरात भव्य मिरवणूक काढून जयंती उत्सव सोहळा साजरा करण्यात आला. मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांची उपस्थिती आणि हभप. भन्तेजी, मौलानांसह अठरापगड जाती-धर्मातील नागरिकांच्या सहभागाने मिरवणुकीचा उत्साह अधिकच वाढला. गेल्या २५ वर्षांपासून अठरापगड जाती-समूहांना एकत्रित करत बहुजन योद्धा सामाजिक संघटनेचे मार्गदर्शक धनंजय (नाना) शिंगाडे यांनी जयंती उत्सव समिती अध्यक्षपदाचा बहुमान सर्व जाती-धर्मातील व्यक्तींना दिला आहे. शहरातील क्रांती चौक भीम नगर येथे जयंती उत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी



मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे-पाटील, जयंती समितीचे मार्गदर्शक धनंजय शिंगाडे, समितीचे अध्यक्ष तथा सांजा गावचे सरपंच प्रवीण सूर्यवंशी, कार्याध्यक्ष सुधीर पवार, विशाल शिंगाडे, जातमुक्त गाव करणारे सौंदाळा गावचे सरपंच शरद आरगडे पाटील, मसूद शेख, ॲड. परवेज काझी, पंकज काटे, सुनील भराडीया, मौलाना अय्युब कासमी, मौलाना मुफ्ती, रहेमतुल्ला, मौलाना जाफर खानसाब, मौलाना सजीयोद्दीन शेख, मौलाना कारी कलीमसाब, भन्ते सुमेधजी नागसेन, भन्ते कमल धम्मो, भन्ते संघदूत, भन्ते विनीत धम्म, भन्ते सुमित बोधी, हभप. प्रकाश बोधले महाराज, हभप धनंजय महाराज सांजेकर आदी मान्यवरांची उपस्थिती होती. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करून त्रिशरण व पंचशील घेण्यात आले. कार्यक्रमात मनोज जरांगे पाटील यांचा शाल, पुष्पहार व सन्मानपत्र देऊन विशेष सन्मान उपस्थित मौलाना, भन्तेजी, हभप यांच्या हस्ते करण्यात आला. तर सौंदाळा गावचे सरपंच शरद आरगडे पाटील, अधीक्षक अभियंता संजय आडे यांचा सत्कार समितीच्या वतीने करण्यात आला. प्रास्ताविकात समितीचे मार्गदर्शक धनंजय शिंगाडे यांनी उत्सव सोहळ्याची पार्श्वभूमी विशद करून संघटनेमार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या सामाजिक कार्यक्रमाची माहिती दिली. तसेच मनोज जरांगे पाटील यांनी दलीत बहुजन समाजाचे नेतृत्व करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी मसूद शेख, समितीचे अध्यक्ष प्रवीण सूर्यवंशी यांनीही मनोगत व्यक्त केले. आशीर्वचन मार्गदर्शन हभप. प्रकाश महाराज बोधले, मौलाना जाफर महमदअली खान, भन्ते सुमेधजी नागसेन यांनी केले. जातमुक्त गाव संकल्पनेचे प्रेरणास्थान शरद आरगडे पाटील यांनीही यावेळी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दौलत निपाणीकर यांनी तर आभारप्रदर्शन समितीचे कार्याध्यक्ष सुधीर पवार यांनी केले. क्रांती चौक भीम नगर येथून शिस्तबद्धपणे, पारंपारिक वाद्यांच्या गजरात निघालेली ही मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे महापुरुषांना अभिवादन करून परत क्रांती चौक येथे विसर्जित करण्यात आली. या मिरवणुकीने सर्व धाराशिवकरांचे लक्ष वेधले. मिरवणुकीसाठी बहुजन योद्धा सामाजिक संघटना व डीएस ग्रुपच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

## वृद्ध महिलेचा विहिरीत ढकलून खून; भूम तालुक्यात खळबळ

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२३ एप्रिल -**

खोटे बोलून ६० वर्षीय महिलेस घरातून बोलावून पिकअपमध्ये बसवून निपाणी शिवारात नेऊन विहिरीत ढकलून देत निघृण खून केल्याची धक्कादायक घटना भूम तालुक्यातील निपाणी शिवारात उघडकीस आली आहे. या घटनेने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

या प्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात दोन संशयितांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी एका संशयितास अटक केली आहे, तर दुसरा आरोपी अद्याप फरार आहे.

फिर्यादी सूर्यभान एकनाथ गिते (वय ७०, रा. आंदुड, ता. भूम) हे पत्नी बदामबाई (वय ६०) यांच्यासह राहतात. २१ एप्रिलच्या मध्यरात्री १२ वाजण्याच्या सुमारास संशयित आरोपी प्रशांत राम महाकले (रा. लांजेश्वर, ता. भूम) आणि गणेश राजेंद्र गिरी (रा. आंदुड, ता. भूम) हे त्यांच्या घरासमोर पिकअप वाहन घेऊन आले. त्यांनी बदामबाई यांना सांगितले की, तुमचा नातू आजारी असून तुम्हाला तातडीने बोलावले आहे. नातवाच्या मायेपोटी बदामबाई त्यांच्यासोबत गेल्या.



मात्र पहाटेपर्यंत त्या घरी परत न आल्याने फिर्यादींनी शोध सुरू केला.

नातवाच्या घरी चौकशी केली असता तो आजारी नसल्याचे व बदामबाई तिथे गेल्याच नसल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर शोधमोहीम राबवण्यात आली.

दरम्यान, निपाणी शिवारातील एका विहिरीत बदामबाई यांचा मृतदेह तरंगताना आढळून आला. विहिरीच्या काठावर तुटलेल्या बांगड्या आढळल्याने त्यांना बळजबरीने विहिरीत ढकलल्याचे स्पष्ट झाले.

या घटनेनंतर वाशी पोलिसांनी तातडीने कारवाई करत प्रशांत राम महाकले याला अटक केली असून, गणेश राजेंद्र गिरी हा फरार आहे. या प्रकरणी खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक यशवंत घोडके करत असून, जुन्या वादातून किंवा अन्य कारणातून ही हत्या झाली का, याचा तपास सुरू आहे.

## कळंब बसस्थानकात गर्दीचा फायदा घेत ४३,५०० रुपयांची चोरी गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ एप्रिल -**

बसस्थानक परिसरात गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने प्रवाशाच्या खिशातील रोख रक्कम लंपास केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



फिर्यादी निलेश विष्णुदास मालपानी (वय ३६, रा. बालाजी मंदिर, मारवाडी गल्ली, कळंब, ह.मु. साईनगर, परळी रोड, कळंब) हे दि.२१ एप्रिल रोजी कळंब बसस्थानक येथे कळंब-धाराशिव बसमध्ये चढत असताना अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेत त्यांच्या पॅन्टच्या खिशातील ४३,५०० रुपये रोख रक्कम चोरून नेली.

या घटनेबाबत निलेश मालपानी यांनी दि.२२ एप्रिल रोजी दिलेल्या फिर्यादीवरून कळंब पोलीस ठाण्यातगुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करत आहेत.

## भूम तालुक्यात ‘फार्मर कप २०२६’ स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२३ एप्रिल -**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार पाणी फाउंडेशन, कृषी विभाग व उमेद अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने भूम तालुक्यात ‘फार्मर कप २०२६’ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

राज्यस्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या गटांना अनुक्रमे ५० लाख, ३० लाख व २० लाखांची बक्षिसे देण्यात येणार असून महिला गटांसाठी प्रत्येकी १० लाखांची विशेष बक्षिसे आहेत. जिल्हास्तरावरही विजेत्या गटांना रोख पारितोषिके दिली जाणार आहेत.

गटशेतीच्या माध्यमातून उत्पादन व उत्पन्न वाढविणे आणि शेती खर्च कमी करणे हा या स्पर्धेचा उद्देश आहे. यासाठी किमान ११ शेतकऱ्यांचा गट व एकूण किमान १५ एकर जमीन आवश्यक आहे. महिला, पुरुष तसेच मिश्र गटही सहभागी होऊ शकतात

स्पर्धेसाठी पाणी फाउंडेशनचे तीन दिवसांचे निवासी प्रशिक्षण अनिवार्य असून हे शिबिर दि.२७ ते २९ एप्रिल दरम्यान लोंढेवाडी (ता. माढा, जि. सोलापूर) येथे होणार आहे. इच्छुक शेतकरी गटांनी सहाय्यक कृषी अधिकारी अण्णासाहेब खटाळ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## धाराशिव येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरदचंद्र पवार) वतीने वक्ता प्रशिक्षण शिबिर संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ एप्रिल -**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) धाराशिव जिल्हा कार्यालय येथे वक्ता प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला कार्यकर्ते व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

शिबिरात मुख्य मार्गदर्शक म्हणून जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील व वक्ता प्रशिक्षण विभागाचे जिल्हाध्यक्ष तेजस भालेराव यांनी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले.

प्रभावी वक्तृत्वाचे महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी वक्ता कसा असावा, प्रभावी संवाद कसा साधावा



आणि समाजापर्यंत विचार प्रभावीपणे कसे पोहोचवावेत याबाबत सविस्तर माहिती दिली.

त्यांच्या मार्गदर्शनामुळे कार्यकर्त्यांना सार्वजनिक जीवनात संवाद कौशल्य विकसित करण्याची दिशा मिळाली.

कार्यक्रमाला जीवनराव गोरे, कळंब तालुकाध्यक्ष प्रा. तुषार वाघमारे, बाळासाहेब कसले (लीगल जिल्हाध्यक्ष), ॲड. अविनाश जाधव, प्रा. जालिंदर पोळ (शिक्षक सेल जिल्हाध्यक्ष), ॲड. योगेश सोन्नेपाटील, नगरसेवक पंकज भोसले, सुनील आंबेकर, नरसिंह मेटकरी, अभियंता सेल जिल्हाध्यक्ष सुरज वडवले, ॲड. बाळासाहेब आवड, जिंक्राईल पटेल, चेतन वाघमारे, गोपाळ टेकळे, किरण रोकडे, प्रा. तूरूप यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी विद्यार्थी बांधवही उपस्थित होते. या प्रशिक्षण शिबिरामुळे युवकांमध्ये प्रभावी वक्तृत्व कौशल्य विकसित होऊन सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय सहभाग वाढण्यास चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## पवनचक्की ट्रान्सफॉर्मरची तोडफोड; ३५ लाखांचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२३ एप्रिल -**

चिकुंद्रा शिवारात अज्ञात इसमांनी पवनचक्कीच्या ट्रान्सफॉर्मरची तोडफोड करून मोठे नुकसान केल्याची घटना समोर आली आहे.

दि.१३ एप्रिल रोजी अज्ञातांनी आर.एस.एल. पवनचक्कीच्या ट्रान्सफॉर्मरमधील सुमारे २,६०० लिटर ऑईल व कॉपर वायरचे नुकसान करत ट्रान्सफॉर्मर पूर्णपणे निकामी केला. यात सुमारे ३५ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. तसेच सुमारे १ लाख रुपयांचा कॉपर वायर व बसबार चोरीस नेल्याची नोंद आहे. या प्रकरणी पांडुरंग माणिक गरड यांच्या फिर्यादीवरून नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



## अतिवृष्टी व गारपीटीमुळे फळबागांचे नुकसान; धनंजय सावंत यांचा पाहणी दौरा

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२३ एप्रिल -**

अतिवृष्टी व अवकाळी पावसासह झालेल्या गारपीटीमुळे शेतकऱ्यांच्या फळबागांचे मोठे नुकसान झाल्याच्या पार्श्वभूमीवर मा. उपाध्यक्ष, जिल्हा परिषद सदस्य धनंजय सावंत यांनी सिरसाव (ता. परंडा) येथे पाहणी दौरा केला.

यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पपई, पेरू, मका, केळी, आंबा तसेच इतर फळबाग व पिकांचे नुकसान प्रत्यक्ष पाहिले. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांमध्ये शहाजी मिसाळ, तानाजी जाधव, नवनाथ मिसाळ, घनश्याम गावकरे, अनिल चौबे आदींचा समावेश होता. दौऱ्यादरम्यान सावंत यांनी तालुका व जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधत तहसीलदार व तालुका कृषी अधिकाऱ्यांना तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या. तसेच जिल्हाधिकारी व जिल्हा कृषी अधीक्षक यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत मिळावी, अशी मागणी केली.

# जिल्हा परिषद शाळांच्या गुणवत्तावाढीसाठी ऐतिहासिक पाऊल

## धाराशिव जिल्हा परिषदेची पहिली सर्वसाधारण सभा संपन्न... अनेक महत्वांच्या विषयांवर चर्चा...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ एप्रिल -**

जिल्हा परिषद अध्यक्ष अर्चनाताई पाटील यांनी पदभार स्वीकारल्यानंतर शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण आणि दूरदृष्टीपूर्ण निर्णय घेतला असून, जिल्हा परिषद शाळांमध्ये इयत्ता १ ली ते ५ वी पर्यंत सेमी-इंग्रजी माध्यमातून शिक्षण सुरू करण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि स्पर्धात्मक शिक्षण मिळावे, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे.



या संदर्भातील विशेष सर्वसाधारण सभा आज यशवंतराव चव्हाण सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. सभेत सर्व सदस्यांनी एकमताने ठरावास मंजुरी दिली. शिक्षण क्षेत्रातील हा निर्णय एक महत्त्वाचा टप्पा मानला जात असून, यामुळे जिल्हा परिषद शाळांच्या गुणवत्तावाढीस चालना मिळणार आहे. सभेदरम्यान सदस्यांनी शिक्षकांचे समायोजन, शाळांचे एकत्रीकरण तसेच शिक्षणाच्या दर्जावाढीबाबत सखोल चर्चा केली. अनेक सदस्यांनी आपल्या सूचना व मते मांडत निर्णयाला पाठिंबा दर्शविला.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर, उपाध्यक्ष उषाताई गायकवाड, तसेच सर्व सभापती, अधिकारी व जिल्हा परिषद सदस्य उपस्थित होते.

सुरुवातीला अध्यक्षा अर्चनाताई पाटील यांनी सर्वच जिल्हा परिषद शाळांमध्ये सेमी-इंग्रजी माध्यम सुरू करण्याचा ठराव मांडला. या वेळी सर्वच उपस्थित सदस्यांनी टाळ्यांच्या गजरात याला अनुमोदन दिले. ठराव कोणत्याही विरोधाशिवाय संमत करण्यात आला. या वेळी डायटचे प्राचार्य डॉ. दयानंद जटनुरे यांनी टॉप तज्ज्ञांच्या माध्यमातून शिक्षकांना प्रशिक्षण देणार असल्याचे सांगितले.

हा निर्णय केवळ शिक्षण पद्धतीतील बदल नसून, ग्रामीण विद्यार्थ्यांच्या भविष्यास नवी दिशा देणारा आणि त्यांना जागतिक स्पर्धेसाठी सक्षम बनविणारा ठरणार आहे.

# शहरातील नागरिकांना मूलभूत सुविधा पुरवा ; आ.बोंढारकरांचे मनपा प्रशासनाला निर्देश

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २३ एप्रिल -**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व नागरिकांना वेळेवर सर्व मूलभूत सुविधा पुरवा , अन्यथा कामात हायगय करणाऱ्यांची गय केली जाणार नाही अशा शब्दात आ.आनंदराव बोंढारकर यांनी महानगरपालिका प्रशासनाचे कान उघडणी केली.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका येथील सर्व विभागातील अधिकाऱ्यांची महानगरपालिका येथे आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांनी आज बैठक घेतली. या बैठकीत काम चुकारांना त्यांनी चांगलीच तंबी भरली.. शहरातील पाणीपुरवठा , लाईट ,ड्रेनेज , रोड




,नाल्या , घरकुल ,पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि येणाऱ्या पावसाळ्याच्या अनुषंगाने आपत्ती व्यवस्थापनाच्या उपाययोजना या कामाचाही त्यांनी आढावा घेतला. नांदेड शहरात विकास कामाच्या नावावर खोदून ठेवलेले रस्ते आद्यापही जसेच्या तसे आहेत , त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांचे हाल होत आहेत . अनेकांना जायबंदी व्हावे लागत आहे . त्यामुळे महानगरपालिकेच्या संबंधित विभागाने तातडीने हे खोदून ठेवलेले रस्ते दुरुस्त करून घ्यावेत अशा सूचना करताना उन्हाची तीव्रता वाढत असल्याने नागरिकांना पाणीटंचाई मोठ्या प्रमाणात भासू लागली आहे. कोणत्याही नागरिकांना पियाच्या पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ येणार नाही याची काळजी महानगरपालिका प्रशासनाने घेतली पाहिजे अन्यथा या कामात कामचुकारपणा करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल असा इशाराही त्यांनी दिला आहे. महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांच्या समस्यांकडे अधिकारी पाठ फिरवत असल्याची ओरड होत आहे . त्यामुळे नागरिकांना अनंत अडचणी येत आहेत. ही बाब लक्षात घेता महानगरपालिका प्रशासनाने तक्रारी घेऊन आलेल्या नागरिकांच्या तक्रारीचे त्याच दिवशी निराकरण करावे , कोणत्याही नागरिकांना चकरा मारण्याची वेळ आणू नये अन्यथा अशा अधिकाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारला जाईल असा गर्भित इशाराही त्यांनी दिला आहे.

यावेळी महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे,अतिरिक्त आयुक्त निलेश सुनकेवार,,उपायुक्त स.अजितपालसिंघ संधू,उपायुक्त नितीन गाढवे,शिवसेना जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे,शहरप्रमुख तुलजेश यादव,शहरप्रमुख सुहास खराणे पाटील,शहर अभियंता सुमंत पाटील,सहाय्यक आयुक्त गुलाम सादिक,पाणीपुरवठा कार्यकारी अभियंता संघरत्न सोनसळे,सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यकारी अभियंता दिलीप टाकळीकर,विद्युत विभाग उपअभियंता सतीश ढवळे,घरकुल विभाग प्रमुख प्रकाश कांबळे,एमएसईबी कार्यकारी अभियंता स.न.कांबळे,इतवारा विभाग क्षेत्रीय अधिकारी रावण सोनसळे,वजीराबाद विभाग क्षेत्रीय अधिकारी गौतम कव,आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.हनुमंत रिठे,अग्निशमन विभागाचे अधिकारी दासरे, श्याम पाटील वानखेडे,रवि थोरात यांच्यासह सर्व विभागांचे विभागप्रमुख उपस्थित होते..



**नांदेड - राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना महाराष्ट्र राज्य यांनी राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यासाठी दि.२१ एप्रिल पासून बेमुदत संप पुकारलेला आहे.सदर संपामध्ये निदेशक संघटना शाखा औ. प्र. संस्था नांदेड यांनी शंभर टक्के सहभाग नोंदऊन संप यशस्वी केला. यावेळी शाखा अध्यक्ष भोसीकर, चंदेल, शिलेदार,खडसे, बोडखे, सौ.हिसवणकर , सौ. लखमावाड , सौ. जाधव , सौ. जंगम तसेंच संघटनेचे इतर सभासद सहभागी होते.**

## फुले आंबेडकर जयंती निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

**नांदेड** -क्रांतीपिता महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन क्रांतिवीर लहुजी साळवे कर्मचारी कल्याण महासंघ लसाकम जिल्हाशाखा नांदेडच्या वतीने दि.२५ एप्रिल शनिवार रोजी वेळ १.३०वाजता हॉटेल ग्रँड मराठा छत्रपती चौक नांदेड येथे आयोजन करण्यात आले आहे . या कार्यक्रमाचे अध्यक्ष लसाकमचे जिल्हाध्यक्ष विजय रणखांब ,उद्घाटक म्हणून लसाकमचे महासचिव गुणवंत काळे ,स्वागताध्यक्ष चंद्रकांत मेकाले,हे असणार आहे . प्रमुख वक्ते म्हणून ज्येष्ठ विचारवंत . डॉ भगवानराव वाघमारे, लातुर यांचे सार्वजनिक सत्य धर्मावर व्याख्यान होणार आहे . तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन चरित्र व समाज यावर साहित्यीक प्रा. शेख निजाम यांचे मार्गदर्शन होणार आहे. योजना मार्गदर्शक म्हणून आरटी चे प्रकल्प व्यवस्थापक धोंडीबा नामवाड, अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक आर एन पवार ,जिल्हा उद्योग केंद्राचे जिल्हा उद्योग अधिकारी शिवाजीराव कासारकर हे मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी सत्कारमुर्ती शिवा कांबळे ,शिवाजीराव कासारकर ,शिवाजी टोम्पे, माधव डोम्पले ,डॉ एच एस पाटोडे, प्रणव खानापूरकर यांचा सत्कार करण्यात येणार आहे. मनपा उपकार्यकारी अभियंता प्रकाश कांबळे , ईंजी राजासाहेब बोराळे उपस्थित राहणार आहेत. यावेळी अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था ,आरटी मुंबईतर्फे प्रकल्प व्यवस्थापक धोंडीबा नामवाड हे एमपीएससीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत समाजासाठी असलेल्या आर्टीच्या योजनाची माहिती देणार आहेत .तसेच उदयोग विभागाच्या महिला व सुशिक्षित बेरोजगारांचे संदर्भात जिल्हा उद्योग अधिकारी शिवाजीराव कासारकर उद्योगाविषयी मार्गदर्शन करणार आहेत. आणि अण्णाभाऊ साठे महामंडळाच्या कर्ज प्रकरणाबद्दल जिल्हा व्यवस्थापक आर एन पवार माहिती देणार आहेत.या कार्यक्रमात समाज प्रबोधन , व्याख्यान,, उद्योगा विषयी मार्गदर्शन व विविध योजनांची माहिती या यावेळी देण्यात येणार असून समाजातील सर्व विद्यार्थी, सुशिक्षित बेरोजगार ,महिला व समाज बांधवांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहून या कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा असे आवाहन लसाकमचे सचिव पीएम सूर्यवंशी, प्रा. एन के वाघमारे, लक्ष्मण वाघमारे, बालाजी गव्हाले ,प्रा. मंगेश पोतंगले एमएम बसवंते ,एम के घोडजकर ,बाळासाहेब लोंढे, आकाश टोमके ,प्रशांत भिसे बालाजी गुंडले, चंद्रकांत भांडवले ,एस एन गजले शिवाजी मोरे ,जोशना वरवंटकर , चंदा पवार, एन एम वाघमारे, दीपा पौळकर, रविराज जाधव, सविता रणखांब यांनी केले आहे.

## जवळा मुरहार येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**मुदखेड** - मुदखेड तालुक्यातील जवळा मुरहार गावामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात व थाटामाटात साजरी करण्यात आली. यंदाच्या जयंती उत्सवात सर्व जाती-धर्मांच्या नागरिकांनी एकत्र येत सामाजिक ऐक्याचे दर्शन घडवले. जयंती निमित्त गावामध्ये आकर्षक सजावट करण्यात आली होती. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर भव्य मिरवणूक काढण्यात आली. ढोल-ताशांच्या गजरात व घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.या कार्यक्रमात सर्व समाजघटकातील युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. विविध सामाजिक संदेश देणारे फलक, तसेच समतेचा व बंधुभावाचा संदेश देणारे उपक्रम राबवण्यात आले. भीमजयंतीचे औचित्य प्रमुख वक्त्यांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे महत्त्व पटवून सांगितले व त्यांच्या मार्गावर चालण्याचे आवाहन केले. शिक्षण, समता आणि बंधुता या मूल्यांचा प्रचार-प्रसार करण्यावर भर देण्यात आला. एकूणच, जवळा मुरहार येथील जयंती उत्सवाने सामाजिक एकात्मतेचा आदर्श निर्माण करत गावातील नागरिकांनी एकजुटीचे सुंदर असा संदेश दिला आहे.



## तक्रारींचा पाऊस बातम्यांचा गजर तरीही कारवाई शून्य!

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. २३ एप्रिल -**

गावातील पाणीटंचाई, स्वच्छतेचे प्रश्न आणि रखडलेली विकासकामे याबाबत नागरिकांकडून वारंवार तक्रारी करण्यात येत असून, या समस्यांवर वृत्तपत्रांतूनही सातत्याने बातम्या प्रसिद्ध होत आहेत. मात्र, या सर्वानंतरही वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

गेल्या काही महिन्यांपासून गावातील विविध भागांत पाणीपुरवठा अनियमित असून, नागरिकांना दैनंदिन गरजांसाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे. महिलांना दूरवरून पाणी आणण्याची वेळ येत असल्याची माहिती नागरिकांनी दिली.

दरम्यान, स्वच्छतेच्या बाबतीतही समाधानकारक स्थिती नसल्याचे चित्र आहे. सार्वजनिक ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचलेले असून, नाल्यांची साफसफाई नियमित होत नसल्याची तक्रार करण्यात



येत आहे.

विकासकामांच्या बाबतीत मंजुरी मिळूनही काही प्रकल्प अद्याप अपूर्ण अवस्थेत आहेत. यामुळे कागदोपत्री प्रगती आणि प्रत्यक्षात विलंब अशी परिस्थिती निर्माण झाल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

तक्रारी देतो, बातम्या येतात पण वरिष्ठ अधिकारी लक्ष देत नाहीत, अशी प्रतिक्रिया काही नागरिकांनी व्यक्त केली.

या पार्श्वभूमीवर संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या सर्व बाबींवर गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने उपाययोजना कराव्यात, तसेच नागरिकांना दिलासा देण्यासाठी ठोस निर्णय घ्यावेत, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## नांदेड ग्रामीण पोलीसांनी १३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त ; १७आरोपींता विरूद्ध गुन्हा दाखल

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २३ एप्रिल -**

नांदेड ग्रामीण पोलिसांनी गोपनीय माहितीनुसार चंदा सिंग कॉर्नर येथ नाकाबंदी करून अवैद्यरित्या तेलंगणातून महाराष्ट्रात येणारा १३ लाख ४० हजाराचा गांजा जप्त करण्यात आला असून सदरील गुन्ह्यातील १७ आरोपींतावर नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे येथे गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत चंदासिंग कॉर्नर या मार्गाने जाणारी तेलंगणा पासिंग टी एस ०९ युसी ६०८५ मारुती कंपनीची कार च्या डिकीत गांजाचे बॉक्स जात असल्याची गोपनीय माहिती मिळाल्या मिळताच ग्रामीण नाकाबंदी करून सदरील कार व गांजाचे अकरा बॉक्स व मारुती कंपनीची कार ताब्यात घेतली असा एकूण १३ लाख ४० हजार किमतीचा मुद्देमाल जप



करण्यात आला ही कार्यवाही ग्रामीण ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सदरील गुन्ह्यातील आरोपी अकबर अहमद खा पठाण रा. क्रांतीनगर अंबाजोगाई जिल्हा बीड, माधव विठ्ठल जाधव रा. धर्मापुरी तांडा कंधार, अतुल कवडे रा. दीपक नगर नांदेड, बालाजी कांबळे रा. गोविंद नगर नांदेड, शंकर ओमार रा. सांगवी नांदेड, संतोष करनेवाड रा. बसंत नगर नांदेड, शेख शफी रा. नुरी चौक नांदेड, शेख सादिक रा. नुरी चौक नांदेड, मोहम्मद इसाक पी महंमद रा. नांदेड, महंमद हमीद रा. शिवाजीनगर नांदेड, लंगड तशु रा. बिलाल नगर नांदेड, नवाब रा. बिलाल नगर, सैफ रा. नांदेड, संघर्ष पोवळे व तीन अनोळखी इसम यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील कारवाई पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि. ज्ञानेश्वर भोसले, बाबुराव चव्हाण, ज्ञानेश्वर मठवाड, यांच्यासह पोहे का वसंत केंद्रे, समीर अहमद, शंकर माळगे, कल्याणकर ,पोका. पवार, सिरमलवार, देवकते व गृहरक्षक दलांचे कर्मचारी यांनी कारवाई केली. सदरील कारवाई केल्याबद्दल जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे कौतुक केले

## आंबेडकरवादी लोकमंच नांदेडच्या वतीने भिम जयंती निमीत्त प्रबोधन महासभा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २३ एप्रिल -**

आंबेडकरवादी लोकमंच नांदेड तर्फे भारतीय संविधानाचे जनक डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा १३५ वा जयंती महोत्सव नांदेड शहरात येत्या रविवारी दि. २६ एप्रिल २०२६ रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. यामध्ये सायंकाळी ४ वाजता शंकरराव चव्हाण सभागृहात धर्मनिरपेक्ष भारताचे भवितव्य विषयावर मराठवाड्यातील जेष्ठ आंबेडकरवादी नेते मा. सुरेशदादा गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली



प्रबोधन महासभा आयोजित करण्यात आली आहे.

या महासभेस नांदेड जिल्ह्याचे खासदार रविंद्र चव्हाण तसेच लोहा कंधार तालुक्याचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर हे यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

या महासभेत राजधानी दिल्लीतील नामवंत पत्रकार अशोक वानखेडे, मुंबईतील डॉ. आंबेडकर लॉ कॉलेजचे माजी प्राचार्य, बहुजन समाज पार्टीचे मुंबई - कोकण क्षेत्राचे प्रभारी ॲड. जयमंगल धनराज, मुंबई मराठी पत्रकार संघाचे कार्यकारीणी सदस्य जेष्ठ पत्रकार दिवाकर शेजवळ हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार असल्याची माहिती आंबेडकरवादी लोकमंचचे महासचिव प्रा. देविदास मनोहरे आण पी. एस. गवळे यांनी दिली.

यंदाचे वर्ष हे महाडच्या चवदार तळ्याच्या समता संगराच्या शताब्दीचे आहे,तसेच महात्मा ज्योतीबा फुले यांच्या दिशताब्दीचे ही आहे त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती महोत्सवात यावर्षी दलित-बहुजन समाजात मोठा जोश आणि चैतन्य संचारले आहे असे आंबेडकरवादी लोकमंचचे संस्थापक अध्यक्ष मा. सुरेशदादा गायकवाड यांनी पत्रकारांशी बोलतांना सांगितले. या पत्रकार परिषदेस आंबेडकरवादी लोकमंचचे जनार्दन कवडे, नंदकुमार बनसोडे, प्रसेनजीत गायकवाड, ॲड.एम.जी. बादलगांवकर, बबीताताई पोटफोडे, बाळु कदम, भगवान गायकवाड इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

## विजय जोशी यांचा झुंजार पत्रकार पुरस्कार देऊन गौरव

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २३ एप्रिल -**

शब्दांची शस्त्रे हातात घेऊन समाजहितासाठी अविरत लढणाऱ्या ज्येष्ठ पत्रकारांचा सन्मान होताना अभिमानाचे वातावरण निर्माण झाले. सामना वर्तमानपत्राचे जिल्हा प्रतिनिधी, राज्य शासनाच्या अधिस्वीकृती मंडळाचे लातूर विभागाचे अध्यक्ष तथा मराठी पत्रकार परिषदेचे माजी कोषाध्यक्ष विजय जोशी यांना परशुराम तेजोत्सव कार्यक्रमात झुंजार पत्रकार पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.

हा प्रेरणादायी सोहळा अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. महासंघाचे प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर यांच्या हस्ते



मान्यवर पत्रकारांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात आला.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर बोलताना विजय जोशी यांनी भावना व्यक्त करत सांगितले की, ब्राह्मण समाजाच्या वतीने मिळालेला हा सन्मान माझ्या आयुष्यातील सर्वोच्च पुरस्कार आहे. हा पुरस्कार केवळ गौरव नसून माझ्यावर ठेवलेला विश्वास आहे. त्यामुळे माझी सामाजिक जबाबदारी आणि दायित्व अधिक वाढले आहे.

समाजातील बांधवांचे प्रश्न सोडविण्यासाठी समाजा सोबत खांद्याला खांदा लावून कार्य करीन.

यावेळी निखिल लातूरकर यांनी आपल्या मनोगतात समाजासमोरील वास्तव मांडले. ते म्हणाले, ब्राह्मण समाजातील अनेक कुटुंबांचे आर्थिक प्रश्न गंभीर आहेत. गुणवंत विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य मिळावे, यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. समाजातील दानशूर व्यक्ती, उद्योजक आणि सज्जन शक्तींनी पुढे येऊन या उपक्रमात हातभार लावणे ही काळाची गरज आहे.

या प्रसंगी शहरातील विविध वर्तमानपत्राचे पत्रकार किरण कुलकर्णी, बजरंग शुक्ला, प्रल्हाद कांबळे, संतोष कुलकर्णी, प्रशांत गवळे, कृष्णा उमरीकर आणि रमेश देवडे यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष कुलकर्णी यांनी केले. सन्मान, सामाजिक बांधिलकी आणि पत्रकारितेच्या मूल्यांचा संगम घडविणारा हा सोहळा उपस्थितांच्या स्मरणात राहणारा ठरला.

## हिमायतनगरमधील दोन कृषी केंद्रांचे परवाने निलंबीत

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. २३ एप्रिल -**

रासायनिक खत साठा, खरेदी, विक्री मध्ये कमालीची अनियमितता आढळून आल्याने जिल्हा प्रशासनाने हिमायतनगरच्या दोन कृषी केंद्रावर परवाना निलंबनाच्या कारवाईचा बडगा उगारला आहे. यामध्ये शहरातील शिल्पा कृषी सेवा केंद्र व समृद्धी बिज भांडार या दोन कृषी सेवा केंद्राचा समावेश आहे.

खरिप हंगाम २०२६ या चालू हंगामात शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे व रासायनिक खते आणि किटक नाशक औषधी याचा सुरळीत पुरवठा व्हावा या साठी कृषी विभागाने जिल्ह्यात धडक तपासणी मोहीम हाती घेतली असून यामध्ये दोषी व नियमाचे उल्लंघन करणाऱ्या जिल्ह्यातील १६ कृषी केंद्राचे परवाने निलंबित करण्यात आले. विशेषत्वाने हिमायतनगरच्या शिल्पा कृषी सेवा केंद्र व तसेच समृद्धी बिज भांडार या दोन कृषी दुकानाचा समावेश आहे. जिल्हा कृषी अधिक्षक तथा परवाना अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी हि कारवाई दि. १७ एप्रिल रोजी केली आहे. येथील या दोन्ही कृषी केंद्राच्या खत साठा व इतर बाबींमध्ये गंभीर त्रुटी आढळून आल्या आहेत. त्यांच्याकडून सादर करण्यात आलेले खुलासे असमाधानकारक आढळून आल्याने व तसेच नियमाचे उल्लंघन सिद्ध झाल्याने त्यांचेवर परवाने निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. शहरातील दोन महत्वपूर्ण कृषी केंद्रावर जिल्हा प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला असल्याने रासायनिक खताचा काळा बाजार करणाऱ्यांचे येथे चांगलेच धाबे दणाणले आहेत.

## लोहा- कंधार कृषी कार्यालयात कोट्यवधींचा गैरव्यवहार उघड होण्याची संकेत

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. २३ एप्रिल -**

लोहा व कंधार तालुक्यातील कृषी कार्यालयांमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप विकास निळकंठ पाटील गारोळे यांनी केला आहे माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत नादेड जिल्हाधिकारी कार्यालय सविस्तर अर्ज सादर करुन संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली आहे.

शेतकरी योजना ठिबक,तुषार सिंचन योजना, फळबाग लागवड योजना, बियाणे व औषधे खरेदी, कृषी अवजारे वितरण, शेतकरी गटांना दिलेले अनुदान, टेंडर प्रक्रिया व मनरेगा (चठएत्रुड) आणि ढच योजनांमधील खर्च व लाभार्थी यांची तपशीलवार माहिती मागवली आहे. संबंधित अधिकाऱ्यांचे हालचाल रजिस्टर, तपासणी अहवाल व ऑडिट रिपोर्ट यांचाही समावेश यात करण्यात आला आहे.

सबधीत विभाने बोगस लाभार्थी दाखवून अनुदानाचा अपहार, बनावट बिलांद्वारे खरेदी, निकृष्ट दर्जाचे साहित्य पुरवठा, टेंडर प्रक्रियेत गैरव्यवहार तसेच प्रत्यक्ष काम न करता कागदोपत्री काम पूर्ण दाखविणे असे गंभीर प्रकार घडल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे शासनाच्या निधीचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय झाल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

अर्जदाराने यापूर्वीही अनेक वेळा माहिती अधिकार अर्ज व प्रथम अपील करूनही संबंधित कार्यालयाकडून माहिती देण्यात टाळाटाळ करण्यात आल्याचा आरोप केला आहे. माहिती अधिकार कायद्याचे उल्लंघन असल्याचे त्यांने नमूद केले आहे.या पार्श्वभूमीवर जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी नांदेड यांच्या मर्फत स्वतंत्र उच्चस्तरीय चौकशी समिती नेमून या संपूर्ण प्रकरणाची सखोल तपासणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना तात्काळ निलंबित करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचीही मागणी अर्जात करण्यात आली आहे.आर्जात नमुद केलेली माहिती ३० दिवसांच्या आत मिळावी सबधीत आधिकारी याच्यावर कारवाई न झाल्यास २९ एप्रिल २०२६ पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसण्याचा इशारा विकास पाटील गारोळे यांनी दिला आहे.

**कृर्षी कार्यालयातील महिला वर्ग मानसिक तणावात**

लोहा कृर्षी कार्यायात आधिकर्याकडुन महिला वर्गाला वेटीस धरण्याचा प्रकारात वाढ झाली आहे या प्रकारात अनेक महिलाची कुचबना केली जात आहे. सकाळी लवकर या नसेलतर कार्यालयाच्या बाहेर बसवले जाते,आणि मधुन दाराला कोडी लावली जाते अनेक महिला मानसिक तनावात वावरत आहेत, काही लाहान मुलाच्या माता आहेत यामुळे काही माताना थोडाफार उशिर होतो पण आधिकारी एकुन घेण्याच्या मनस्थीत राहात नाही उशिर झाला की बाहेर थाबा असे फर्मान सोडले जाते याकडे वरिष्टानी लक्ष देऊन अयोगाकडुन निवड झालेल्या आधिकार्याला समज द्यावी असे कर्माचारी महिला वर्गातुन बोलले जाते.

## स्त्रीमध्ये माया, शक्ती, बुद्धी आणि करुणेचा संगम असतो : डॉ. मधुश्री सावजी

### स्त्रीची सक्षमता ही चारित्र्यात असते : दिपाली काटे



तभा. वृत्तसेवा

**केज प्रतिनिधी** | स्त्री ही सृष्टीची शक्ती मानली जाते मानव जातीचे अस्तित्व स्त्रीपासून आहे. सृष्टीचे अस्तित्व निरंतर टिकवून ठेवणे ही महत्वपूर्ण जबाबदारी निसर्गाने स्त्रीवर सोपविली आहे. आपल्या प्राचीन ग्रंथामध्ये स्त्रीचे महत्व अधोरेखीत करतांना असे म्हटले जाते की, "यत्र नारायस्तु पुजन्ते रमन्ते तत्र देवता" म्हणजे जिथे स्त्रियांची पुजा केली जाते तेथे देवता वास करतात. श्रद्धा हे रूप स्त्रीचे व विश्वास हे रूप पुरुषाचे आहे. देव देवतांच्या नावांमध्ये देखील पहिले स्थान स्त्रीचे आहे जसे लक्ष्मीनारायण, राधाकृष्ण, सीताराम, सिद्धिविनायक. अर्थात स्त्री ही परमसत्ता आहे, त्यामुळे स्त्री ही खूप सक्षम आहे. स्त्रीचे अनेक रूपे आहेत. स्त्रीशक्ती, सामर्थ्य, धैर्य आणि विविध गुणांचे प्रतीक मानले जातात. प्रत्येक स्त्रीमध्ये माया, शक्ती, बुद्धी आणि करुणेचा संगम असतो असे प्रतिपादन छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. मधुश्री संजीव सावजी यांनी केले.

केज येथील स्वामी विवेकानंद विद्या मंदिर या शाळेमध्ये दि. २३ एप्रिल रोजी जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित स्व. विश्वंभर कोकिळ जीवन विकास व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प गुंफण्यासाठी प्रमुख वक्त्या म्हणून छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. मधुश्री संजीव सावजी, अखिल भारतीय मंत्री, विद्याभारती अखिल भारतीय शिक्षा संस्थान. या उपस्थित होत्या. तर अध्यक्षा म्हणून सौ. दिपाली काटे प्रवचनकार तथा ज्ञानेश्वरी अभ्यासक, रामकृष्ण परमहंस परिवार केज. यांनी उपस्थिती दर्शवली.

# बांधाला लावलेली आग पडली महागात; सावलीत उभी केलेली 'इर्टिगा' जळून खाक

तभा. वृत्तसेवा

**बीड (प्रतिनिधी)** | बीड जिल्ह्यात उन्हाळ्याच्या झळा तीव्र होत असून एक महिन्यावर पावसाळा आल्याने शेतीतील कामाला वेग आला आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत शेतातील कचरा किंवा बांध पेटवणे किती धोकादायक ठरू शकते, याचा प्रत्यय आष्टी तालुक्यातील जामगाव ते ह.ना. आष्टा रोडवर आला आहे. शेतातील बांधाला लावलेली आग वाऱ्यामुळे पसरल्याने, जवळच झाडाच्या सावलीत उभी केलेली एक आलिशान 'इर्टिगा' कार काही क्षणांत जळून खाक झाली. या भीषण घटनेत गाडीची अक्षरशः राखरांगोळी झाली असून, संबंधित वाहनधारकाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जामगाव-ह. ना. आष्टा मार्गावर एका शेतकऱ्याने आपल्या शेतातील



बांधावरील पालापाचोळा आणि कचरा स्वच्छ करण्यासाठी तो पेटवून दिला होता. उन्हाची तीव्रता आणि सोसाट्याचा वारा असल्यामुळे ही आग काही वेळातच नियंत्रणाबाहेर गेली. याच दरम्यान, कडक उन्हापासून बचाव व्हावा म्हणून एका वाहनधारकाने आपली पांढऱ्या रंगाची इर्टिगा गाडी रस्त्याशेजारील एका झाडाच्या सावलीत उभी केली होती.

बांधावरून पसरत आलेली आग थेट गाडीपर्यंत पोहोचली. वाळलेले गवत आणि वाऱ्याच्या वेगामुळे आगीने रौद्र रूप धारण केले. गाडीने पेट घेतल्याचे लक्षात येताच आजूबाजूच्या लोकांनी धाव घेतली, मात्र आगीची तीव्रता इतकी मोठी होती की पाहता पाहता संपूर्ण गाडी आगीच्या भक्ष्यस्थानी पडलीया घटनेत गाडीचे इंजिन, टायर आणि आतील सर्व भाग पूर्णपणे जळून खाक झाले आहेत. गाडीची केवळ लोखंडी सांगाडा शिल्लक राहिला आहे. लाखो रुपयांची गाडी डोळ्यादेखत जळताना पाहून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.सध्या उन्हाचा पारा ४० अंशांच्या पार गेला असून सर्वत्र कोरडे गवत आणि पालापाचोळा साचलेला आहे.

अशा परिस्थितीत शेतकरी अनेकदा मशागतीसाठी बांध पेटवतात. मात्र, वाऱ्यामुळे ही आग शेजारील पिके, ठिबक संच किंवा रस्त्यावरील वाहनांपर्यंत पोहोचून मोठे अनर्थ घडू शकतात. त्यामुळे उन्हाळ्यात बांध पेटवताना किंवा आग लावताना विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

## शेतकरी ग्राहकांनी खरीप हंगाम बियाणांसाठी तात्काळ अर्ज सादर करावेत - अनिल बोर्डे

तभा. वृत्तसेवा

**गेवराई (प्रतिनिधी)** | शेतकरी ग्राहकांनी शासकीय योजनेअंतर्गत सवलतीच्या दराने मिळणाऱ्या खरीप हंगाम बियाणांसाठी २०२६ "महा डीबीटी " अर्ज तात्काळ सादर करावेत असे आवहान सचिन गिरी तालुका कृषी अधिकारी व बीड जिल्हा ग्राहक पंचायत उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांच्या संयुक्त पत्रका द्वारे करण्यात येत आहे.

खरीप हंगाम २०२६ साठी विविध शासकीय योजनेअंतर्गत सवलतीच्या दरात मिळणाऱ्या बियाणांसाठी शेतकरी ग्राहकाने " महाडीबीटी " पोर्टलवर तात्काळ अर्ज सादर करावेत.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा आणि पोषण अभियान अंतर्गत ज्वारी ,मका, सोयाबीन , तुर, मुग आणि उडीद या पिकाच्या प्रमाणित बियाणे वितरणासाठी ही प्रक्रिया राबविली जात आहे. यामध्ये १० वर्षाच्या आतील व १० वर्षावरील अधिसूचित वाण तसेच गळीत धान्य( तेलबिया) अभियानांतर्गत ५ वर्षाच्या आतील वाणाचा समावेश आहे. लाभार्थ्यांची निवड "आधी अर्ज करणाऱ्या प्राधान्य "या तत्त्वावर केली जाणार आहे.

इच्छुक शेतकरी ग्राहकाने संबंधित संकेतस्थळावर जाऊन अर्ज करावा. वैयक्तिक शेतकऱ्यांनी ॲग्री ट्रॅक

फॉर्मर आयडी द्वारे व शेतकरी गट व उत्पादक कंपनी यांनी अधिकृत सदस्याच्या ॲग्री स्टिक फार्मर आयडी द्वारे महा डीबीटी प्रणाली द्वारे नोंदणी करावी. नोंदणी प्रक्रिया दिनांक १५ मे २०२६ पर्यंत सुरू राहणार असल्याची माहिती सचिन गिरी तालुका कृषी अधिकारी गेवराई यांनी दिली आहे.

तरी शेतकरी ग्राहकांनी या योजनेचा लाभ मोठ्या प्रमाणात घेण्यात यावा असे आवहान ग्राहक पंचायत महाराष्ट्र बीड जिल्हा उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी केले आहे.

## कष्टातून यशाचे शिखर: माजलगावच्या भोई समाजातील पहिली महिला डॉक्टर स्वाती भुजंगे



तभा. वृत्तसेवा

**माजलगाव** | जिद्द आणि परिश्रमाच्या जोरावर कोणत्याही संकटावर मात करता येते, हे माजलगाव येथील डॉ.स्वाती राजाभाऊ भुजंगे यांनी सिद्ध करून दाखवले आहे. मराठवाड्यातील भोई समाजातून एम.बी.बी.एस. (MBBS) पूर्ण करणाऱ्या त्या पहिल्या महिला विद्यार्थिनी ठरल्या आहेत. त्यांच्या या यशाने संपूर्ण जिल्ह्यातून त्यांचे कौतुक होत आहे.

डॉ.स्वाती यांचे वडील, राजाभाऊ भुजंगे, व्यवसायाने मच्छीमारी व वीट भट्टी कामगार आहेत. अत्यंत सामान्य आर्थिक परिस्थिती असतानाही त्यांनी आपल्या मुलींच्या शिक्षणात कोणतीही कमतरता भासू दिली नाही. स्वतः उन्हात-पाण्यात मेहनत करून त्यांनी मुलींना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. एका मच्छीमार वडिलांच्या कष्टाचे चीज करत स्वाती यांनी वैद्यकीय क्षेत्रात हे दैदीप्यमान यश संपादन केले आहे. स्वाती यांनी आपले एम.बी.बी.एस.चे शिक्षण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, मिरज येथून यशस्वीपणे पूर्ण केले. प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी आपला आत्मविश्वास ढळू दिला नाही. भोई समाजातील मुलींनी उच्च शिक्षणाकडे वळावे, यासाठी त्यांचे हे यश मैलाचा दगड ठरणार आहे.


मराठवाड्यातील भोई समाजाच्या वतीने डॉ.स्वाती भुजंगे यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले आहे. "समाजातील एका मुलीने डॉक्टर होणे, ही संपूर्ण समाजासाठी अभिमानाची गोष्ट आहे," अशा भावना समाजातील मान्यवरांनी व्यक्त केल्या आहेत. डॉ.स्वाती भुजंगे यांच्या या यशामुळे ग्रामीण भागातील अनेक मुलींना शिक्षणाची नवी उमेद मिळाली आहे.

## श्रीक्षेत्र नेकनुर मध्ये आठ दिवस अवतरणार "भक्तीपंढरी", संत बंकटस्वामी महाराज 82 व्या पुण्यतिथी सोहळा

## रामायणाचार्य संजय महाराज पाचपोर यांची भव्य राम कथा..आठ दिवसात बंकटस्वामी महाराज संस्थान करणार गरजू मुलींचे कन्यादान

तभा. वृत्तसेवा

**नेकनुर (प्रतिनिधी)** | वारकरी सांप्रदायाचे भक्ती सूर्य संत श्रीगुरु. बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित श्री क्षेत्र नेकनूर येथे भव्य अखंड हरिनाम सप्ताह व भव्य श्रीराम कथेचे आयोजन करण्यात आले आहे . दि २५ एप्रिल २०२६ वार शनिवार ते दिनांक २ मे २०२६ वार शनिवार या आठ दिवसाच्या कालावधीमध्ये भव्य ज्ञानयज्ञ संपन्न होणार आहे. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध रामायणाचार्य विदर्भरत्न श्री ह भ प गुरुवर्य संजय महाराज पाचपोर यांच्या सुश्राव्यवाणी मधून श्रीराम कथा श्रवण करता येणार आहे. तसेच आठ दिवस महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकारांची कीर्तने होणार आहेत.यात २४ तास अखंड अन्नदान आणि ज्ञानदान सोहळा होणार आहे.. या सर्व कार्यक्रमाला भाविक भक्तानी लाभ घ्यावा. असे आवाहन श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी केले आहे..



बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र नेकनूर येथे संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८२ व्या पुण्यतिथी उत्सवाला दि २५ एप्रिल पासून सुरुवात होणार आहे यात आठ दिवस कार्यक्रमाची रेलचेल राहणार आहे..पहाटे ४ ते ६ काकडा भजन ,सकाळी ७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण , १० ते १२ गाथा भजन , दुपारी १२ ते २ भोजन ,२ ते ५ भागवत कथा, ५ ते ६ हरीपाठ रात्री ८.३० ते १०.३० हरिकिर्तन व ११ नंतर संगीत भजन व हरीजागर होईल . दिनांक २५ मे २०२५ रोजी सकाळी ८ वाजता बंकटस्वामींच्या पालखीची नेकनूर येथिल बंकटस्वामी शिक्षक कॉलनी येथून भव्य शोभा यात्रा निघणार आहे.

## कपिलधारवाडी येथे 5 दिवसीय भव्य कीर्तन महोत्सवाचे आयोजन

तभा. वृत्तसेवा

**बीड प्रतिनिधी** | सर्व भाविक भक्तांना आध्यात्मिक आनंदाची पर्वणी ठरणारा ५ दिवसीय भव्य कीर्तन महोत्सव कपिलधारवाडी येथे आयोजित करण्यात आला आहे. ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या शुभहस्ते व अध्यक्षतेखाली श्री वाघेश्वरी मातांच्या कलशारोहणा वर्धापन दिनानिमित्त हा महोत्सव संपन्न होत आहे.

हा कीर्तन महोत्सव शनिवार दि. २५ एप्रिल २०२६ ते बुधवार दि. २९ एप्रिल २०२६ या कालावधीत पार पडणार आहे. दररोज सकाळी काकडा भजन, गाथा भजन, सायंकाळी हरिपाठ, रात्री हरिकीर्तन व त्यानंतर हरिजागर असा धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. महोत्सवाच्या दरम्यान विविध नामांकित कीर्तनकारांची कीर्तने होणार आहेत. शनिवार दि. २५ एप्रिल रोजी ह.भ.प. गणेश महाराज अस्वले बंकटस्वामी मठ संस्थान नेकनुर, रविवार दि. २६ एप्रिल रोजी ह.भ.प. शुभम महाराज वसंतगडकर, सोमवार दि. २७ एप्रिल रोजी ह.भ.प. मनीषाताई डांगे सोनेसांगवी पुणे, तर मंगळवार दि. २८ एप्रिल रोजी ह.भ.प. भाग्यश्री मोहिते परभणी यांची कीर्तने सेवेचे आयोजित करण्यात आली आहेत.

बुधवार दि. २९ एप्रिल रोजी सकाळी१० ते १२ या वेळेत ह.भ.प. गुरु. महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांचे काल्याचे कीर्तन होणार असून त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून सर्व भाविकांनी उपस्थित राहून या पाच दिवसीय कीर्तन महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या महोत्सवासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून ह.भ.प. श्री हरिहारनंद भारती महाराज(मोरेश्वर संस्थान कोळवाडी), विश्वनाथ आप्पा सलगर (श्रीक्षेत्र कपिलधार), दत्त उपासक वैजिनाथ महाराज शिंदे(श्री दत्त संस्थान बालाघाट) यांसह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## पीडितेने दिला पोलिसात जवाब; तपासात अनेक गोष्टी समोर येण्याची शक्यता

तभा. वृत्तसेवा

**माजलगाव** | दोन दिवसांपूर्वी माजलगाव शहरातील बेकर्स लाँज या कॅफे मधे एका तरुणीवर अत्याचार झाला. हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांनी आरोपीला पोलिसांच्या ताब्यात दिले. मुलीच्या आईने केलेल्या तक्रारी नंतर आरोपी अरमान रहीम शेख रा. इंदिरा नगर माजलगाव याच्या विरुद्ध पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल झाला. काल दुपारी पीडित मुलीने आई सोबत पोलीस स्टेशन येथे जाऊन जवाब दाखल केला आहे.

माजलगाव शहरात घडलेल्या घटने नंतर संपूर्ण जिल्हा हादरून गेला प्रकरणाला लव्ह जेहादचा कंगोरा असण्याची दाट शक्यता आहे.आज पीडित मुलगी जवाब देण्यासाठी डी. वाय. एस. पी. कार्यालयात दाखल झाली तपास अधिकारी महेश भोसले यांनी पीडित मुलीचा जवाब घेतला असून अनेक धक्कादायक बाबी लवकरच उजेडात येतील असे दिसते.

मुलगी मेडिकलला जात असताना मुलीचा पाठलाग पोलिसांनी घेतले ताब्यात.

आज सकाळी पीडित मुलगी तिच्या आई सोबत माजलगावात आली सकाळपासून दोन तरुण तिचा पाठलाग करू लागले. मुलगी व आई घाबरून बस स्थानकात गेले तिथेही हे तरुण त्यांच्या मागोमाग गेले मुलीच्या आईने डी. वाय. एस. पी कार्यालय गाठले तिथेही हे तरुण त्यांचा पाठलाग करतं आले तेंव्हा मुलीच्या आईने तेथील पोलिसांना या बाबत सांगितले पोलिसांनी तात्काळ या तरुणांना ताब्यात घेतले आहे. मुलीला मेडिकल चेक अप साठी पाठवले असून लवकरच मेडिकलचा रिपोर्ट येणारं असल्याचे समजते.

मुलीला पोलीस संरक्षणाची गरज

पीडित मुलगी ग्रामीण भागातील असून रोज तिला तपासासाठी शहरात यावे लागत आहे तिच्यासोबत तिची केवळ आई असून प्रकरणाचा तपास पूर्ण होईपर्यंत त्यांना पोलीस संरक्षणाची आवश्यकता आहे आज ज्याप्रमाणे दोन तरुणांनी त्यांचा पाठलाग केला त्यावरून त्यांना पोलीस संरक्षण दिल्यास मुलगी भयमुक्त राहून पोलीस तपासात सहकार्य करेल अशी कुटुंबाची भावना आहे.

# किल्ले धारूरच्या सिरसठ बंधूंची संघर्षातून यशाची गाथा, संघर्षातून यशाचे उत्तुंग शिखर: धारूरच्या सिरसठ बंधूंची प्रेरणादायी 'भाग्यश्री' गाथा!

### शून्य ते विश्व: मजुरीपासून ते दीड हजार हातांना काम देण्यापर्यंतचा थक्क करणारा प्रवास; ऐतिहासिक धारूरच्या शिरपेचात मानाचा तुरा.

**शब्दांकन ( सुर्यकांत जगताप )** |

माणसाच्या आयुष्यात जेव्हा संकटांचे डोंगर उभे असतात, तेव्हा काही माणसे खचतात — आणि काही माणसे त्याच डोंगरावर चढून इतिहास घडवतात. धारूर येथील सिरसठ परिवार हे अशाच इतिहास घडवणाऱ्या माणसांचे जिवंत उदाहरण आहे.

एकेकाळी डोक्यावर घमेले घेऊन मजुरी करणाऱ्या चार भावंडांनी आज 'भाग्यश्री कन्स्ट्रक्शन' या उद्योगाचे भव्य साम्राज्य उभे केले आहे. महाराष्ट्रापासून हैदराबादपर्यंत त्यांच्या कामाचा दर्जा बोलतो. १५०० मजूर कुटुंबांना त्यांनी रोजगार दिला आहे. हा प्रवास केवळ एका कुटुंबाची गोष्ट नाही — तो प्रत्येक संघर्षशील तरुणाची प्रेरणा आहे.

बालपण आणि कौटुंबिक परिस्थिती-

धारूरच्या या मातीत जन्मलेल्या सिरसठ कुटुंबाचे बालपण अत्यंत कठीण परिस्थितीत गेले. घरची आर्थिक स्थिती इतकी बेताची होती की स्वतःचे हक्काचे छतही नव्हते.

पावसाळ्याचे दिवस आले की परिस्थिती आणखीच बिकट व्हायची. त्या दिवसांत या कुटुंबाला स्थानिक शासकीय दवाखान्यात आश्रय घ्यावा लागायचा. ज्या दवाखान्यात माणसे उपचारासाठी जातात — तिथे हे कुटुंब निवाऱ्यासाठी रात्र काढायचे. त्या थंड भिंती, तो अंधार, ती असहाय्यता — हे सगळे सहन करणे सोपे नव्हते.

पण संतोष उर्फ बाप्पा सिरसठ, बाळू सिरसठ, श्याम सिरसठ आणि अशोक सिरसठ** या चारही भावंडांनी त्या वेदनेला शक्ती बनवले. गरिबीच्या त्या चटक्यांनी त्यांना खचवले नाही — उलट लढण्याची उर्मी दिली.

संघर्षाचा काळ - घरची परिस्थिती पाहून स्वस्थ बसणे या भावंडांच्या स्वभावात नव्हते. आई-वडिलांच्या संस्कारांची शिदोरी सोबत घेऊन या चारही बंधूंनी एक निर्णय घेतला — *धारूर सोडायचे आणि पुणे गाठायचे.*

पुण्यात आल्यावर सुरुवात झाली अगदी तळापासून. मिस्त्री म्हणून काम केले. कामगार म्हणून राबले. इतरांचे बंगले बांधले, इमारती उभ्या केल्या — पण मन मात्र स्वतःचे काहीतरी उभे करण्याचे स्वप्न पाहत होते.

या काळात अनेक अडचणी आल्या. पैशांची कमतरता होती. ओळखी नव्हत्या. अनुभव कमी होता. पण जिद्द होती — आणि जिद्द असलेल्या माणसाला अपयश फार काळ थांबवू शकत नाही.

उद्योगाची कल्पना आणि प्रेरणा - पुण्यात काम करताना या बंधूंनी एक गोष्ट ओळखली — बांधकाम क्षेत्रात दर्जेदार काम करणाऱ्यांची नेहमीच मागणी असते. आपल्याकडे कौशल्य आहे, अनुभव आहे, कष्टाची तयारी आहे — मग स्वतःचा उद्योग का नाही?

याच विचारातून 'भाग्यश्री कन्स्ट्रक्शन' या उद्योगाची बीजे रोवली गेली. नाव ठेवले भाग्यश्री — कारण भाग्य स्वतः घडवायचे होते. कोणाच्या दयेवर नाही, कोणाच्या मदतीवर नाही — स्वतःच्या कष्टावर.

उद्योगाची सुरुवात आणि वाढ - सुरुवात झाली लहान गुत्तेदारीने. एक काम, मग दुसरे काम — हळूहळू नाव होऊ लागले. काम दर्जेदार असल्यामुळे नवीन कामे आपोआप येऊ लागली. एका शहरातून दुसऱ्या शहरात, एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात — भाग्यश्री कन्स्ट्रक्शनचा विस्तार होत राहिला.

आज संभाजीनगर, पुणे, अहमदनगर,



अंबाजोगाई आणि केज अशा अनेक शहरांमध्ये त्यांच्या कामाचा दर्जा बोलतो. एवढेच नव्हे तर महाराष्ट्राची सीमा ओलांडून हैदराबाद, तेलंगणा पर्यंत त्यांनी आपला ठसा उमटवला आहे.

धारूर शहरात नुकताच त्यांच्या नूतन कार्यालयाचा भव्य उद्घाटन सोहळा थाटामाटात संपन्न झाला. या सोहळ्यास नगराध्यक्ष बाळासाहेब जाधव, डॉ. स्वरूपसिंह हजारी, नेते माधवराव निर्मळ, माजी नगराध्यक्ष अर्जुन गायकवाड, सुनील शिनगारे यांसह सर्व नगरसेवक, पत्रकार बंधू, व्यापारी आणि शहरातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा केवळ एका वास्तूचा श्रीगणेशा नव्हता — तो होता एका संघर्षाच्या यशाचा उत्सव.

कुटुंबाची भूमिका — खऱ्या अर्थाने आधारवड

या यशाच्या मागे केवळ चार भावंडांची मेहनत नाही. त्यांच्या मागे उभ्या राहिलेल्या कुटुंबाचाही तितकाच मोठा वाटा आहे. आई-वडिलांनी दिलेले संस्कार हीच या भावंडांची सर्वात मोठी शिदोरी होती. गरिबीत राहूनही त्यांनी मुलांना प्रामाणिकपणा, कष्टाळूपणा आणि एकजुटीचे धडे दिले. त्या संस्कारांचीच फळे आज दिसत आहेत.

आणि सर्वात महत्त्वाचे — चारही भावंडांची अभेद्य एकजूट. एकमेकांना साथ दिली, एकत्र लढले, एकत्र उभे राहिले. कठीण प्रसंगी कधी एकमेकांना सोडले नाही. भावाभावांमधील ही एकजूटच त्यांचा सर्वात मोठा भांडवल ठरली.

समाजासाठी योगदान — माती विसरली नाही

सिरसठ बंधू केवळ यशस्वी उद्योजक म्हणून थांबले नाहीत. ज्या समाजाने, ज्या मातीने त्यांना घडवले — त्याचे ऋण त्यांनी फेडले.

गेल्या दहा वर्षांपासून - ते नगरपरिषदेच्या माध्यमातून सक्रिय राजकारणात आहेत. सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवणे आणि धारूर शहराच्या विकासात भर घालणे हाच त्यांचा उद्देश राहिला आहे.

कोरोनाच्या भीषण संकटकाळात सिरसठ परिवाराने धारूर शहरासाठी जे योगदान दिले, ते आजही शहरवासीयांच्या मनात घर करून आहे. संकटात माणूस ओळखला जातो — आणि या कठीण काळात सिरसठ बंधू धारूरसाठी खंबीरपणे उभे राहिले. हेच त्यांचे खरे मोठेपण आहे.

१५०० कुटुंबांचा आधार - या प्रवासातील सर्वात मोठी उपलब्धी म्हणजे — *सुमारे १५०० मजूर कुटुंबांना* आज भाग्यश्री कन्स्ट्रक्शनमुळे रोजगार मिळत आहे.

जे स्वतः एकेकाळी दुसऱ्याच्या हाताखाली मजुरी करत होते, त्यांनी आज हजारो हातांना काम दिले. १५०० घरांचा चूल पेटत आहे. १५०० मुलांचे शिक्षण सुरू आहे. १५०० कुटुंबांना आधार मिळाला आहे.

एका माणसाच्या — अधिक सांगायचे तर चार भावंडांच्या जिद्दीने एवढ्या कुटुंबांचे जीवन बदलले. यापेक्षा मोठे यश काय असते?

यशाचे रहस्य — साधेपणात मोठेपण - यश आले, पैसा आला, मान आला — पण सिरसठ बंधूंनी साधेपणा सोडला नाही. *"उतणार नाही, मातणार नाही"* हा वसा घेऊन ते आजही जगत आहेत. ज्या मातीत जन्मले त्या मातीशी इमान राखले.

त्यांच्या या यशाचे रहस्य सांगायचे तर — पहिले — आई-वडिलांचे संस्कार** — गरिबीत राहूनही त्यांनी मुलांना मूल्ये दिली.

दुसरे — चारही भावंडांची एकजूट — एकत्र राहिले, एकत्र लढले, एकत्र जिंकले.

तिसरे — कामावरची निष्ठा — दर्जेदार काम हीच त्यांची ओळख बनली.

चौथे — जिद्द आणि संयम— अपयशाने खचले नाहीत, यशाने मातले नाहीत.

-नव्या पिढीसाठी संदेश -

सिरसठ बंधूंचा हा प्रवास आजच्या तरुण पिढीसाठी एक मोठा संदेश आहे — गरिबी ही शेवटची अवस्था नाही — ती एक परिस्थिती आहे. आणि परिस्थिती बदलता येते — जिद्द आणि कष्टाने.

दवाखान्यात रात्र काढणाऱ्या या कुटुंबाने धारूरमध्ये स्वतःचे भव्य कार्यालय उभे केले. हे स्वप्न नाही — हे सत्य आहे. आणि हे सत्य सांगते की — तुमच्या परिस्थितीपेक्षा तुमची जिद्द मोठी असेल, तर यश तुमचेच आहे .

धारूरच्या सिरसठ बंधूंची ही गाथा येणाऱ्या अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील. ज्या मातीने त्यांना जन्म दिला, त्याच मातीत त्यांनी यशाचे सोने पिकवले. हक्काचे छत नव्हते म्हणून दवाखान्यात रात्र काढणाऱ्या या भावंडांनी आज हजारो कुटुंबांच्या घरावर छत आणले — याहून मोठी सामाजिक जबाबदारी कोणती?

भाग्यश्री कन्स्ट्रक्शन केवळ एक कंपनी नाही — ती आहे चार भावंडांच्या स्वप्नांची, कष्टांची आणि जिद्दीची जिवंत साक्ष.

"मातीत असलो तरी चालेल,
स्वप्ने आकाशाएवढी ठेवा —
कष्टाच्या पंखांनी एक दिवस,
तुम्हीही भरारी घ्याल!"

सिरसठ बंधूंना पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा —*

धारूरचा हा हिरा असाच चमकत राहो!

— **सूर्यकांत जगताप**|